उपविधान समिती

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

दुसरा अहवाल

(२०१६)

सत्यमेव जयते

(दिनांक ... एप्रिल, २०१६ रोजी विधानसभा/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१६

उपविधान समिती

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

दुसरा अहवाल

(२०१६)

एचबी ००२४–१

उपविधान समिती

(सन २०१५-२०१६)

(१) **श्री. विजयराव औटी, वि.स.स. तथा समिती प्रमुख.**
(२) ॲड. रामचंद्र अवसरे, वि.स.स.
(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(४) ॲड. संजय धोटे, वि.स.स.
(५) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.
(६) श्री. अमल महाडीक, वि.स.स.
(७) श्री. सुरेश भोळे, वि.स.स.
(८) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(९) श्री. अशोक पाटील, वि.स.स.
(१०) श्री. अमर काळे, वि.स.स.
(११) श्री. नितेश राणे, वि.स.स.
(१२) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.
(१३) श्री. राहूल जगताप, वि.स.स.
(१४) श्री. सुभाष ऊर्फ पंडीतशेठ पाटील, वि.स.स.
(१५) श्री. विनायक मेटे, वि.प.स.
(१६) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(१७) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(१८) श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.
(१९) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. सुभाषचंद्र मयेकर, उप सचिव,
(३) श्रीमती पुनम ढगे, अवर सचिव,
(४) श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी.

उपविधान समिती

(सन २०१३-२०१४)

(१) **श्री. बबनराव पाचपुते, वि.स.स. तथा समिती प्रमुख.**
(२) श्री. माणिकराव कोकाटे, वि.स.स.
(३) ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स.
(४) श्री. अस्लम शेख, वि.स.स.
(५) श्री. आप्पासाहेब ऊर्फ सा.रे.पाटील, वि.स.स.
(६) श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स.
(७) ॲड. अशोक पवार, वि.स.स.
(८) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.
(९) श्री. प्रमोद जठार, वि.स.स.
(१०) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(११) श्री. अशोक शिंदे, वि.स.स.
* (१२) रिक्त
(१३) श्री. राम कदम, वि.स.स.
(१४) श्री. अनिल गोटे, वि.स.स.
(१५) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.
(१६) श्री. विजय सावंत, वि.प.स.
** (१७) श्री. ख्वाजा बेग, वि.प.स.
(१८) ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स.
(१९) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(२०) ॲड. अनिल परब, वि.प.स. (निमंत्रित)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

(२) श्री. सुभाषचंद्र मयेकर, उप सचिव,

(३) श्रीमती पुनम ढगे, कक्ष अधिकारी.

---

* श्री. राजन विचारे, वि.स.स. यांनी समिती सदस्यत्वाचा दिनांक २२ मे, २०१४ रोजी राजीनामा दिल्यामुळे त्यांचे उपविधान समितीवरील सदस्यपद रिक्त झाले आहे.

** समिती सदस्य श्री. संजय पाटील, वि.प.स. यांनी विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागी श्री. ख्वाजा बेग, वि.प.स. यांची दिनांक ४ जुलै, २०१४ रोजी नियुक्ती केली आहे.

उपविधान समिती

(सन २०१२-२०१३)

* **(१) श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स.तथा समिती प्रमुख.**

(२) श्री. माणिकराव कोकाटे, वि.स.स.

(३) ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स.

(४) श्री. बलदेव खोसा, वि.स.स.

(५) श्री. आप्पासाहेब सा.रे.पाटील, वि.स.स.

* (६) रिक्त

(७) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.

** (८) श्री. प्रमोद जठार, वि.स.स.

** (९) डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.

(१०) श्री. विजयराव औटी, वि.स.स.

*** (११) श्री. अशोक शिंदे, वि.स.स.

(१२) श्री. राम कदम, वि.स.स.

(१३) श्री. राजाराम ओझरे, वि.स.स.

(१४) श्री. अनिल गोटे, वि.स.स.

(१५) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.

(१६) श्री. विजय सावंत, वि.प.स.

**** (१७) ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स.

(१८) श्री. संजय पाटील, वि.प.स.

***** (१९) ॲड. अनिल परब, वि.प.स.

****** (२०) श्री. सुमंत गायकवाड, वि.प.स. (निमंत्रित)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

(२) श्री. सुभाषचंद्र मयेकर, उप सचिव,

(३) श्री. संतोष पराडकर, अवर सचिव,

(४) श्रीमती पुनम ढगे, कक्ष अधिकारी.

---

* श्री. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी 'समिती प्रमुख' व समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या 'समिती प्रमुख' या पदावर श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स. यांची मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक २९ जानेवारी, २०१३ रोजी नामनियुक्ती केली आहे.

* श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स. यांची उपविधान समितीच्या 'समिती प्रमुख' पदावर नियुक्ती करण्यात आल्यामुळे त्यांचे उक्त समितीच्या सदस्यत्वाचे एक पद रिक्त झाले आहे.

** सन २०१२-२०१३ या वर्षासाठी गठित केलेल्या उपविधान समितीसमोर मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा यांच्याकडून प्राप्त झालेल्या सुधारित शिफारशीनुसार श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स. यांच्याऐवजी श्री. प्रमोद जठार, वि.स.स. व श्री. सुरेश हळवणकर, वि.स.स. यांच्याऐवजी श्री. सुरेश खाडे, वि.स.स. यांची दिनांक ३० जुलै, २०१२ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.

*** प्रा. शरद पाटील, वि.स.स. यांनी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर श्री. अशोक शिंदे, वि.स.स. यांची दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२ रोजी नामनियुक्ती केली आहे.

**** श्री. राजेंद्र जैन, वि.प.स. यांनी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर श्री. जयदेव गायकवाड, वि.प.स.यांची दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.

***** श्री. सुमंत गायकवाड, वि.प.स. यांच्याऐवजी ॲड. अनिल परब, वि.प.स. यांची दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.

****** श्री. रामदास कदम, वि.प.स. यांनी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर श्री. सुमंत गायकवाड, वि.प.स. यांची दिनांक ६ ऑगस्ट, २०१२ रोजी नामनियुक्ती केली आहे.

****** श्री. सुमंत गायकवाड, वि.प.स. यांची दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी (निमंत्रित) म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

उपविधान समिती

(सन २०१०-२०११ व २०११-२०१२)

(१) **श्री. चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख.**

(२) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.

(३) श्री. जगन्नाथ शेट्टी, वि.स.स.

(४) श्री. काशीराम पावरा, वि.स.स.

(५) श्री. वामनराव कासावार, वि.स.स.

(६) श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स.

(७) श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.

(८) श्री. मानसिंग नाईक, वि.स.स.

(९) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(१०) श्री. अशोक शिंदे, वि.स.स.

(११) प्रा. शरद पाटील, वि.स.स.

(१२) ॲड. उत्तमराव ढिकले, वि.स.स.

(१३) श्री. सुरेश हाळवणकर, वि.स.स.

(१४) श्री. शरद गावित, वि.स.स.

(१५) श्री. उल्हास पवार, वि.प.स.

* (१६) रिक्त

(१७) श्री. संजय पाटील, वि.प.स.

(१८) श्री. अरुणकाका जगताप, वि.प.स.

(१९) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव,

(२) श्री. म. मु. काज, उप सचिव,

(३) श्री. जि. म. भोळे, अवर सचिव.

---

* श्री. बी.टी.देशमुख, वि.प.स. यांची विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत दिनांक ५ डिसेंबर, २०१० रोजी संपुष्टात आल्यामुळे त्यांचे समितीवरील पद रिक्त झाले आहे.

प्रस्तावना

मी, उपविधान समितीचा समिती प्रमुख, समितीने तिच्या वतीने मला अहवाल सादर करण्यास अधिकार दिल्यानुसार समितीचा सन २०१५-२०१६ या वर्षातील कामकाजासंबंधीचा दुसरा अहवाल सादर करीत आहे.

या अहवालात समितीने ४ प्रारूप अधिसूचना व १० अंतिम अधिसूचना विचारात घेतल्या.

समितीने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या (अं.९९) (डी-१५ व अं.२३) अधिसूचनांवर तसेच महसूल व वन (महसूल) विभागाच्या (अं.२) या अधिसूचनेवर दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. तसेच नियोजन (रोहयो) विभागाच्या (डी-२२ व अं.४६) अधिसूचनांवर दिनांक २ मार्च, २०१६ रोजी संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली.

तसेच समितीने दिनांक १२ जानेवारी, २०१६, १०, २३ फेब्रुवारी, २०१६ तसेच २ मार्च, २०१६ अशा एकूण ४ बैठका घेतल्या.

या बैठकांमध्ये समितीने ४ प्रारूप अधिसूचनांचे व १० नियम प्रसिद्ध करणाऱ्या अधिसूचनांचे परिक्षण केले. समितीने दिनांक ५ एप्रिल, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत प्रारूप अहवालावर विचारविनिमय केला आणि तो संमत केला.

विधान भवन :
मुंबई, **समिती प्रमुख,**
दिनांक : ५ एप्रिल, २०१६. **उपविधान समिती**

अनुक्रमणिका

अनुक्रमांक (१)	विषय (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	
(एक)	**अंतिम अधिसूचना क्रमांक ९९ :** आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१० प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक ओएएच-२००९/प्र.क्र.४६/ सुधार- १, दिनांकित २३ जून, २०१०.	१
(दोन)	**प्रारूप अधिसूचना क्रमांक डी-१५** : महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक सीबीसी. १०/२०१२/प्र.क्र.१६५/मावक, दिनांकित २१ जुलै, २०१२.	१९
	आणि	
	अंतिम अधिसूचना क्रमांक २३ : महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक सीबीसी.१०/२०१२/प्र.क्र. १६५/ मावक, दिनांकित १ सप्टेंबर, २०१२.	१९
	महसूल व वन (महसूल) विभाग	
(तीन)	**अंतिम अधिसूचना क्रमांक २ :** भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एलक्यूएन.१२/२०१३/ प्र.क्र.१९०/अ-२, दिनांकित २७ ऑगस्ट, २०१४.	४५
	नियोजन (रोहयो) विभाग	
(चार)	**प्रारूप अधिसूचना क्रमांक डी-२२ -** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र बेरोजगार भत्ता नियम, २०१२ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक बेभनि.२०१२ /प्र.क्र. ३०/रोहयो-१०, दिनांकित २ जानेवारी, २०१३.	५५

अनुक्रमणिका —चालू

(१)	(२)	(३)
	तसेच	
	अंतिम अधिसूचना क्रमांक ४६ - महाराष्ट्र रोजगार हमी योजना - बेरोजगार भत्ता नियम, २०१३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक बेभनि-२०१२/प्र.क्र.३०/ रोहयो-१०, दिनांकित १ एप्रिल, २०१३.	५५
(पाच)	नियम तयार करण्यास, तसेच विधानमंडळासमोर अधिसूचना ठेवण्यास आणि समितीच्या उपयोगासाठी कागदपत्रे पाठविण्यास झालेला विलंब याचे विवरण.	७३
(सहा)	उपविधान समितीने विचारात घेतलेले प्रारूप नियम . .	७७
(सात)	उपविधान समितीने विचारात घेतलेले अंतिम नियम . .	८१
(आठ)	कार्यावलीचे परिशिष्ट	८५
(नऊ)	बैठकीचे कार्यवृत्त	९१

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

अंतिम अधिसूचना क्रमांक ९९ - आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१०, प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक ओएएच-२००९/प्र.क्र. ४६/ सुधार- १, दिनांकित २३ जून २०१०.

उद्देश :-

सदरहू नियम करण्यामागील उद्देश व कारणे यांची मिमांसा करताना विभागाने समितीला स्पष्टीकरणात्मक टिप्पणीत असे कळविले होते की, ...

केंद्र शासनाने अधिसूचित केलेला आई-वडिल व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम, २००७ हा दिनांक २७ फेब्रुवारी २००९ च्या अधिसूचनेअन्वये दिनांक १ मार्च २००९ पासून महाराष्ट्र राज्यात अंमलात आला आहे. तसेच अधिनियमातील कलम ३२ (१) अन्वये प्राप्त अधिकारान्वये शासन मान्यतेने विभागाने आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम, २०१० इंग्रजी व मराठी भाषेत दिनांक २३ जून २०१० रोजी अधिसूचित करून राज्यात त्याची अंमलबजावणी केली आहे.

पाल्य, आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांचा वृद्धापकाळात सांभाळ करित नसेल तर सदरहू नियमातील तरतुदीप्रमाणे आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांना स्वतःच्या चरितार्थासाठी पाल्यांकडून निर्वाह भत्ता मागणी करण्याचा हक्क प्रदान करण्यात आला आहे.

दिनांक **१२ व १९ जानेवारी २०११ रोजीच्या बैठकीत सदर अधिसूचना समितीने विचारात घेतली व काही मुद्यांबाबतची माहिती विभागाकडून मागविण्याचा निर्णय घेतला.** समितीने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली माहिती **परिशिष्ट 'अ'** मध्ये जोडण्यात आली आहे. तथापि, समितीने मागितलेल्या माहितीपैकी...

१. समेटकर्ता अधिकारी नियुक्त केले आहेत का? त्यांची अंमलबजावणी सुरू आहे काय?

२. निर्वाहभत्त्यासंबंधी अंमलबजावणी कशी करण्यात येते?

३. मंत्रालयीन पातळीवर ज्येष्ठ नागरिकांसाठी वेगळा विभाग स्थापन करण्याबाबत...

अशा ३ मुद्यांची माहिती विभागाने ४ वर्षे झाली तरीही समितीस सादर केली नाही. तद्संदर्भात **समितीने प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास वेळोवेळी स्मरणपत्र पाठवूनही तसेच मा.मुख्य सचिव यांना त्याबाबत अवगत करूनही माहिती प्राप्त न झाल्याने त्याबाबत समितीने तीव्र नापसंती व्यक्त करून** याबाबत **दिनांक ७ ऑक्टोबर २०१५** रोजी सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सामाजिक न्याय विभागाने दिनांक २३ जून २०१० रोजी एक नियमावली काढलेली आहे, परंतु अजूनही त्या नियमावलीस उप विधान समितीची

मान्यता घेतलेली नाही. नियम सादर करून पाच वर्षे झाली तरी समितीने उपस्थित केलेल्या काही मुद्यांची विभागाकडून माहिती मिळाली नाही. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, उपरोक्त विषयासंदर्भातील अंतिम अधिसूचना दिनांक २३ जून २०१० रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. समितीने ज्या ११ मुद्यांची माहिती मागितली होती, त्यापैकी तीन मुद्यांची माहिती अद्याप मिळाली नाही. न्यायाधिकरणातील समेटकर्ता अधिकारी हे उप विभागीय अधिकारी आहेत व सदर अधिकारी महसूल विभागांतर्गत येत असल्यामुळे त्याबाबतची माहिती महसूल खात्याकडून मागितली होती, परंतु महसूल विभागाकडून उत्तर आलेले नाही, तसेच सदर नियमातील नियम क्रमांक ३ अन्वये समेटकर्ता अधिकारी यांची नियुक्ती केली आहे काय, असल्यास कोठे कोठे नेमले आहेत याबाबतची माहिती सामाजिक न्याय विभागाकडे उपलब्ध नाही. सदर माहिती देण्यास उशीर झालेला आहे, ही बाब विभागीय प्रतिनिधींनी मान्य केली.

त्यावर समितीने अशी विचारणा केली की, सदर नियमांतर्गत निर्वाहभत्त्याची अंमलबजावणी केली जाते का? केली असेल तर कशाप्रकारे करता, हे समितीला ज्ञात होत नाही. त्यांना भत्ता मिळत नाही, यासंदर्भात न्यायाधिकरण नेमले आहे की नाही ? कायदा तयार होऊन पाच वर्षे झाले तरी अंमलबजावणी होते की नाही, या बाबींचा काहीच बोध होत नाही. यावर विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, न्यायाधिकरण नेमलेले आहे. परंतु समेटकर्ता अधिकाऱ्यांची संख्या खूप जास्त आहे. त्यामुळे सदर अधिकारी नेमले आहेत याची माहिती गोळा करण्यासाठी आयुक्त, महसूल यांना विचारणा करण्यात येत असून याबाबतची माहिती घेण्यात येत आहे. माहिती देण्यासाठी उशीर झालेला आहे, ही बाब मान्य करून विभागीय सचिवांनी सदर माहिती गोळा करण्यासाठी दोन माहिन्यांची मुदतवाढ मागितली. याप्रकरणी समितीने उपस्थित केलेल्या मुद्यांची माहिती न मिळाल्याने सदर अधिसूचनेवर निर्णय घेण्यास विलंब होत आहे असे मत व्यक्त करून समितीने नाराजी व्यक्त केली व त्यांना दिनांक २० नोव्हेंबर, २०१५ रोजीपर्यंत माहिती देण्यास मुदतवाढ दिली.

त्यानंतर विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी पुन्हा विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. विभागाकडून प्राप्त झालेली माहिती **परिशिष्ट 'ब' मध्ये सादर करण्यात आली आहे.** सदर साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, उपरोक्त नियमाच्या नियम २ (ड) मध्ये 'भाऊ-बहिण' असा उल्लेख करण्यात आला आहे. या व्याख्येमध्ये बहिणीच्या विवाहानंतरही बहिणींचा समावेश होऊ शकतो का? समावेश होत असल्यास विवाहापूर्वीचा व विवाहानंतरचा लाभ असे दोन्ही लाभ तिला मिळतील का? याबाबतचा खुलासा यामधून होत नाही. निर्वाह भत्ता देण्याची ही योजना आपल्या राज्यात सुरू होऊन याची सर्वत्र प्रभावी अंमलबजावणी सुरू झाली आहे काय? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, पाल्य, आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांचा वृद्धापकाळात सांभाळ करीत नसेल तर सदरहू नियमातील तरतुदीप्रमाणे आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांना स्वतःच्या चरितार्थासाठी पाल्यांकडून निर्वाह भत्ता मागणी करण्याचा हक्क प्रदान करण्यात आला आहे. यामध्ये

रक्ताचे नातेसंबंध याचा अर्थ स्पष्ट केलेला आहे. सदरहू अर्थ उक्त नियमाच्या प्रकरण-४ नियम १८(४) च्या अनुषंगाने स्पष्ट करण्यात आला आहे. या अधिनियमांतर्गत कायद्याची अंमलबजावणी करण्याकरिता राज्यभरामध्ये मुंबई येथे ३ समेटकर्ता अधिकारी, पुणे येथे २१ समेटकर्ता अधिकारी नेमण्यात आलेले आहेत. नाशिक जिल्हयामध्ये समेटकर्ता अधिकारी नियुक्तीची कार्यवाही चालू आहे. अमरावती येथे पाच समेटकर्ता अधिकारी नेमण्यात आलेले आहेत. नागपूर विभागामध्ये नागपूर जिल्ह्यात १ समेटकर्ता अधिकारी नेमण्यात आलेला आहे. औरंगाबाद विभागामध्ये समेटकर्ता अधिकारी नेमण्याची कार्यवाही चालू आहे. लातूर जिल्ह्यामध्ये ९ व हिंगोली जिल्हयामध्ये ३ समेटकर्ता अधिकारी नेमलेले आहेत. या जिल्हयांमध्ये या कायद्याची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही सुरू झालेली आहे.

त्यानंतर समितीने अशी विचारणा केली की, अहमदनगर जिल्ह्यामध्ये या कायद्याची अंमलबजावणी सुरू झालेली नाही. कोकणामध्येही या कायद्याची अंमलबजावणी झालेली नाही. काही जिल्ह्यांमध्ये तर समेटकर्ता अधिकारी यांची नेमणूकही झालेली नाही. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी असे स्पष्टीकरण दिले की, या कायद्याच्या अंमलबजावणीकरिता समेटकर्ता अधिकारी नेमण्याची कार्यवाही जिल्ह्यांमध्ये चालू आहे. परंतु अंमलबजावणीवर संनियंत्रण करण्याची आवश्यकता आहे. या संनियंत्रणाचा महिनानिहाय आढावा घेणे आवश्यक आहे. संनियंत्रणाशिवाय या कायद्यावरील अंमलबजावणीला वेग येणार नाही.

निर्वाह न्यायाधिकरणे स्थापन झालेली नाहीत. हे निर्वाह न्यायाधिकरण किती दिवसांमध्ये स्थापन होतील, या कायद्यांतर्गत समेटकर्ता अधिकारी, यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही. तसेच, या कायद्याची व या कायद्यांतर्गत असलेल्या तरतुदींची प्रसिद्धी न केल्यामुळे राज्यातील बहुतांशी जनतेला याबाबत माहिती नाही. ज्याप्रमाणे इतर शासकीय कार्यालयाच्या बाहेर सामाजिक न्याय विभागाच्या इतर योजनांविषयीची माहिती पत्रिका छापलेली असते, **त्याचप्रमाणे या कायद्यांतर्गत असलेल्या निर्वाह भत्त्यासंदर्भातील माहिती शेवटच्या माणसापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. नगरपरिषदा, पंचायत समित्यांच्या इमारतीच्या बाहेरही अशाप्रकारचे बोर्ड लावले गेले पाहिजेत असे मत व्यक्त करून समितीने याबाबतची** माहिती विचारली असता, विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, या कायद्यानुसार निर्वाह न्यायाधिकरण कॅबिनेटची मंजूरी व आदेशानंतर वाजवी कालावधीत सुरू होतील. अजूनपर्यंत राज्यातील जनतेपर्यंत या कायद्यानुसार लागू असलेल्या निर्वाह भत्त्यासंदर्भातील माहिती पोहोचलेली नाही. याकरिता या योजनेचा व कायद्याचा प्रचार होणे आवश्यक आहे. तहसीलदार कचेरी व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाहेर बोर्ड किंवा बॅनर लावले गेले पाहिजे, असेही त्यांनी सुचवून सदर योजनेंतर्गत रिजनल मॉनिटरींग सिस्टम आहे. योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने जिल्हा व तालुकावार मॉनिटरींग केले जाते अशीही माहिती त्यांनी दिली.

समितीने असे मत व्यक्त केले की, सध्या लाभार्थ्यांच्या अर्जाची छाननी झाल्यानंतर ज्यावेळी लाभार्थी पात्र होतो त्या दिनांकापासून त्याला लाभ मिळतो. लाभार्थ्याने जर अर्जासोबतच्या कागदपत्रांच्या कम्प्लायन्सकरिताच सहा महिने ते एक वर्षांचा कालावधी लावला तर आणखी विलंब होतो. तथापि, तसे न होता लाभार्थ्यास या योजनेचा लाभ लाभार्थ्याला अर्जाच्या दिनांकापासून मिळणे आवश्यक आहे.

अभिप्राय व शिफारशी :

१. **पाल्य, जर आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांचा वृद्धापकाळात सांभाळ करीत नसेल तर सदर नियमातील तरतूदीनुसार आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांना स्वतःच्या चरितार्थासाठी पाल्यांकडून निर्वाह भत्ता मागणी करण्याचा हक्क प्रदान करण्यात आला आहे. तथापि, समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, या नियमांतर्गत असलेल्या तरतूदींची माहिती अद्यापी सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहचलेली नाही तरी शासनाने या नियमांची सर्वदूर प्रसिद्धी करण्याकरिता नगरपरिषदा, पंचायत समिती, जिल्हाधिकारी कार्यालये, तहसीलदार कार्यालये इत्यादींच्या सहकार्याने तसेच प्रसिद्धी माध्यमांतर्फेही सदरहू नियमांचा प्रचार व प्रसार करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्यात देण्यात यावी.**

२. **तसेच राज्यातील सर्व विभागांमध्ये समेटकर्ता अधिकारी यांची नियुक्ती तातडीने करण्यात यावी तसेच सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणेकरिता योग्य ती संनियंत्रण व्यवस्था (Monitoring system) अंमलात आणावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्यात देण्यात यावी.**

३. **आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१० अंतर्गत सदर योजनेचा लाभ हा अर्जदाराने दिलेल्या अर्जाची छाननी होऊन लाभार्थी पात्र होईल त्या दिनांकापासून देण्यात येतो. तथापि, अर्जदाराने अर्ज केल्याच्या दिनांकापासून सदर योजनेचा लाभ अर्जदारास मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे ज्या दिवशी अर्जदार अर्ज करेल त्या दिवसापासून या योजनेचा लाभ अर्जदारास देण्यात यावा, याबाबत नियमात योग्य ती सुधारणा करण्यात यावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्यात देण्यात यावी.**

४. **आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१० मधील नियम २१(२) (एक) मध्ये ज्येष्ठ नागरिकांचे कल्याण विषयाशी संबंधित प्रभारी मंत्री पदसिद्ध अध्यक्ष राहतील अशी तरतूद करण्यात आली आहे. तथापि, आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणाच्या संदर्भात ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्याकरिता व त्यांना सोयी-सवलती व इतर योजनांची माहिती मिळण्यासंदर्भात ज्येष्ठ नागरिकांचे कल्याण असा कोणताही विभाग मंत्रालयीन स्तरावर अस्तित्वात नाही किंवा त्यासाठी स्वतंत्र मंत्री महोदय नाहीत, त्यामुळे मंत्रालय पातळीवर ज्येष्ठ नागरिकांसाठी एक स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात यावा, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व यासंदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात देण्यात यावी.**

परिशिष्ट "अ"

प्रपत्र अ

मुद्दा क्रमांक	उपविधान समितीनेउपस्थित केलेला मुद्दा	विभागाचे स्पष्टीकरण
१	उपरोक्त नियमाच्या नियम २ (ड) मध्ये "भाऊ - बहिण" असा उल्लेख करण्यात आला आहे. सदरहू नियमात बहिणीच्या लग्नानंतर काय याबाबत उल्लेख केलेला नाही, तेव्हा या व्याख्येमध्ये बहिणींच्या विवाहानंतरही बहिणींचा समावेश होऊ शकतो का ? समावेश होत असल्यास विवाहापूर्वीचा व विवाहानंतरचा लाभ असे दोन्ही लाभ तिला मिळतील का ?	आई-वडील व जेष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम, २०१० च्या नियम २(ड) मध्ये **रक्ताचे नातेसंबंध** याचा अर्थ स्पष्ट केलेला आहे. सदरहू अर्थ उक्त नियमाच्या प्रकरण-४ नियम १८(४) च्या अनुषंगाने स्पष्ट करण्यात आला आहे त्यानुसार रक्ताचे नातेसंबंध असलेले "भाऊ - बहिण "अथवा विवाहीत जोड्यांव्यतिरिक्त इतर सर्व पुरुष व स्त्री सहवासीसाठी वृध्दाश्रम स्वतंत्र राहण्याची सोय करेल. सबब समितीने विचारणा केल्याप्रमाणे नियम २(ड) प्रमाणे भाऊ बहिण मग ती बहिण विवाहीत असो वा नसो स्वतःच्या सख्ख्या भावासोबत वृध्दाश्रमात एकत्र राहू शकते. या नियमानुसार निर्वाह भत्ता देय होण्यासाठी आई वडील व जेष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम २००७ च्या कलम ४(१) मध्ये तरतूद केली आहे. त्याप्रमाणे आई-वडील तसेच जेष्ठ नागरिक मग ते विवाहीत असो वा अविवाहीत जर ते स्वतःच्या मिळकतीतून किंवा मालमत्तेतून आपला चरितार्थ / उदरनिर्वाह करु शकत नाहीत अशा जेष्ठ नागरिकांना उक्त अधिनियमाच्या कलम ४(एक) (i) (ii) तसेच २ (g) मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधितांकडून निर्वाहभत्ता प्राप्त करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. सबब समितीने विचारणा केल्याप्रमाणे विवाहीत बहिणीला विवाहापूर्वीचा व विवाहानंतरचा असे दोन्ही लाभ देण्याचा येथे प्रश्न उद्भवत नाही.
२	उपरोक्त [illegible] प्रकरण २ नियम ३ मध्ये नमूद केलेले समेटकर्ता अधिकारी नियुक्त केले [illegible] काय ? असल्यास त्यांची अंमलबजावणी [illegible] काय ?	समेटकर्ता अधिकारी नियुक्त करण्याचे अधिकार संबंधित निर्वाह न्यायाधिकरणास [illegible] महसूल व वन विभागाची शासन अधिसूचना दि. २८.९.२०१० अन्वये राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या प्रत्येक उप विभागासाठी संबंधित उप

		विभागीय अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली निर्वाह न्यायाधिकरण स्थापित करण्यात आलेले आहे.सदरहू न्यायाधिकरणाने समेटकर्ता अधिकारी नियुक्त केले किंवा कसे याबाबतची माहिती सर्व जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन ती शासनास एकत्रितरित्या सादर करण्याबाबत विभागीय आयुक्तांना दि.२८/३/२०११ च्या अर्धशासकीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.सदर माहिती अद्याप अप्राप्त आहे.
३	निर्वाह न्यायाधिकरण नेमले आहे काय ?	महसूल व वन विभागाची शासन अधिसूचना दि. २८.९.२०१० अन्वये राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या प्रत्येक उप विभागासाठी संबंधित उप-विभागीय अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली निर्वाह न्यायाधिकरण स्थापन करण्यात आलेले आहे.
४	निर्वाह भत्त्यासंबंधीची अंमलबजावणी कशी करण्यात येते ?	निर्वाह भत्त्याची अंमलबजावणी करण्याकरिता आई-वडील व जेष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम, २००७ तसेच नियम, २०१० च्या प्रकरण-२ मध्ये कार्यपध्दती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे. याबाबतची माहिती सर्व जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन ती शासनास एकत्रितरित्या सादर करण्याबाबत विभागीय आयुक्तांना दि.२८/३/२०११ च्या अर्धशासकीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.सदर माहिती अद्याप अप्राप्त आहे.
५	प्रकरण ३ नियम १५ मध्ये अपील विहित मुदतीत दाखल करण्याची तरतूद आहे [illegible] ३ महिन्याच्या आत दाखल करता येईल अशी तरतूद असावी असे [illegible] मत आहे. त्याबाबत अभिप्राय द्यावेत.	आई-वडील व जेष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम, २००७ च्या कलम १६(१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे निर्वाह न्यायाधिकरणाने निर्वाह आदेश पारित केल्यापासून ६० दिवसांच्या विहित मुदतीत अपील करण्याची तरतूद केली आहे. सदर कलमाच्या परंतुकामध्ये विहित मुदत टळून गेली असल्यास अपिलिय प्राधिकरणास त्यांचे [illegible] कारण होते अशी खात्री झाली

		तर मुदतबाह्य अपील दाखल करुन घेण्याची मुभा अपिलिय प्राधिकरणास दिली आहे. सदरहू अधिनियम केंद्रशासनाने अधिसूचित करुन संपूर्ण देशात (जम्मू व काश्मिर राज्य वगळता) लागू केला आहे. सबब अपील ३ महिन्याच्या आत दाखल करता येईल या समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने राज्यशासनाला अधिनियमात बदल करण्याचे वैधानिक अधिकार नाहीत.
६	उपरोक्त नियमातील प्रकरण ४ कलम १९ मध्ये नमूद केलेला नियम अधिक स्पष्ट करावा ? तसेच वृध्दाश्रमात राहण्याकरिता एकदा नोंदणी झाल्यानंतर पुन्हा दरवर्षी अर्ज भरण्याची आवश्यकता आहे काय ? याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.	केंद्रशासनाने अधिसूचित केलेल्या अधिनियमातील कलम १९ स्पष्ट आहे. सदरहू अधिनियम केंद्रशासनाने अधिसूचित केल्याने त्यात राज्यशासनाला बदल करता येणार नाहीत. अधिनियमाच्या कलम १९ मध्ये निर्देश दिल्याप्रमाणे राज्यशासनाने आई-वडील व जेष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम, २०१० च्या नियम १८ मध्ये वृध्दाश्रम व्यवस्थापनाबाबत व्यवस्थापकीय प्रमाणके व दर्जा निर्धारित केले आहेत. वृध्दांची वृध्दाश्रमात राहण्याची इच्छा असणे आवश्यक आहे. वृध्दाने नियमांच्या प्रकरण ४ नियम १८ (ब)(१) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अर्ज केल्यानंतर त्याची वृध्दाश्रमात एकदा राहण्याची निवड झाल्यावर सदर वृध्दाची दरवर्षी नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. परंतू उक्त नियमात ठराविक कालावधीने परंतू वर्षातून किमान एकदा तरी सर्व वृध्दाश्रमांनी वृध्दाश्रमात राहण्यासाठी इच्छूक असणा-या जेष्ठ नागरिकांकडून अर्ज मागणे बंधनकारक केले आहे. सद्यःस्थितीत राज्यातील शहरी भागात १० व ग्रामीण भागात २१ असे एकूण ३१ अनुदानित सर्वसाधारण वृध्दाश्रम कार्यरत आहेत. तसेच ३१ विनाअनुदानित वृध्दाश्रम कार्यरत आहेत. शासन अनुदानित वृध्दाश्रमातील वृध्दांना रु.६३० परिपोषण अनुदान शासन निर्णय क्र. विअबा- २००६/प्र.क्र.११५/शावक-६ दि. २७ मे २००८ प्रमाणे देण्यात येते.

७	उपरोक्त नियमातील नियम १९(२) निर्वाह अर्ज प्राप्त होण्याची मुदत संपल्यानंतर १५ दिवसांच्या आत त्याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे. तरी यासंदर्भात विभागाने खुलासा करावा.	आई-वडील व जेष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम, २००७ च्या कलम ५(४) मध्ये नमूद केल्याप्रमाणे निर्वाह अर्जासंदर्भात संबंधित अर्जदाराच्या मुलांना अथवा नातेवाईकांना निर्वाह खर्चाबाबत ज्ञापन पाठविल्यापासून ९० दिवसांचे आत निर्वाह अर्जावर निर्णय घेणे बंधनकारक केले आहे. केवळ अपवादात्मक परिस्थितीतच सबळ कारणे आदेशात नमूद करुन निर्वाह अर्जावरील निर्णयाची विहित कालमर्यादा अजून कमाल ३० दिवसांपर्यंत वाढविण्याचे अधिकार निर्वाह न्यायाधिकरणास प्रदान करण्यात आले आहेत. नैसर्गिक न्याय तत्वानुसार सदरहू कालावधीत विरोधी पक्षास आपली बाजू मांडून निर्वाह खर्च निर्धारित करण्याची वाजवी संधी देण्यात आली आहे. सदरहू अधिनियम केंद्रशासनाने अधिसूचित केल्याने समितीच्या उपरोक्त शिफारशीनुसार त्यात बदल करण्याचे वैधानिक अधिकार राज्यशासनाला नाहीत.
८	नियम १९(२) पोट-कलम (आठ) मध्ये पोलिस आयुक्तांच्या अखत्यारीतील शहरांच्या बाबतीत कोणाचे नियंत्रण राहील याचा उल्लेख नियमात केलेला नसल्याने अधिक खुलासा करण्यात यावा.	आई-वडील व जेष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम, २०१० च्या नियम १९(२) मध्ये जिल्हादंडाधिका-यांची कर्तव्ये व त्यांना प्रदान करण्यात आलेले अधिकार विनिर्दिष्ट केलेले आहेत.नियम १९(२)(८) मध्ये पोलिस आयुक्तांच्या अखत्यारीतील शहरे वगळता जिल्ह्यातील जेष्ठ नागरिकांच्या प्रकरणा संदर्भातील तपास तथा न्याय चौकशीच्या प्रगतीचा आढावा घेण्याचे कर्तव्य जिल्हादंडाधिका-यांचे आहे. सदरहू नियमातील प्रकरण-६ नियम २० (२) (बारा) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पोलिस आयुक्त, पोलिस महासंचालकांना आणि जिल्हादंडाधिका-यांना प्रत्येक महिन्याच्या २८ तारखेपर्यंत मागील महिन्यात जेष्ठ नागरिकांविरुध्द घडलेल्या गुन्ह्यांचा मासिक अहवाल, यात तपासाची प्रगती, नोंद गुन्ह्याचा न्यायिक तपशील आणि केलेल्या प्रतिबंधात्मक योजनेची माहिती सादर करतील. जिल्हादंडाधिकारी सदरहू माहिती जिल्हास्तरीय समन्वय व

		संनियंत्रण समितीकडे सादर करतील. तसेच पोलिस महासंचालक त्यांच्याकडे प्राप्त झालेला उक्त अहवाल एकत्रित करुन प्रत्येक तिमाहीत तसेच दरवर्षी इतर अहवालासह राज्य जेष्ठ नागरिक परिषदेपुढे मांडण्यासाठी शासनाला सादर करतील. ही तरतूद नियमात केली आहे. सबब पोलिस आयुक्तांच्या अखत्यारीतील शहरांच्या बाबतीत पोलिस महासंचालक तसेच शासनाचे नियंत्रण राहील.
९	प्रकरण -६, नियम २० च्या पोट-नियम (अकरा) मध्ये "होमगार्ड (स्त्री व पुरुष) यांचा समावेश असावा" असे समितीचे मत आहे. त्याबाबत विभागाने अभिप्राय द्यावेत.	आई-वडील व जेष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम, २०१० चे प्रकरण ६ नियम २० (२)(अकरा) मध्ये जेष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी त्यांच्या वास्तव्यालगतचे रहिवाशी कल्याण संघ, युवा स्वयंसेवक , अशासकीय संघटना इत्यादिंच्या सहकार्याने सार्वजनिक बंदोबस्त करण्याचे प्रयोजन केले आहे. जेष्ठ नागरिक राहत असलेल्या परिसरातील उपरोक्त नमूद स्थानिक संस्था या तत्परतेने जेष्ठ नागरिकांच्या मदतीसाठी जाऊ शकतील म्हणून उक्त तरतूद करण्यात आली आहे.होमगार्डचा यात समावेश असावा समितीच्या या सूचनेबाबत गृह विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत सदर अभिप्राय अद्याप अप्राप्त आहेत.
१०	नियम २१(२)(एक) मध्ये जेष्ठ नागरिकांचे कल्याण विषयाशी संबंधित प्रभारी मंत्री - पदसिध्द अध्यक्ष असतील - असे नमूद करण्यात आलेले आहे. तथापि, मंत्रालयीन पातळीवर जेष्ठ नागरिकांचे कल्याण असा कोणताही विभाग नाही. किंवा त्यासाठी मंत्रीमहोदयही नाहीत. तेव्हा मंत्रालयीन पातळीवर जेष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे. याबाबत शासनाचे अभिप्राय	आई-वडील व जेष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम, २०१० च्या नियम २१(२) (१) मध्ये जेष्ठ नागरिकांचे कल्याण विषयाशी संबंधित प्रभारी मंत्री राज्य जेष्ठ नागरिक परिषदेचे पदसिध्द अध्यक्ष असतील असे नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाअंतर्गत जेष्ठ नागरिकांचे कल्याण हा स्वतंत्र विभाग नाही.तथापि, हा विषय शासन कार्य नियमावलीनुसार सामाजिक न्याय विभागाकडे दर्शविण्यात आल्यामुळे सामाजिक न्याय विभागाचे प्रभारी मंत्री हेच जेष्ठ नागरिक राज्य परिषदेचे पदसिध्द अध्यक्ष असतील. मंत्रालयीन पातळीवर जेष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात यावा या समितीच्या शिफारशीबाबत

	नागविण्यात येऊन ते समितीस सादर करण्यात यावेत.	सामान्य प्रशासन विभागाने खालीलप्रमाणे अभिप्राय दिले असून सदर अभिप्रायांच्या अनुषंगाने स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येत आहे. मंत्रालयीन पातळीवर ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्याच्या मुद्दयाबाबत सामाजिक न्याय विभागाने सांगोपांग तपासणी करून मंत्रिमंडळापुढे आदेशार्थ प्रस्ताव आणावा किंवा कसे याबाबतच्या आदेशार्थ प्रस्ताव मुख्य सचिव व प्रभारी मंत्रीमहोदयांमार्फत मा.मुख्यमंत्री यांना सादर करणे योग्य होईल.
११	नियम १८(१)(अ) मध्ये ज्याचे मासिक उत्पन्न अनिश्चित आहे, ज्यांना कोणाचा आधार नाही अशा जेष्ठ नागरिकांनी काय करावे ? किंवा कुटुंबप्रमुख बेरोजगार आहे, त्यांचे तसेच शेतमजूर, बेरोजगार यांचे उत्पन्न कसे निश्चित केले जाणार आहे ? याबाबत आपली भुमिका स्पष्ट करावी.	आई-वडील व जेष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम, २०१० च्या नियम १८ (१)(अ) मध्ये निर्धन निराश्रीत जेष्ठ नागरिकांसाठी स्थापन केलेल्या वृध्दाश्रमाचे व्यवस्थापन कसे असावे याबाबत प्रमाणके व दर्जा विनिर्दिष्ट करणारे परिशिष्ट जोडल्याचे नमूद केले आहे. तसेच उक्त नियमातील १८(ब)(१) मध्ये वृध्दाश्रमांना वर्षातून किमान एकदा किंवा ठराविक कालांतराने वृध्दाश्रमामध्ये राहण्यास इच्छुक असलेल्या निराश्रीत निर्धन जेष्ठ नागरिकांकडून अर्ज मागविणे बंधनकारक केले आहे. समितीने विचारणा केल्याप्रमाणे ज्या वृध्दांचे मासिक उत्पन्न अनिश्चित आहे व जे निराधार आहेत अशा जेष्ठ नागरिकांना उक्त वृध्दाश्रमात राहण्यासाठी अर्ज करता येईल. तसेच निराधार व मासिक उत्पन्न नसलेल्या जेष्ठ नागरिकांना सामाजिक अर्थसहाय योजनेंतर्गत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना व श्रावणबाळ निवृत्तीवेतन योजनेंतर्गत लाभ घेता येईल. शासन अनुदानित वृध्दाश्रमातील वृध्दांना रु.६३० परिपोषण अनुदान शासन निर्णय क्र. विअआ-२००६/प्र.क्र.११५/मावक-६ दि. २७ मे २००८ प्रमाणे देण्यात येते. उक्त नियमातील तरतूदींप्रमाणे जेष्ठ नागरिकांना निर्वाह खर्चासाठी अर्जही करण्याची तरतूद आहे. निर्वाह खर्च

निर्वाह न्यायाधिकरण ठरविते. आई-वडील व जेष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम, २०१० च्या नियम १४ मध्ये निर्वाह भत्त्याची मर्यादा ठरविण्यात आली आहे. सबब, कुटूंबप्रमुख बेरोजगार असेल, शेतमजूर असेल, तरी निर्वाह न्यायाधिकरण सरासरी उत्पन्न निश्चित करुन त्याप्रमाणे निर्वाह भत्ता देय करेल.

****

महाराष्ट्र शासन

क्र. ओएएच २०११/प्र.क्र.१२७/ सुधार-१,
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय,मुंबई-४०००३२
दि. ६ जुलै,२०१२

प्रति,

प्रधान सचिव, '5'-97,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन मुंबई

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
आवक क्रमांक : 33850
दिनांक : 9 JUL 2012
वेळ : ..... स्वाक्षरी .....

विषय:- उपविधान समितीस स्पष्टीकरणात्मक माहिती पाठविण्याबाबत- आई-वडिल व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम,२०१०

संदर्भ:- १) आपले पत्र क्र. ४००६ दिनांक २९-१-२०११
२)आपले पत्र क्र. ३८०/म.वि.स./उपविधान/ड-११ दिनांक ९-१-२०१२

उपरोक्त विषयावरील संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये उपविधान समितीने उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबतचा अंतरीम अहवाल शासन समक्रमांक दिनांक २-५-२०११ च्या पत्रान्वये दिलेला आहे.

२. मुद्दा क्र. २,४ बाबत विभागीय आयुक्तांमार्फत सर्व जिल्हाधिकारी यांच्याकडून मागविण्यात आलेली माहीती अद्यापि प्राप्त झालेली नाही. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर यासंदर्भातील अंतिम अहवाल सादर करण्यात येईल. तसेच मुद्दा क्र. ९ बाबतची माहीती पुढीलप्रमाणे आहे:-

मुद्दा क्र.९ :- प्रकरण-६, नियम-२० च्या पोट-नियम (अकरा) मध्ये होमगार्ड (स्त्री व पुरुष) यांचा समावेश असावा असे समितीचे मत आहे, त्याबाबत विभागाने अभिप्राय द्यावेत.

स्पष्टीकरण :- होमगार्डचा समावेश असावा, याबाबत गृह विभागाचे प्राप्त अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत :-महासमादेशक होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिलेल्या अहवालानुसार होमगार्ड नियम,१९५३ मधील नियम १६ नुसार होमगार्डस्ना कामे व कर्तव्ये नेमून देण्यात आलेली आहेत. तथापि, होमगार्डस्ना कर्तव्यावर नेमल्यास त्यांना वेळप्रसंगी कायद्याने कारवाईची तरतूद नसल्यामुळे, जेष्ठ नागरीकांच्या सुरक्षततेसाठी पोलीस विभागाकडून सुरक्षा देण्यात आल्यास आवश्यकतेनुसार त्यांच्या सुरक्षततेसाठी होमगार्डस् स्वयंसेवकांना (स्त्री व पुरुष) त्यांच्या सहाय्यार्थ कर्तव्यावर नेमणूक करता येईल.

(संजय गुळेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

परिशिष्ट "ब"

प्रपत्र - अ

मुद्दा क्रं.	उपविधान समितीने उपस्थित केलेला मुद्दा	विभागाचे स्पष्टीकरण
२.	उपरोक्त नियमाच्या प्रकरण २ नियम ३ मध्ये समेटकर्ता अधिकारी नियुक्त केले आहेत काय ?	सोबत माहिती जोडली आहे.
	असल्यास, त्यांची अमंलबजावणी सुरु आहे काय	सोबत माहिती जोडली आहे.
३.	निर्वाह भत्यांसबंधीची अमंलबजावणी कशी करण्यात येते.	सोबत माहिती जोडली आहे.
१०.	नियम २१ (अ) (२) (एक) मध्ये ज्येष्ठ नागरिकांचे कल्याण विषयांशी संबंधित प्रभारी मंत्री पदसिद्ध अध्यक्ष असतील - असे नमूद करण्यात आलेले आहे. तथापि, मंत्रालयीन पातळीवर ज्येष्ठ नागरिकांचे कल्याण असा कोणताही विभाग नाही किंवा त्यासाठी मंत्री महोदयही नाही. तेव्हा मंत्रालयीन पातळीवर ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र विभाग स्थापनं करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे. याबाबत शासनाचे अभिप्राय मागविण्यात येऊन ते समितीस सादर करण्यात यावेत.	संबंधित विभागांचे अभिप्राय घेण्यात येत आहेत.

विवरणपत्र

अ.क्र.	जिल्हा	मुद्दा	उत्तर
१	२	३	४
१	मुंबई	सदर नियमाच्या प्रकरण २ मधील नियम ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे समेटकर्ता अधिकारी नियुक्त केले आहेत काय?	मुंबई विभागात २७ उपविभाग असून चिपळूण, राजापूर व रत्नागिरी या तालुक्यांसाठी ३ समेटकर्ता अधिका-यांची नेमणूक केलेली आहे. जिल्हानिहाय माहिती सोबत जोडली आहे.
		असल्यास त्यांची अंमलबजावणी सुरु आहे काय?	मुंबई उपनगर जिल्हा व रत्नागिरी जिल्हयातील अनुक्रमे चिपळूण, राजापूर व रत्नागिरी येथे अंमलबजावणी सुरु आहे.
		तसेच सदर प्रकरणी निर्वाह भत्याबाबतची अंमलबजावणी कशी करण्यात येते.	न्यायधिकरणाच्या निर्णयानुसार गैर अर्जदारास (प्रतिवादी) दरमहा निर्वाह भत्ता देण्यासाठी आदेश देण्यात येतो. त्यानुसार जेष्ठ नागरीकास निर्वाह भत्ता देण्यात येतो
२	पुणे	सदर नियमाच्या प्रकरण २ मधील नियम ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे समेटकर्ता अधिकारी नियुक्त केले आहेत काय?	पुणे विभागात एकूण ३२ उपविभाग आहेत. त्यामध्ये २१ समेटकर्ता अधिकारी नियुक्त केलेले आहेत. यादी सोबत जोडली आहे.
		असल्यास त्यांची अंमलबजावणी सुरु आहे काय?	२१ समेटकर्ता अधिकारी नियुक्त केलेले आहेत, त्यांच्याकडून अंमलबजावणी सुरु आहे.
		तसेच सदर प्रकरणी निर्वाह भत्याबाबतची अंमलबजावणी कशी करण्यात येते.	समेटकर्ता यांचेमार्फत अर्जदार व विरुध्द पक्षकार यांच्यामधील समझोता करार कायम करुन निर्वाह भत्याची रक्कम अर्जदार यांचे बँक खात्यामध्ये जमा करण्यात येते.
३	नाशिक	सदर नियमाच्या प्रकरण २ मधील नियम ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे समेटकर्ता अधिकारी नियुक्त केले आहेत काय?	नाशिक विभागात २८ उपविभाग असून धुळे व शिरपूर तालुक्यात दोन समेटकर्ता अधिकारी नियुक्त केलेला आहे. विभागातील उर्वरित २६ उपविभागीय अधिकाऱ्यांकडे समेट अधिकारी नियुक्तीची कार्यवही सुरु आहे.
		असल्यास त्यांची अंमलबजावणी सुरु आहे काय?	नियमानुसार अंमलबजावणी सुरु आहे.
		तसेच सदर प्रकरणी निर्वाह भत्याबाबतची अंमलबजावणी कशी	अधिनियम, २०१०च्या नियमानुसार

		करण्यात येते.	
४	अमरावती	सदर नियमाच्या प्रकरण २ मधील नियम ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे समेटकर्ता अधिकारी नियुक्त केले आहेत काय?	अमरावती विभागात अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम येथे ५ समेटकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अमरावती जिल्हयातील १२ तालुक्यात, यवतमाळ जिल्हयात १५ तालुक्यात व बुलढाणा जिल्हयात १२ तालुक्यात अद्याप समेटकर्ता अधिका-यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही.
		असल्यास त्यांची अंमलबजावणी सुरु आहे काय?	होय,
		तसेच सदर प्रकरणी निर्वाह भत्याबाबतची अंमलबजावणी कशी करण्यात येते.	नियमाच्या तरतूदीनुसार निर्वाह भत्याची अंमलबजावणी केली जाते.
५	नागपूर	सदर नियमाच्या प्रकरण २ मधील नियम ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे समेटकर्ता अधिकारी नियुक्त केले आहेत काय?	नागपूर विभागात नागपूर जिल्हयात १ समेटकर्ता अधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर यांची नियुक्ती केलेली आहे, तसेच वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली येथे समेटकर्ता अधिकारी नियुक्त केलेले नाहीत.
		असल्यास त्यांची अंमलबजावणी सुरु आहे काय?	अंमलबजावणी सुरु असून आतापर्यंत १० प्रकरणामध्ये समझोता करण्यात आला आहे.
		तसेच सदर प्रकरणी निर्वाह भत्याबाबतची अंमलबजावणी कशी करण्यात येते.	निर्वाह भत्याबाबत उपविभागीय अधिकारी यंच्या स्तरावरुन आदेश देण्यात येतो. त्यांच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येते. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडून कुठलाही निर्वाह भत्ता देण्यात येत नाही.
६	औरंगाबाद	सदर नियमाच्या प्रकरण २ मधील नियम ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे समेटकर्ता अधिकारी नियुक्त केले	औरंगाबाद विभागातील एकूण १८ उपविभाग असून समेट अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यात आलेली नाही.

		आहेत काय?	
		असल्यास त्यांची अंमलबजावणी सुरु आहे काय?	उप विभागीय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
		तसेच सदर प्रकरणी निर्वाह भत्याबाबतची अंमलबजावणी कशी करण्यात येते.	सदर अधिनियमानुसार निर्वाह अधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण हे काम पहात असले तरी उपविभागीय अधिका-यांनी दिलेल्या निर्वाह भत्याच्या अंमलबजावणी बाबत विशिष्ट यंत्रणा नाही. परंतू औरंगाबाद व जालना जिल्हयात संबंधित सहाय्यक आयुक्त, यांचेमार्फत जेष्ठ नागरीकांच्या नातेवाईकांकडून पोटगी/निर्वाह भत्ता जेष्ठ नागरीकांना मिळवून देण्यात येतो.
७	लातूर	सदर नियमाच्या प्रकरण २ मधील नियम ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे समेटकर्ता अधिकारी नियुक्त केले आहेत काय?	लातूर जिल्हयात ९ व हिंगोली जिल्हयात ३ असे एकूण १२ समेटकर्ता अधिकारी नियुक्त केलेले असून नांदेड व उस्मानाबाद येथे समेटकर्ता अधिकारी नियुक्त केलेले नाहीत.
		असल्यास त्यांची अंमलबजावणी सुरु आहे काय?	--
		तसेच सदर प्रकरणी निर्वाह भत्याबाबतची अंमलबजावणी कशी करण्यात येते.	--

आई-वडील ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणार्थ अधिनियम २००७ व नियम २०१० अंतर्गत समेटकर्ता अधिकारी नियुक्त करण्याबाबतचे विवरण पत्र "अ"

अ.क्र.	विभाग	जिल्हा	एकुण उप विभागांची संख्या	नियुक्त केलेल्या समेटकर्ता अधिका-यांची संख्या	शेरा
१	पुणे	पुणे	८	८	पुणे जिल्हयात आठ उपविभागांमध्ये सर्व समेटकर्ता अधिका-यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
		सातारा	७	७	सातारा जिल्हयात सात उपविभागांमध्ये सर्व समेटकर्ता अधिका-यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
		सांगली	५	२	मिरज, कडेगाव, जत याठिकाणी समेटकर्ता अधिकारी नियुक्त केलेला नाही.
		सोलापूर	५	३	सोलापूर जिल्हयात ५ उपविभागांमध्ये ३ समेटकर्ता अधिका-यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
		कोल्हापूर	६	१	पन्हाळा, इचलकरंजी, करवीर, राधानगरी, गडहिंग्लज याठिकाणी समेटकर्ता अधिकारी नियुक्त केलेले नाहीत. भुदरगड येथे समेटकर्ता अधिका-याची नियुक्ती केलेली आहे.
२	मुंबई	मुंबई उपनगर	२	२	समेटकर्ता अधिका-याची नेमणूक केलेली आहे.
		मुंबई शहर	०	०	समेटकर्ता अधिका-याची नेमणूक केलेली नाही.
		ठाणे	४	०	समेटकर्ता अधिका-याची नेमणूक केलेली नाही.
		पालघर	५	०	समेटकर्ता अधिका-याची नेमणूक केलेली नाही.
		रायगड	६	०	समेटकर्ता अधिका-याची नेमणूक केलेली नाही.
		रत्नागिरी	५	३	रत्नागिरी जिल्हयात ५ पैकी ३ उपविभागांमध्ये समेटकर्ता अधिकारी नेमले आहे.
		सिंधुदुर्ग	३	०	समेटकर्ता अधिका-याची नेमणूक केलेली नाही.
३	नाशिक	नाशिक	९	०	नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव जिल्हयात समेटकर्ता अधिकारी नेमले नाहीत. ता.श्रीरामपूर जि.अहमदनगर येथे समेटकर्ता अधिकारी नेमले आहेत.
		धुळे	२	०	
		नंदूरबार	३	०	
		जळगाव	७	०	
		अहमदनगर	७	१	
४	औरंगाबाद	औरंगाबाद	५	०	माहिती अप्राप्त
		परभणी	४	०	
		जालणा	४	०	
		बीड	५	२	

अ.क्र.	विभाग	जिल्हा	एकुण उप विभागांची संख्या	नियुक्त केलेल्या समेटकर्ता अधिका-यांची संख्या	शेरा
५	लातूर	लातूर	५	८	लातूर जिल्हयात ५ उपविभागांमध्ये ८ समेटकर्ता अधिका-यांची नियुक्ती केलेली आहे, तसेच एका उपविभागांमध्ये समेटकर्ता अधिकारी याबाबतची माहिती अप्राप्त आहे.
		उस्मानाबाद	३	०	माहिती निरंक आहे.
		नांदेड	८		माहिती निरंक आहे.
		हिंगोली	३	३	हिंगोली जिल्हयात ३ उपविभागांमध्ये समेटकर्ता अधिकारी नेमले आहे
६	नागपूर	नागपूर	७	०	सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण हे समेटकर्ता अधिकारी म्हणून काम बघतात.
		चंद्रपूर	६	०	माहिती निरंक आहे.
		गडचिरोली	३	०	माहिती निरंक आहे.
		वर्धा	३	०	माहिती निरंक आहे.
		गोंदिया	३	०	माहिती निरंक आहे.
		भंडारा	३	०	माहिती निरंक आहे.
७	अमरावती	अमरावती	७	२	अमरावती जिल्हयात ७ पैकी २ उपविभागांमध्ये समेटकर्ता अधिकारी नेमले आहेत.
		अकोला	७	७	अकोला जिल्हयात ७ उपविभागामध्ये सर्व समेटकर्ता अधिकारी नेमले आहेत.
		यवतमाळ	७	१	यवतमाळ जिल्हयात ७ पैकी १ उपविभागांमध्ये समेटकर्ता अधिकारी नेमले आहे.
		बुलढाणा	६	१	बुलढाणा जिल्हयात ६ पैकी १ उपविभागांमध्ये समेटकर्ता अधिकारी नेमले आहे.
		वाशिम	३	३	वाशिम जिल्हयात ३ उपविभागांमध्ये सर्व समेटकर्ता अधिका-याची नियुक्ती केलेली आहे
एकुण			१७६	५२	

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

प्रारूप अधिसूचना क्रमांक डी-१५.—महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक सीबीसी. १०/२०१२/प्र.क्र. १६५/मावक, दिनांकित २१ जुलै २०१२.

आणि

अंतिम अधिसूचना क्रमांक २३.—महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक सीबीसी. १०/२०१२/प्र.क्र. १६५/ मावक, दिनांकित १ सप्टेंबर २०१२.

उद्देश :—

सदरहू अधिसूचना निर्गमित करण्यामागील उद्देश व कारणे यांची मिमांसा विभागाने खालीलप्रमाणे विषद केली आहे.

महाराष्ट्र शासनाने सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २३ हा **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक २३ मे २००१ रोजी प्रसिद्ध केला. त्यानुसार राज्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्ती यांना जातीचे प्रमाणपत्र देणे व अशा प्रमाणपत्राची पडताळणी करणे या बाबींचे विनियमन करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तद्अनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम, २००० लागू करण्यात आला. तरी संबधित कामकाज कशा रितीने अनुसरावे याबाबतची कार्यपद्धती नियमावली नसल्यामुळे वेळोवेळीच्या शासन निर्णय/परिपत्रक इ. अन्वये विहित करण्यात आली आहे. उपरोक्त जाती पडताळणी अधिनियमातील कलम १८ नुसार राज्य शासनास प्रस्तुत प्रकरणी नियम तयार करण्याचे अधिकार आहेत.

दिनांक २१ मे, २०११ रोजी तत्कालीन मा. मुख्य सचिव यांच्याकडे झालेल्या बैठकीत जात पडताळणीच्या नियमावलीत सुसूत्रता आणणे व त्याचे सुलभीकरण होण्याकरिता तयार करण्यात आलेल्या नियमाच्या प्रारुपाचे पुनर्विलोकन करण्याबाबतच्या सूचना दिल्या. त्यास अनुसरून दिनांक ४ जून २०११ च्या पत्रान्वये ७ सदस्यांची समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने वेळोवेळी बैठका घेऊन सुधारित नियमावलीचा मसुदा तयार करतांना प्राप्त हरकती/सूचना, मा. उच्च न्यायालयाने जात प्रमाणपत्र पडताळणी संदर्भातील निर्णय तसेच आदिवासी विकास विभागाने तयार केलेले नियम विचारात घेतले व सदर नियमावलीची सखोलपणे तपासणी करून आवश्यक तेथे सुधारणा केली आहे. विभागामार्फत यापूर्वी जात पडताळणी

नियमावली संदर्भात जे प्रारूप तयार करण्यात आले होते, त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा व सुलभीकरण करून सुधारित नियमाचे प्रारूप तयार केले होते, त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा व सुलभीकरण करून सुधारित नियमाचे प्रारूप तयार केले आहे. सदर प्रारूप मसुदा दिनांक २१ जुलै २०१२ रोजी प्रसिद्ध केला असून दिनांक ७ ऑगस्ट २०१२ पर्यंत जनतेच्या हरकती व सूचना मागविण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार नियमाचा प्रारूप मसुदा दिनांक २१ जुलै २०१२ रोजी प्रसिद्ध केला असून दिनांक ७ ऑगस्ट २०१२ पर्यंत जनतेच्या हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. सदर हरकती व सूचना प्राप्त झाल्यानंतर सदर नियम अंतिमरित्या दिनांक १ सप्टेंबर २०१२ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. सदर प्रारूप अधिसूचना या सचिवालयास दिनांक २४ जुलै २०१२ रोजी प्राप्त झाली आहे. तसेच याच नियमांची अंतिम अधिसूचना या सचिवालयास दिनांक २० ऑक्टोबर २०१५ रोजी प्राप्त झाली आहे.

दिनांक २ ऑगस्ट २०१२ रोजीच्या बैठकीत प्रारूप अधिसूचना समितीच्या विचारार्थ ठेवली असता समितीने विभागाकडून याबाबत जनतेकडून हरकती व सूचना प्राप्त झाल्या असल्यास त्या मागविण्याचा निर्णय घेण्यात आला.

दिनांक २३ ऑगस्ट २०१२ रोजीच्या बैठकीत प्रारूप अधिसूचना समितीच्या विचारार्थ ठेवली असता सदर बैठकीत अधिसूचनेसंदर्भात पुढीलप्रमाणे विचारविनिमय केला.

अधिसूचनेतील नियम २ (च) मध्ये मानीव दिनांक याचा अर्थ अनुसूचित जातींकरिता राष्ट्रपतींच्या आदेशाचा दिनांक १० ऑगस्ट १९५० आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्याकरिता २१ नोव्हेंबर १९६१ आणि इतर मागासवर्ग व विशेष मागसप्रवर्ग यांच्याकरिता १३ ऑक्टोबर १९६७ असा आहे. उपरोक्त कालावधीचा विचार करता ६५ वर्षांपूर्वीचे पुरावे मागविण्यात येतात कारण इंडियन एव्हीडेन्स ॲक्टनुसार ३० वर्षांचा सर्च रिपोर्ट घेण्यात येतो. त्यानुसार जातीचे दाखले व जात पडताळणी प्रमाणपत्र देताना फक्त ३० वर्षांपूर्वीचे पुरावे घ्यावेत, असे मत समितीने व्यक्त केले.

अधिसूचनेच्या पृ. क्र. १ वर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग असे नमूद केलेले असले तरी अधिसूचनेतील पुढील सर्व पृष्ठ क्रमांकावर अनुसूचित जमाती हा शब्द वगळण्यात आलेला आहे आणि बौद्ध धर्मांतरित अनुसूचित जाती हा शब्द नमूद करण्यात आलेला आहे. अनुसूचित जमाती हा शब्द नजर चुकीने वगळला गेलेला आहे काय किंवा त्यासाठी वेगळे नियम तयार करण्याचा विभागाचा विचार आहे काय यासंदर्भात माहिती घेणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

नियम २ (१) (ठ) मध्ये 'पुरेसा आगाऊ वेळ, याचा अर्थ लाभ मिळण्यापूर्वी किमान ६ महिने किंवा शासनाने **राजपत्रात** अधिसूचित केल्याप्रमाणे असा आहे, याचा अर्थ ६ महिन्यांत जातीचा दाखला द्यावा असा होतो. ६ महिन्यांचा वेळ जास्त आहे असे मत समितीने व्यक्त केले. जातीचे दाखले ठराविक वेळेत मिळत नाहीत. जी कार्यालये दाखल्याचे वाटप करते त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू झाला असून यामध्ये दाखले देणारी यंत्रणा, दक्षता पथके यांचा समावेश आहे. या कायद्यानुसार या बाबी होऊ नयेत यासाठी काही नियंत्रण घालता येईल काय याचा देखील विचार करणे आवश्यक आहे, असे अभिप्राय व्यक्त केले.

समितीने वर नमूद केलेल्या अभिप्रायांच्या अनुषंगाने सामाजिक न्याय विभागाकडून माहिती मागविण्यात आली तसेच 'एकाच अधिनियमांतर्गत दोन (किंवा त्यापेक्षा अधिक) वेगवेगळे नियम तयार करणे हे कायदेशीररित्या वैध आहे काय? याबाबत विधी व न्याय विभागाकडूनही अभिप्राय मागविण्यात आले होते. तद्संदर्भात सामाजिक न्याय विभागाने दिलेली माहिती **परिशिष्ट 'अ'** मध्ये सादर करण्यात आली असून उक्त बाबी संदर्भात विधी व न्याय विभागाने असे अभिप्राय दिले की, आदिवासी विकास विभाग हा अनुसूचित जमाती या विषयाचा संबंधित प्रशासकीय विभाग आहे आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग हा अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या विषयाचा संबंधित प्रशासकीय विभाग आहे. तथापि, आदिवासी विकास विभागाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संमतीने सर्व प्रवर्गासाठी 'महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा. २३, हा अधिनियमित केलेला आहे. उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीनुसार 'महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००१, याचे प्रारूप नियम आदिवासी विकास विभागाने दिनांक २६ डिसेंबर २००१ ला **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध केलेले होते.

प्रारूप नियमात काही सुधारणा करणे आवश्यक आहे काय व याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि आदिवासी विकास विभागाचे मंत्री महोदय व माननीय आमदार यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात यावी असा प्रस्ताव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने मांडला होता. तथापि, माननीय मंत्री (आदिवासी विकास विभाग) यांनी दिनांक २७ डिसेंबर २००२ ला असे निर्देश दिले की, अनुसूचित जमाती बाबत आदिवासी विकास विभागाने नियमावली पूर्वीच तयार केलेली आहे व त्यामुळे सामाजिक न्याय विभागाने इतर प्रवर्गाचे नियम करावेत.

आदिवासी विभागाने **'महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन), नियम २००३'** हे नियम अंतिमतः दिनांक ४ जून २००३ रोजी निर्गमित करून दिनांक ५ जून २००३ ला **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध केले.

तद्नंतर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने याचे नवीन सुधारित प्रारुप नियम दिनांक २१ जुलै, २०१२ ला **राजपत्रात** प्रसिद्ध केले व **'महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२** हे अंतिम नियम दिनांक १ सप्टेंबर २०१२ रोजी निर्गमित करून दिनांक ३ सप्टेंबर २०१२ ला **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध केले.

महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (१९४९ चा २५), महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५३ चा ३), महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा ४१) इत्यादी, अधिनियमांच्या बाबतीत सुद्धा एकाच अधिनियमांतर्गत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेगवेगळे नियम तयार करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३), महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम (१९५८ चा ६०) इत्यादी, अधिनियमांच्या अंतर्गत सुद्धा दोन वेगळ्या विभागांनी वेगवेगळ्या अधिसूचना निर्गमित केलेल्या आहेत.

सबब, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००, या एकाच अधिनियमांतर्गत वरिलप्रमाणे दोन वेगवेगळे नियम तयार करावे असे आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, या दोन्ही संबंधित प्रशासकीय विभागांनी आपसात ठरविलेले असल्यामुळे, सदर प्रकरणाकरिता एकाच अधिनियमांतर्गत दोन (किंवा त्यापेक्षा अधिक) वेगवेगळे नियम तयार करणे हे कायदेशीरदृष्ट्या वैध आहे. सदर माहिती व अभिप्राय समितीने विचारात घेतले.

दिनांक ६ नोव्हेंबर २०१३ रोजीच्या बैठकीत सदर अधिसूचना समितीच्या विचारार्थ ठेवली असता सामाजिक न्याय विभागास जनतेकडून प्राप्त झालेल्या हरकती व सूचना समितीसमोर सादर करण्यात आल्या. समितीने अधिसूचनेसंदर्भात सदर बैठकीत पुढीलप्रमाणे विचारविनिमय केला.

विभागाने याबाबतचे नियम तयार केले असले तरी अनेक वेळा कार्यपालन व्यवस्थेकडून त्याचे काटेकोरपणे पालन केले जात नाही व त्यामुळे प्रमाणपत्र मिळण्यास दिरंगाई होते. विद्यार्थ्यांना व निवडणुकीच्या उमेदवारांना याचा जास्त त्रास होत असतो. नियमात अर्ज स्वीकारणे व त्यापुढील कार्यवाहीसंबंधीचे नियम आहेत आणि त्यासाठी कालमर्यादाही निश्चित केली आहे. परंतु, अनेक वेळा असा अनुभव येतो की, अर्ज प्राप्त झाल्यानंतर मुदतीच्या शेवटी अर्जदाराला त्रुटी कळविल्या जातात व त्याची पूर्तता करण्यास सांगितले जाते. यामुळे विनाकारण कालापव्यय होतो व अर्जदाराला ज्या कारणासाठी प्रमाणपत्र हवे असते, ते

काम होत नाही. अर्जदारांना कार्यालयांमध्ये अनेक वेळा हेलपाटे मारावे लागतात. यासाठी अर्जदार अर्ज सादर करण्यासाठी कार्यालयात आल्यानंतर त्याचवेळी तो अर्ज योग्य पद्धतीने भरलेला आहे किंवा नाही, त्यामध्ये काही त्रुटी आहेत का, योग्य कागदपत्रे जोडली आहेत का, याची तपासणी संबंधित कर्मचारी किंवा अधिकाऱ्यांने केली पाहिजे आणि त्यानंतरच अर्ज स्वीकारला पाहिजे. जेणेकरून अर्जदाराला त्याचवेळी त्रुटी लक्षात येतील व त्यांना वेळेवर जात पडताळणी प्रमाणपत्र मिळू शकेल.

जात पडताळणी संदर्भातील नियम क्लिष्ट असून सामान्य लोकांना ते समजण्यासारखे नाहीत. त्यामुळे नियमांमध्ये सुटसुटीतपणा आणला पाहिजे. आतापर्यंत विभागाकडे जात पडताळणी प्रमाणपत्रांबाबत कोणकोणत्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत व त्याबाबत विभागाने कोणती उपाययोजना केली आहे, याबाबतची माहिती देखील विभागाकडून मागविण्याचा समितीने निर्णय घेतला.

जात पडताळणी समितीची कार्यालये पूर्वी विभागीय स्तरावर होती. आता शासनाने जिल्हास्तरावर कार्यालये सुरू केली आहेत. तथापि, ही कार्यालये भाड्याच्या जागांमध्ये शहरात कोठेतरी असतात व त्याची माहिती सामान्य माणसांना नसते. त्यामुळे ही सर्व कार्यालये समाजकल्याण अधिकारी यांच्या कार्यालयीन इमारतीतच असली पाहिजेत. तसेच, या कार्यालयात पुरेसे मनुष्यबळ व अन्य सुविधा उपलब्ध करणे देखील आवश्यक आहे.

दिनांक १३ नोव्हेंबर २०१३ रोजीच्या बैठकीत समितीने विषद केले की, जातीचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सर्वसामान्य लोकांना खूप लांब जावे लागते. जात पडताळणी समिती जिल्ह्याच्या ठिकाणी असते. सन २००१ चे विधेयक आपण मंजूर केलेले आहे. असे असताना जात प्रमाणपत्र पडताळणी संबंधातील नियम, २००१ मध्ये का करण्यात आले नाही, गेल्या १२ ते १३ वर्षांत नियम न करण्याचे कारण काय आहे? अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांच्यासाठी एकच नियम असताना अनुसूचित जमातीसाठी स्वतंत्र नियम का करण्यात आले आहेत? जात पडताळणी समितीकडे एक लाखा पेक्षा जास्त अर्ज पडून आहेत. किती दिवसांत जात प्रमाणपत्र द्यावे या संबंधातील मुदत कायद्यामध्ये असताना देखील लाखांच्या वर अर्ज जात पडताळणी समितीकडे पडून आहेत. तेव्हा कायद्यामध्ये असलेल्या तरतुदी नुसार जात पडताळणीची प्रकरणे निकालात काढण्याच्या दृष्टीने विभागाने कोणते प्रयत्न केले आहेत? जात पडताळणी समितीवर काही अधिकाऱ्यांना नेमले तरीही अजूनही या समितीवरील अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. जात पडताळणी समितीवर तीन सदस्य असतात. त्यातील काही पदे रिक्त आहेत. ज्या अधिकाऱ्यांची या समितीवर नियुक्ती केली आहे ते अधिकारी समितीच्या बैठकीला येत नाहीत. त्यामुळे या समितीच्या नियमित बैठका होत नाही या संबंधी नियमात कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी जात प्रमाणपत्राची

आवश्यकता असते. एवढेच नव्हे तर शासकीय सेवेत नोकरीसाठी आणि शालेय विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत घेण्यासाठी जात प्रमाणपत्राची आवश्यकता असते. दरवर्षी लाखो विद्यार्थ्यांना जातीचे दाखले घ्यावे लागतात. तसेच निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना देखील जातीचे प्रमाणपत्र द्यावे लागते. निवडणुकीच्या अर्जासोबत जातीचा दाखला जोडावा लागतो. त्या अनुषंगाने या नियमाखाली करण्यात आलेली तरतूद आणि ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद व नगरपालिकेच्या कायद्यात करण्यात आलेली तरतूद पाहून सुधारणा करावी लागेल असे समितीने मत व्यक्त केले.

अर्जदाराच्या जन्माचा पुरावा असूनही तो जात पडताळणीसाठी ग्राह्य धरला जात नाही. यासाठी अर्जदाराकडे वडिलांचा, आजोबांचा, पणजोबांचा दाखला मागितला जातो. तसेच, महिला लग्न झाल्यानंतर पतीच्या घरी जाते. तिला जेव्हा जात प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा लागतो तेव्हा तिला आपल्या मूळ गावी, तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. तिला देखील वडिलांचा, आजोबांचा, पणजोबांचा दाखला जोडावा लागेल. या नियमामध्ये जोडपत्र जोडले आहे. त्यात विद्यार्थ्यांसाठी वेगळे आणि निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांसाठी स्वतंत्र असे तीन प्रकारचे शपथपत्राचे नमुने दिलेले आहेत, असे करण्याचे कारण काय आहे? नुकताच सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे की, उप विभागीय अधिकाऱ्यांना जात प्रमाणपत्र देण्याचा अधिकार देण्यात यावा. सहा महिन्यांच्या आत जात पडताळणीचा दाखला देण्यात यावा अशा प्रकारची तरतूद कायद्यामध्ये करण्यात आलेली आहे. परराज्यातील नागरिकही आपल्या राज्यात स्थायिक झालेले आहेत. घटनेप्रमाणे कलम ३४० अन्वये अनुसूचित जाती, जमातीसाठी शासनाने संरक्षण दिलेले आहे. अनुसूचित जाती, जमातीचा आर्थिक भार केंद्र शासन सहन करीत असते. परंतु विमुक्त जाती व भटक्या जमातींसाठीचा आर्थिक भार राज्य शासनास सहन करावा लागतो. विमुक्त जाती व भटक्या जमातींसाठी केंद्र सरकार आर्थिक भार सहन करीत नाही. उदाहरणच द्यावयाचे झाले तर वंजारा समाज हा केंद्र सरकारच्या यादीमध्ये ओबीसीमध्ये गणला जातो. परंतु तोच समाज राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमातीमध्ये गणला जातो. केंद्र सरकार आणि राज्य सरकारमध्ये हा जो काही फरक आहे त्यासंदर्भातील नियमात अद्यापपावेतो दुरुस्ती झालेली नाही.

जातीच्या दाखल्याच्या संदर्भात उमेदवारांकडून ५० वर्षांपूर्वीच्या मूळ गावाचा दाखला मागितला जातो. अनेक लोकांच्या किती तरी पिढ्या मुंबईत वाढलेल्या आहेत. त्यामुळे त्यांनी मूळ गावाचा दाखला कोठून आणावयाचा? तसेच दाखल्यासाठी मुदत सुद्धा घालून दिलेली आहे. ५० वर्षांपूर्वीचे पुरावे जतन करणे साधी गोष्ट नाही. मुंबईमध्ये २६ जुलै २००५ रोजी जी अतिवृष्टी झाली होती त्यामध्ये किती तरी लोकांची कागदपत्रे वाहून गेलेली आहेत. त्यामुळे ज्या लोकांची कागदपत्रे वाहून गेलेली आहेत ती त्यांनी कोठून आणावयाची या प्रकरणी ज्या काही अडचणी आहेत त्या खऱ्या अर्थाने सोडवाव्या लागणार आहेत.

वाल्मिकी, पासी या समाजाचे लोक १०० वर्षांपासून महाराष्ट्रात रहात आहेत. या समाजातील लोक वर्षानुवर्षे सफाईची कामे करीत आहेत. या समाजातील आताच्या नवीन पिढीला आपले मूळ गाव कोणते हे देखील माहित नाही. वाल्मिकी समाजातील लोकांचा नुकताच एक मेळावा घेण्यात आला होता. हा समाज मूळचा हरयाणातील आहे. महाराष्ट्रामध्ये या समाजातील लोक वर्षानुवर्षे रहात आहेत. त्यामुळे स्थलांतरित झालेल्या महाराष्ट्रीय लोकांनी जात प्रमाणपत्र कोणाकडून प्राप्त करून घ्यायचे हा देखील एक महत्त्वाचा विषय आहे.

जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यासंबंधात विलंब केला तर संबंधितास शिक्षा देण्याची तरतूद आंध्रप्रदेश सरकारने कायद्यामध्ये केली आहे. एवढेच नव्हे तर आंध्रप्रदेश सरकारने अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांच्या कल्याणासाठी राखून ठेवलेला निधी दुसरीकडे वळवायचा नाही, अशा प्रकारची तरतूद कायद्यान्वये केलेली आहे. विहित वेळेमध्ये जात पडताळणी केली नाही तर शिक्षेची तरतूद आंध्रप्रदेश सरकारने केली आहे. या संदर्भात नियमात काही तरतूद करता येईल काय? याचा देखील विचार करावा, असे मत समितीने व्यक्त केले.

उपविधान समितीच्या दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या उक्त बैठकीत समितीने सदर अधिसूचनेसंदर्भातील यापूर्वी व्यक्त केलेल्या बाबींसंदर्भात व विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार दिनांक १८ नोव्हेंबर २०१५ रोजीच्या बैठकीत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

उपरोक्त विषयाबाबतची अंतिम अधिसूचना विभागाने सन २०१२ मध्ये प्रसिद्ध केली. ती अंतिम अधिसूचना समितीने मागणी केल्यानंतर उपविधान समितीला दिनांक २० ऑक्टोबर २०१५ रोजी प्राप्त झाली. याबाबत समितीने विचारणा केली असता, या प्रकरणी विभागीय प्रतिनिधींनी अधिसूचना विधानमंडळाकडे पाठविण्यास उशीर झालेला असल्याचे मान्य केले व असे स्पष्ट केले की, त्यावेळी सर्वोच्च न्यायालयात एक केस सुरू होती. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाकडून उपरोक्त विषयाबाबत नियमावली केली आहे किंवा कसे याबाबत विचारणा होत असल्याने नियमावली तयार करण्यात आली. या सर्व प्रकरणामध्ये सदर नियमावली उपविधान समितीसमोर सादर करावयाचे राहून गेल्याचे त्यांनी मान्य केले. **या प्रकरणात विभागाने तयार केलेले अंतिम नियम वेळीच उपविधान समितीला सादर न केल्याबाबत समितीने नापसंती व्यक्त केली.**

जातपडताळणी करतांना मानीव दिनांकानुसार पुरावे मागितले जातात. तथापि इंडियन एव्हिडंस ॲक्टनुसार ३० वर्षांचे पुरावे ग्राह्य धरले जातात तेव्हा मानीव दिनांकाबाबत आपले म्हणणे स्पष्ट करावे तसेच मागासवर्गीयांचे दावे अवैध ठरविले जात नाहीत असे उत्तरामध्ये नमूद केले आहे. तथापि, जात पडताळणीची

अनेक प्रकरणे प्रलंबित राहतात याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, मानीव दिनांक हे प्रेसिडेन्शीअल ऑर्डरने निश्चित केले आहेत. जी प्रकरणे प्रलंबित असतात त्या प्रकरणात तपासणीकरिता जास्त कालावधी लागतो. या प्रकरणी अभ्यास केला असता, १९५० हे वर्ष मानीव दिनांक अनुसूचित जातीसाठी आहे ते प्रेसिडेन्शीअल ऑर्डरप्रमाणे आहे. मानीव दिनांकापूर्वीचे जातीचे पुरावे जात प्रमाणपत्र देणाऱ्या व त्यांची तपासणी करणाऱ्या प्राधिकाऱ्यांकडून ठोस पुरावे म्हणून मागवित असले तरी खऱ्या मागासवर्गीयांकडे मानीव दिनांकापूर्वीचे पुरावे उपलब्ध नसतील तर केवळ याच कारणासाठी त्यांची अडवणूक केली जाते असे होत नाही किंवा खऱ्या मागासवर्गीयांचे दावे अवैध ठरविले जात नाहीत. तेव्हा मानीव दिनांकाच्या अटी शिथील करण्याची आवश्यकता नाही.

आरक्षणाचा फायदा मिळविण्यासाठी ग्रामपंचायतीचा तलाठी, नगरसेवक, शाळेचा किंवा स्थानिक जातीनिहाय संस्थेचा बनावट दाखला व्यक्तींना मिळू लागल्याचे निदर्शनास येत असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, मानीव दिनांकाची चौकशी व तपासणी व्यवस्थित झाली तर, तो स्थापित होतो.

समितीने अशी विचारणा केली की, विधिमंडळात असा निर्णय घेतला होता की, जात पडताळणी समित्यांबाबत अपर जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर हे अधिकार द्यायचे. परंतु याची अंमलबजावणी झालेली नाही. याबाबत विभागीय सचिवांनी असे स्पष्ट केले की, कायद्यात अशी तरतूद आहे. तथापि, या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने निदेश दिले की, 'Joint Secretary of the Government or equivalent'. यासंदर्भात अपर जिल्हाधिकारी हे त्या स्तरावरील अधिकारी होत नाहीत. अपर जिल्हाधिकारी हे सिलेक्शन ग्रेडचे असतात. या संदर्भात महसूल विभागासमवेत बैठक घेतली. त्यामध्ये सामाजिक न्याय विभागाने मागणी केली की, ३६ जिल्हावार जात पडताळणी समितीचा शासन निर्णय काढण्यात आलेला असून आपण आम्हाला ३० तरी अपर जिल्हाधिकारी (निवड श्रेणी) पदाचे द्यावेत व ६ पदे दुसरीकडून भरण्यात येतील. आता ३० पदे ही कॅडरमध्ये वाढवून घेतली आहे. त्यांची डीपीसी करून ३० अधिकाऱ्यांना पदोन्नतीची मुभा पण मिळेल. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार जॉईंट सेक्रेटरी या पदाचा किंवा या पदाचा पगार केवळ अपर जिल्हाधिकारी (निवड श्रेणी) यांना मिळतो. सचिवांनी ३० पदांचे कॅडर वाढविले आहे व जसे त्यांची पदोन्नती होईल तेव्हा लगेच ते जात पडताळणी समितीला उपलब्ध होतील.

जात पडताळणीकरिता महसूल विभागाचेच अधिकारी का घेण्यात येतात, समाजकल्याण विभागाचे अधिकारी कोणत्या कारणास्तव उपलब्ध करून दिले जात नाही याची विचारणा समितीने केली असता विभागाने असे स्पष्ट केले की, फिल्डमध्ये महसूल विभागाचे अधिकारी कार्यरत असतात. जर जॉईंट सेक्रेटरी मंत्रालयाचा पाठविला तर अमूक ठिकाणी जाणार किंवा नाही असे बरेचसे प्रश्न निर्माण होतात. जे फिल्डचे अधिकारी असतात त्यांची नियमित पोस्टींग फिल्डमध्ये होत असते.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या प्रकरणात माधुरी पाटील विरुद्ध अपर आयुक्त या प्रकरणात न्यायालयाचे काय निर्देश आहेत. उप विभागीय अधिकारी, उप जिल्हाधिकारी किंवा उप आयुक्त दर्जाचे अधिकारी जात प्रमाणपत्राकरिता देण्यात येत आहेत, याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी विदित केले की, उप विभागीय अधिकारी, उप जिल्हाधिकारी किंवा उप आयुक्त दर्जाचे अधिकारी हे जात प्रमाणपत्रासाठी आहेत व जात पडताळणीसाठी Joint Secretary to Government or equivalent असे मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिलेले आहेत.

जातीचा दाखला विहित वेळेत मिळण्यासाठी काही तरतूद करता येत नाही का ? जातीचा दाखला मिळण्याच्या दृष्टीने सेवा हमी कायद्यात सुधारणा येईल पण त्या कायद्याची नियमावली अद्यापपर्यंत तयार झाली नाही अशी विचारणा समितीने केली असता विभागाने स्पष्ट केले की, सेवा हमी कायद्यात आम्ही जात प्रमाणपत्र देण्यासाठी कालमर्यादेची तरतूद करणार आहोत.

४५ दिवसांच्या आत जातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे व तीन महिन्यामध्ये जातीचे वैधता प्रमाणपत्र देण्यात यावे. जर समितीने या कालावधीत प्रमाणपत्र दिले नाही तर त्यांना शास्ती काय आहे? यामध्ये कालमर्यादा घातलीच पाहिजे. प्रलंबित प्रकरणे खूप असून त्यावर लवकर निर्णय घेतले जात नाहीत असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, याबाबत सेवा हमी कायद्यात तरतूद करण्यात येईल.

नाशिक विभागातील नगरपंचायतीमधील सर्व लोकांनी वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्ताव नाशिक येथे सादर केलेले आहेत. याप्रकरणी पुढे काय प्रक्रिया आहे. जिल्हा स्तरावर जे अधिकारी नेमले आहेत ते नाशिकचे प्रस्ताव ट्रान्सफर करणार आहेत की, वैधता प्रमाणपत्र तेच देणार आहेत अशी समितीने विचारणा केली असता विभागाने असे स्पष्ट केले आहे की, प्रस्ताव डी सेंट्रलाईज झाल्यानंतर ट्रान्सफर करतील. जिल्हयाची जी जातपडताळणी समिती आहे तीच प्रमाणपत्र देईल. ट्रान्सफर्ममेशन करण्याची रुपरेषा आम्ही सध्या केलेली नाही. आज जे १५ अधिकारी आहेत ते एकदम ३६ होतील. ज्या केसेस आहेत त्या जिल्हावार करायच्या किंवा नाही याचा एक आराखडा तयार करीत आहोत.

या प्रकरणी समितीने अशी सूचना केली की, ज्या निवडणूका झाल्या, यामध्ये जे सदस्य निवडून आले त्यांना प्रमाणपत्र तीन महिन्यांमध्ये इश्यु करायला पाहिजे. नाहीतर त्यांचे नगरसेवक पदच अपात्र होऊ शकते. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी लगेच कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.

समितीने अशी बाब निदर्शनास आणली की, चंद्रपूर जिल्ह्यातील राजूरा तालुका हा नांदेड जिल्ह्यामध्ये होता. त्यामुळे जातीच्या दाखल्यांचा सर्व रेकॉर्ड नांदेड येथे गेला. आता राजूरा तालुका चंद्रपूर जिल्ह्यामध्ये समाविष्ट झाल्यामुळे रेकॉर्ड कुठेच नाही. त्यामुळे पूर्वीचा ५० वर्षांचा जो रेकॉर्ड मागतात तो त्यांच्याकडे उपलब्ध नसतो. या कारणांमुळे मुलांना नोकरी करतांना खूप अडचणी येतात. याबाबत सामाजिक न्याय

मंत्री महोदयांना याबाबत बैठक घेण्यासाठी पत्र पाठविलेले आहे. निवडणुकीसाठी मुलांना जातीचे दाखले मिळतच नाहीत.

या प्रकरणी एक बैठक घ्यावी लागेल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर साक्षीदरम्यान समितीने काही मुद्द्यांबाबत अधिक माहिती घ्यावी असे सुचविल्याने सामाजिक न्याय विभागास सदर मुद्द्यांबाबत प्रश्नावली तयार करून पाठविण्यात आली व त्या संदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने विभागीय सचिवांची दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी पुन्हा साक्ष घेण्यात आली. विभागाकडून प्राप्त झालेली माहिती **परिशिष्ट 'ब' व परिशिष्ट 'क'** मध्ये सादर करण्यात आली आहे.

सदर साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्ह्यातील लोकांना विभागीय कार्यालयापर्यंत हे दाखले घेण्याकरिता यावे लागते. असे न होता प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी अशाप्रकारे दाखले व प्रमाणपत्र सामान्य माणसांना मिळाले पाहिजे, याकरिता या कायद्याची निर्मिती केली गेलेली आहे. विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, सदरहू पदनिर्मितीचा प्रस्ताव व त्यावरील कार्यवाही चालू आहे. सरकारने अशी भूमिका मांडली होती की, सर्वसामान्य नागरिकांना जिल्ह्याच्या ठिकाणी दाखले व प्रमाणपत्र मिळणे सुलभ होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने या कार्यवाही करिता अपर जिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी जिल्ह्याच्या ठिकाणी नेमणे आवश्यक आहे. सध्या राज्यामध्ये एकूण १५ जात पडताळणी समित्या अस्तित्वात आहेत. या संदर्भातील जी.आर. विभागाने काढलेला आहे. ३५ जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारची जात पडताळणी समिती नेमण्याचा जी.आर. विभागाने काढलेला आहे. सदरहू पदनिर्मिती करण्याची कार्यवाही करून हा प्रस्ताव वित्त विभागाकडे मान्यतेकरिता सादर करण्यात आलेला आहे. या संदर्भातील इतर प्रस्तावांना मान्यता देण्याकरिता हाय पॉवर कमिटीपुढे ते सादर केले गेलेले आहेत. या प्रस्तावामध्ये प्रत्येक समितीमध्ये एक अपर जिल्हाधिकारी, सिलेक्शन ग्रेडचा स्टाफ, पोलीस अधिकारी, समाजकल्याण अधिकारी, क्लेरिकल स्टाफ आदि मॅनपॉवर असा आराखडा सादर केलेला आहे. हायपॉवर कमिटीने हा प्रस्ताव मंजूर केला तर सदरहू प्रस्ताव हा मान्यतेकरिता कॅबिनेटसमोर जाईल. कारण की, या समितीमध्ये अपर जिल्हाधिकारी व इतर वर्ग-१ दर्जाचे अधिकारी यांच्या पदमान्यतेकरिता कॅबिनेटची मंजुरी आवश्यक आहे.

जास्तीत जास्त पंधरा दिवस ते एक महिना या कालावधीमध्ये या समित्यांकरिता अपर जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या पदनिर्मितीचे कामही पूर्ण होईल. जात पडताळणी समितीचे काम हे अर्ध-न्यायिक (Quasi judicial) स्वरूपाचे आहे. याकरिता समितीमध्ये काम करणारा अपर जिल्हाधिकारी हा त्या कामाकरिता पात्र व तयारच असला पाहिजे. हे काम अर्ध न्यायिक स्वरूपाचे आहे. ३० पदे महसूल विभागाकडून आणि ६ पदे सामाजिक न्याय विभागाकडून भरली जाणार आहेत. अर्ध न्यायिक स्वरूपातील निर्णय घेण्याचे अधिकार महसूल विभागाकडे असतात. महसुलचे तहसीलदार, उप जिल्हाधिकारी यांना या संदर्भातील कामकाजाचा अनुभव असतो.

याप्रकरणी समितीने दुसरा एक विषय उपस्थित केला की, रायगड जिल्ह्यामध्ये महादेव कोळी जातीचे लोक मोठ्या संख्येने आहेत. या समाजाला जातीचे दाखले देताना भेदभाव होत आहे. रायगड जिल्ह्यातील एका व्यक्तीची रेवदंडा कोर्टामध्ये नेमणूक झाली. त्या नियुक्तीच्या अनुषंगाने जातीचा दाखला सादर करणे आवश्यक होते. पण तहसीलदार आणि एस.डी.ओ. हे त्यांना ते नियमात बसत नाही या कारणास्तव जातीचा दाखला देत नाहीत. गावातील एकाला जातीचा दाखला मिळतो तर दुसऱ्याला मिळत नाही. हा विषय एकाच जातीचा असताना असे होते. पूर्वी जातीच्या दाखल्यांची आवश्यकता नसायची. पण आता नितांत गरज आहे. पूर्वी शाळेमधूनच दाखले उपलब्ध होत होते. कारण शाळेच्या दाखल्यावर जे लिहिले असायचे ते गृहित धरले जात होते. त्यावेळी जातीच्या दाखल्यांसाठी वेगळी यंत्रणा नव्हती.

एखाद्या प्रकरणात जातीचा वाद निर्माण झाल्यास जिल्हाधिकारी यांच्याकडे अपिल केल्यानंतर त्यावरील निर्णयासाठी कालमर्यादा आखून दिली पाहिजे. किमान ९० दिवसांच्या टाईम बाऊन्ड कालावधीत जातीचा दाखला मिळण्याचे काम झाले पाहिजे. निवडणुकांसाठी जातीचा दाखला लागतो त्यामुळे पात्र असणारा उमेदवार निवडणुकीसाठी उभा राहू शकत नाही. परिणामी उमेदवाराला आरक्षणाचा लाभ घेता येत नाही आणि आरक्षणाच्या बाबतीत त्यांच्यावर अन्याय होतो, दुसऱ्याला त्याचा फायदा होतो.

समितीने असे मत व्यक्त केले की, जातीचा दाखला आजही महसूल विभागाच्या तहसीलदार आणि एस.डी.ओ.यांच्यामार्फत दिला जातो. उमेदवाराला निवडणुकीला उभे राहता येत नाही. त्यामुळे यासंबंधी कायद्यामध्येच बदल केला पाहिजे.

यामध्ये आता इयत्ता ९ वी आणि १० वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील जातीचे प्रमाणपत्र लागते. त्यांना ते लवकरात लवकर मिळण्याच्या दृष्टीने कार्यवाही होणे आवश्यक आहे. या प्रकरणी विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, विद्यार्थ्यांच्या बाबतीत शाळांमध्येच त्यांना जातीचे दाखले देण्याचा विषय शासनाच्या विचाराधीन आहे.

महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० हा अधिनियम सन २००० मध्ये अंमलात आला आहे. परंतु या अधिनियमाच्या अनुषंगाने त्यासंदर्भातील नियम हे सन २०१२ मध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहेत. त्यामुळे सदर नियम तयार करण्यास इतका विलंब का झाला? याबाबत विभागाकडून खुलासा मागविण्यात आला होता. विभागाकडून सदर प्रकरणावरील खुलासा प्राप्त झालेला असून तो **परिशिष्ट 'ड'** मध्ये सादर करण्यात आला आहे.

सदर खुलासा समितीने विचारात घेतला व अधिनियमातील तरतुदीनुसार वेळीच नियम बनविणे आवश्यक असतानाही इतक्या विलंबाने नियम बनविले, याबाबत समितीने तीव्र नापसंती व्यक्त केली आहे.

अभिप्राय व शिफारशी :

१. राज्यात जात पडताळणी प्रमाणपत्र संदर्भातील अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. सदर प्रलंबित प्रकरणावरील व नव्याने दाखल करण्यात येणाऱ्या प्रकरणांवरील निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्यामध्ये जात पडताळणी समिती नेमण्याबाबत व जात प्रमाणपत्र पडताळणी विहित मुदतीत मिळण्याकरिता जिल्हावार जात पडताळणी समित्या तात्काळ नेमण्यात याव्यात तसेच सदर समित्यांवर आवश्यक त्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यासंदर्भात शासनाने तात्काळ कार्यवाही करावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात सादर करावी.

२. जातीचे प्रमाणपत्र ४५ दिवसांच्या आत देण्यात यावे व जातीचे वैधता प्रमाणपत्र तीन महिन्यांमध्ये देण्यात यावे अशी तरतूद नियमात करण्यात आलेली आहे. तथापि, विहित कालावधीत जातीचे प्रमाणपत्र वा जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र अर्जदारास मिळत नाहीत त्यामुळे अर्जदाराचे नुकसान होते. विहित मुदतीत जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र मिळणेकरिता या बाबींचा समावेश सेवा हमी कायद्यात करणे आवश्यक आहे. तसेच विहित कालावधीत सदर प्रमाणपत्रे अर्जदारास उपलब्ध न झाल्यास तसेच प्रकरणे प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच त्यांना शास्ती लावण्याबाबतची तरतूद सेवा हमी कायद्यात करण्यात यावी अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यांत देण्यात यावी.

३. नियम क्रमांक २(च) अन्वये 'मानीव दिनांक' याचा अर्थ अनुसूचित जातींकरता राष्ट्रपतींच्या आदेशाचा दिनांक १० ऑगस्ट, १९५० आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्याकरिता दिनांक २१ नोव्हेंबर, १९६१ आणि इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग यांच्याकरिता दिनांक १३ ऑक्टोबर, १९६७ असा आहे. उपरोक्त व्याख्या विचारात घेता विविध समाजातील लोकांना जातीचे प्रमाणपत्र पाहिजे असल्यास त्यांच्याकडे वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्याशी संबंधित असलेल्या दिनांकापासूनचे पुरावे मागितले जातात. सदर पुरावा अर्जदाराच्या जन्मगावी किंवा अन्य ठिकाणी असतो. अर्जदारास मानीव दिनांकापासूनचे पुरावे देणे बंधनकारक आहे. तथापि, अर्जदाराच्या जन्माचा पुरावा असूनही तो जात पडताळणीसाठी ग्राह्य धरला जात नाही. यासाठी अर्जदाराकडे वडीलांचा, आजोबांचा, पणजोबांचा दाखला मागितला जातो. तसेच, महिला लग्न झाल्यानंतर पतीच्या घरी जाते. तेव्हा तिला जेव्हा जात प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा लागतो तेव्हा तिला आपल्या मूळ गावी, तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. तिला देखील वडिलांचा, आजोबांचा, पणजोबांचा दाखला जोडावा लागतो. परंतु काही वेळेला इतके जुने पुरावे उपलब्ध करून देणे शक्य होत

नाही. त्यामुळे अर्जदारास जात प्रमाणपत्र मिळण्यापासून वंचित रहावे लागते व त्यास त्याचा कोणताही लाभ मिळत नाही. हे विचारात घेऊन याबाबत नियमात आवश्यक ती परिणामकारक तरतूद करण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी. तसेच कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तीला जातीचा दाखला मिळाल्यानंतर त्यांच्या वारसांना दाखला मिळावा आणि कार्यपद्धतीतील क्लिष्टता व विलंब दूर व्हावा याबाबत निश्चित धोरण ठरविण्यासठी विधानमंडळ सदस्यांची समिती नियुक्त करण्यात यावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्याच्या आत देण्यात यावी.

४. राज्यातील विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शिक्षणाकरिता व निवडणुकीला उभ्या राहणाऱ्या उमेदवाराला जातीचे प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय निवडणुकीस उभे राहता येत नाही परिणामी त्यांना आरक्षणाचा लाभ घेता येत नाही त्यामुळे अशा उमेदवारांना तसेच विद्यार्थ्यांना देखील जातीचे प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची महिती समितीस एक महिन्यात देण्यात यावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.

५. सदर अधिसूचनेसंदर्भातील अंतिम नियम उपविधान समितीकडे पाठविण्यास झालेल्या विलंबाबाबत समितीने नापसंती व्यक्ती केली असून विभागाने नियम प्रसिद्ध केल्याबरोबर ते उपविधान समितीकडे पाठविण्याबाबत दक्षता घ्यावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.

परिशिष्ट "अ"

महाराष्ट्र शासन
क्रमांक-सीबीसी-१०/२०१२/ प्र.क्र. १६५/मावक
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक ११ सप्टेंबर,२०१२

प्रति,

अवर सचिव,
महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई

विषय - महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २०१२ प्रसिध्द करणारी प्रारुप अधिसूचना क्रमांक-सीबीसी-१०/२०१२/ प्र.क्र. १६५/ मावक दिनांकित २५ जुलै,२०१२

संदर्भ — आपले पत्र क्रमांक-३९१५९/ म.वि.स./उपविधान/ ड-११, दिनाँक ४/९/२०१२

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्रास अनुलक्षून आपण विचारलेली माहिती खालीप्रमाणे आहे :-

मुद्दा क्रमांक-१) अधिनियमामध्ये "अनुसूचित जमाती" चा उल्लेख आहे मात्र नियमांमध्ये "अनुसूचित जमाती" चा उल्लेख नाही. त्याची कारणे काय आहेत.

माहिती- सामाजिक न्याय विभागामार्फत महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग हया प्रवर्गाच्या व्यक्तींना जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यात येते तर अनुसूचित जातीच्या व्यक्तींना आदिवासी विकास विभागामार्फत जमातीचे जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यात येते. आदिवासी विकास विभागाने स्वतंत्र नियम तयार केलेले आहेत. अधिनियम मात्र दोन्ही विभागांसाठी एकच आहे.

मुद्दा क्रमांक-२) नियम २ (च) मध्ये मानवी दिनांक नमूद केलेले आहेत ते आजपासून सुमारे ४५ ते ६२ वर्षे इतके जुने, इतक्या जुन्या कालावधीची कागदपत्रे जमविणे अर्जदाराला शक्य होईलच असे नाही. तसेच यापुढील जसजसा काळ पुढे सरकेल तसतसे अर्जाचा दिनांक व मानीव दिनांक यामधील कालावधी वाढत जाईल त्यामुळे हा कालावधी कमी करण्याच्या दृष्टीने तसेच अर्जाच्या दिनांकाच्या पूर्वी निश्चित स्वरुपाचा कालावधी (साधारणत: अर्जाच्या दिनांकापूर्वी ३० वर्ष अशा स्वरुपाचा) ठरविण्याच्या दृष्टीने विभागाचे काय अभिप्राय आहेत

माहिती - अनुसूचित जातीकरिता मानीव दिनांक हा घटना आदेशाद्वारे मा.राष्ट्रपतींनी दि. १० ऑगस्ट,१९५० असा निश्चित केलेला आहे. त्यामध्ये राज्य शासनास बदल करता येणार नाही. राज्य शासनाला असलेल्या अधिकारान्वये विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्याकरिता दि. २१ नोव्हेंबर,१९६१ आणि इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांचेकरिता दि. १३ ऑक्टोबर,१९६७ असे मानीव दिनांक विहित केलेले आहेत. कारण सदर दिनांकास वरील जाती प्रवर्ग नव्याने निश्चित करण्यात आलेले आहेत.

मुद्दा क्रमांक -३) नियम २ (ठ) मध्ये "पुरेसा आगाऊ वेळ" याची व्याख्या दिलेली आहे. त्यामध्ये "लाभ मिळण्यापूर्वी किमान ६ महिने" असे नमूद केलेले आहे. यामधील लाभ म्हणजे कोणत्या स्वरुपाचा लाभ अपेक्षित आहे.

माहिती- यामध्ये लाभ याचा अर्थ जात वैधता प्रमाणपत्र मिळणे असे अपेक्षित आहे.

मुद्दा क्रमांक -४) तसेच " पुरेसा आगाऊ वेळ" या शब्दप्रयोगाचे उपयोजन कोणत्या नियमामध्ये करण्यात आले आहे, ते स्पष्ट करावे.

माहिती- "पुरेसा आगाऊ वेळ" हा अशा अर्थी वापरण्यात आला आहे की, जसे विद्यार्थ्यांकरिता, निवडणुकीकरिता, शासकीय सेवेकरिता जात प्रमाणपत्र मिळण्याकरिता करावयाचा अर्ज व जात वैधता प्रमाणपत्र मिळणे यामधील कालावधी या अर्थाने केलेला आहे. अर्जदाराने अर्ज दिल्यापासून समितीने तपासून देईपर्यंत जो वेळ लागतो, त्याच अर्थाने पुरेसा आगाऊ वेळ हा शब्दप्रयोग करण्यात आला आहे. अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग जात पडताळणी अधिनियम मधील कलम ६ (२) मध्ये याचा उल्लेख आहे.

मुद्दा क्रमांक -५) सद्यस्थितीत जात पडताळणी समित्या विभागीय स्तरावर आहेत, त्या समित्या जिल्हास्तरावर गठीत करण्यासंदर्भात शासनाचे काय धोरण आहे.

माहिती- याबाबत शासन स्तरावर विचार करण्यात येईल.

मुद्दा क्रमांक-६) शिक्षण, निवडणुका या कारणांसाठी सद्यस्थितीत वेगवेगळी जात पडताळणी प्रमाणपत्रे दिली जातात. त्याऐवजी एका व्यक्तीला एकदाच सर्वसमावेशक सर्वसाधारण स्वरुपाचे प्रमाणपत्र देण्याच्या दृष्टीने शासनाची काय भूमिका आहे.

माहिती- शिक्षण, निवडणुका व सेवा विषयक कारणांसाठी सद्यस्थितीत वेगवेगळे प्रमाणपत्र देण्यात येत नाहीत.

(भा. सु. ताथड)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

परिशिष्ट "ब"

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

उपविधान समिती

प्रश्नावली

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

विषयः- महाराष्ट्र अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन)नियम २०१२ प्रसिध्द करणारी प्रारुप अधिसूचना क्रमांक -सीबीसी १०/२०१२/ प्र.क्र.१६५/मावक, दिनांकित २१ जुलै २०१२ (डी-१५)

तसेच

महाराष्ट्र अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २०१२ प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक-सीबीसी १०/२०१२/ प्र.क्र.१६५/मावक, दिनांकित १ सप्टेंबर २०१२ (अं.-२३)

अ. क्र.	प्रश्नावलीमधील मुद्दा	शासनाचे अभिप्राय
१	प्रारुप अधिसूचना प्रसिध्द केल्यानंतर जनतेकडून प्राप्त झालेल्या हरकती व सूचना अंतिम नियम तयार करताना विचारात न घेण्याची कारणे काय आहेत ?	१. याबाबत प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेवून नियमामध्ये दुरुस्ती करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि तत्कालीन मा.मंत्री (सा. न्या.) यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार व त्यांच्या मान्यतेने प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात न घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
२	आपण दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी जिल्हानिहाय जात पडताळणी समित्या स्थापन करण्याकरिता अपर जिल्हाधिकारी दर्जाचे ३० अधिकारीही नियुक्त करण्यात येणार असल्याचे नमूद केले त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?	२. शासन आदेश दिनांक २/३/२०१५ अन्वये विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी जिल्हानिहाय समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून सदर समित्यांकरिता आवश्यक पदनिर्मितीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. सदर पदनिर्मितीस वित्त विभागाची मान्यता प्राप्त होताच त्यानुसार पदनर्मितीची कार्यवाही करुन जिल्हानिहाय समित्या कार्यान्वित करण्यात येतील. समितीच्या अध्यक्षपदासाठी अप्पर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गातील अधिकारी देण्याची कार्यवाही महसुल व वन विभागाकडून सुरु असून जिल्हानिहाय समित्या कार्यान्वित केल्यावर अप्पर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गातील ३० अधिकारी महसुल व वन विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात येतील.

३	नॉन क्रिमिलेअरसाठी ६ लाख रुपयांची मर्यादा करणेसंदर्भात काय कार्यवाही करण्यात आली आहे ?	३. शासन निर्णय दिनांक २४ जून २०१३ अन्वये नॉन क्रिमिलेअर साठी असलेली वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ४.५० लक्षवरुन रु. ६ .०० लक्ष इतकी वाढ करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर आदेश दिनांक १६ मे २०१३ पासून अंमलात आलेले आहेत. विजाभज, इमाव, विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राज्यपुरस्कृत मॅट्रीकोत्तर शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्यांच्या पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ४.५० लक्षवरुन रु. ६.०० लक्ष करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी विहित मार्गाने सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यानुषंगाने दिनांक २ डिसेंबर २०१५ रोजी मा.मंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मा.मंत्री (वित्त) यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांसमोर सादरीकरण करण्याचे सूचित केले आहे. सादरीकरण करण्याच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्रीमहोदयांच्या सोयीचा दिनांक व वेळ मिळविण्यासाठी मा.मंत्री (सा. न्या.) यांच्यामार्फत नस्ती सादर करण्यात आली आहे.
४	जातीचा दाखला तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र विहित मुदतीत मिळणे हया दोन बाबींचा समावेश सेवा हमी कायद्यात करणेबाबत विभागाने कार्यवाही केली आहे काय ? नसल्यास का केली नाही ? याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.	४. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २००५ अंतर्गत महसुल व वन विभागाकडून जात प्रमाणपत्र व सामाजिक न्याय विभागाकडून जात प्रमाणपत्र पडताळणी या सेवा विहित मुदतीत मिळणेबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.
५	निवडणुका झाल्यानंतर जे उमेदवार निवडून येतील त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र निकालानंतर तीन महिन्यांच्या आत उपलब्ध करुन देण्यासंदर्भात विभागाचे अभिप्राय देण्यात यावे.	५. महाराष्ट्र अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २०१२ मधील नियम १८ अन्वये जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून जात प्रमाणपत्राच्या वैधतेबाबतचा निर्णय ३ महिन्याच्या अवधीमध्ये घेण्यात येईल आणि अपवादात्मक परिस्थितीत २ महिन्याचा जास्तीचा कालावधी समितीस देण्यात आलेला आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीवर अध्यक्ष हे अप्पर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गातील असल्याने त्यांची नियुक्ती महसुल व वन विभागाकडून करण्यात येते. सध्या अध्यक्षपदाची पदे मोठया प्रमाणावर रिक्त असल्यामुळे समितीच्या कामकाजावर परिणाम होत आहे. त्यामुळे काही प्रकरणामध्ये ३ महिन्यामध्ये निर्णय घेणे अडचणीचे होत आहे. काही शंकास्पद प्रकरणामध्ये दक्षता पथकाकडून गृह चौकशी करुन निर्णय घ्यावयाचा असल्यामुळे अशा प्रकरणामध्येही समितीस विहित मुदतीत निर्णय घेणे अडचणीचे होत आहे. अशा प्रकरणासाठी २ महिन्याचा जास्तीचा कालावधी विहित करण्यात आलेला आहे.

परिशिष्ट "क"

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

उपविधान समिती

प्रश्नावली

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

प्रारूप अधिसूचना क्रमांक डी-१५

विषयः- महाराष्ट्र अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २०१२ प्रसिध्द करणारी प्रारूप अधिसूचना क्रमांक सीबीसी१०/२०१२/ प्र.क्र.१६५/मावक, दिनांकित २१ जुलै २०१२

अ.क्र.	प्रश्नावलीमधील मुद्दा	शासनाचे अभिप्राय
१	उपरोक्त नियमांची अंतिम अधिसूचना दिनांक १ सप्टेंबर, २०१२ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून ती उपविधान समितीसमोर दिनांक २० ऑक्टोंबर, २०१५ रोजी सादर करण्यात आली. सदर अधिसूचना दिनांक १ सप्टेंबर, २०१२ ला प्रसिध्द करण्यात आल्यानंतर ती लगेचच उपविधान समितीसमोर/ विधानमंडळा-समोर सादर करणे आवश्यक असतानाही ती ३ वर्षानंतर सादर करण्यात आली ही बाब अतिशय गंभीर आहे. तरी सदर अंतिम अधिसूचना सादर करण्यास विलंब का झाला याबाबत खुलासा करावा.	यासंदर्भात नमुद करण्यात येते की, महाराष्ट्र अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २०१२ प्रारूप अधिसुचना दि. २७ जुलै २०१२ च्या ७५ प्रती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. तथापि अंतिम अधिसूचनेच्या प्रती महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयास देण्याचे अनावधनाने राहून गेल्याचे दिसून येते. याबाबत दिलगिरी व्यक्त करण्यात येत आहे. तसेच यापुढे अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.
२	उपरोक्त प्रारुप अधिसूचनेमध्ये नियम क्रमांक २(च) अन्वये "मानीव दिनांक" याचा अर्थ अनुसूचित जातींकरता राष्ट्रपतींच्या आदेशाचा दिनांक १० ऑगस्ट, १९५० आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्याकरिता दिनांक २१ नोव्हेंबर,१९६१ आणि इतर मागासवर्ग व	सदर मानीव दिनांकापुर्वीचे कागदोपत्री पुरावे हे जातीचा दर्जा / प्रवर्ग निश्चितीसाठी व महाराष्ट्रातील मुळ वास्तव्य ठरविण्यासाठी आवश्यक आहेत. मानीव दिनांकापूर्वी आरक्षणाचे फायदे मिळत नसल्याने जातीमध्ये व जातींच्या नोंदीमध्ये बदल करण्याची प्रवृत्ती नव्हती. विविध अभिलेख्यांमध्ये खऱ्या जातीच्या नोंदी होत असत. मात्र मानीव दिनांकापासून आरक्षणाच्या

	विशेष मागासप्रवर्ग यांच्या करिता दिनांक १३ ऑक्टोंबर, १९६७ असा आहे. उपरोक्त व्याख्या विचारात घेता विविध समाजातील लोकांना जातीचे प्रमाणपत्र पाहिजे असल्यास त्यांच्याकडे वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्याशी संबंधित असलेल्या दिनांकापासूनचे पुरावे मागितले जातात. तथापि इतके जुने पुरावे उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. त्यामुळे स्थलांतरीत झालेल्या व सतत भटकंतीवर असलेल्या लोकांना जात प्रमाणपत्र मिळत नाही. त्यामुळे नियम २ (च) मध्ये नमूद केलेल्या मानीव दिनांकात शिथिलता आणण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे?	लाभासाठी जातीच्या नोंदीत बदल करण्यात येत असल्याचे तसेच आरक्षणाचा फायदा मिळविण्यासाठी ग्रामपंचायतीचा, तलाठी, नगरसेवक, शाळेचा किंवा स्थानिक जाती निहाय संस्थेचा बनावट जाती दाखलाही व्यक्ती मिळवू लागले असल्याचे निदर्शनास येत आहे. विविध प्रवर्गातील जातीच्या यादीमधील नामसादृष्याचा फायदा घेणाऱ्या बिगर मागासवर्गीय जातीचे लोक गैरफायदा घेऊ लागल्याने अशा बोगस व्यक्तीवर आळा घालण्यासाठी व खऱ्या मागासवर्गीयाना न्याय मिळवून देण्यासाठी जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांची निर्मिती झाली आहे. मानीव दिनांकापूर्वीचे जातीचे पुरावे जात प्रमाणपत्र देणाऱ्या व त्यांची तपासणी करणाऱ्या प्राधिकाऱ्यांकडून ठोस पूरावे म्हणून मागवित असले तरी खऱ्या मागासवर्गीयांकडे मानीव दिनांकापूर्वीचे पुरावे उपलब्ध नसतील तर केवळ याच कारणासाठी त्यांची अडवणूक केली जाते असे होत नाही किंवा खऱ्या मागासवर्गीयांचे दावे अवैध ठरविले जात नाहीत. तेव्हा मानीव दिनांकाच्या अटी शिथील करण्याची आवश्यकता नाही.
३	जात पडताळणी समित्या विभागीय स्तरावर असल्यामुळे जातीचा दाखला किंवा जात पडताळणी प्रमाणपत्र घेण्यासाठी लोकांना खूप लांब ठिकाणी जावे लागते. त्यामुळे जातीचे दाखले मिळण्याचे व जात प्रमाणपत्र पडताळणीचे कार्यालय हे जिल्ह्याच्या अथवा तहसील कार्यालयाच्या ठिकाणी सुरू करण्यासंदर्भात शासनाने धोरण ठरविले आहे काय?	शासनाने शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सकआ-२०१४/प्र.क्र.२१७(१)/ आस्था-२, दि. ०२.०३.२०१५ अन्वये राज्यात १५ समित्यांऐवजी ३६ जिल्हास्तरीय समित्या गठीत करण्याचा निर्णय घेतला आहे. शासनाने शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सकआ-२०१४/प्र.क्र.२१७/आस्था-२, दि.२६.०३.२०१५ अन्वये जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांसाठी आवश्यक पदे भरण्यास काही कालावधी लागणार असल्याने सध्या कार्यरत असणाऱ्या १५ विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांचे कामकाज पुर्ववत आहे.

		जात प्रमाणपत्र महसुल विभागाच्या उपविभागीय अधिकारी / उपजिल्हाधिकारी यांचेकडून दिली जातात. दोन तालुके मिळून एक उप विभागीय कार्यालये कार्यरत आहेत. त्यामुळे अर्जदारांना जात प्रमाणपत्रासाठी खुप लांब ठिकाणी जावे लागते अशी स्थिती नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या कु. माधूरी पाटील वि. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे विशेष अनुज्ञा याचिका क्र.५४५८/१९९४ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार उप विभागीय अधिकारी, उप जिल्हाधिकारी किंवा उप आयुक्त दर्जाचे अधिकारीच जात प्रमाणपत्र देण्याचे सक्षम प्राधिकारी असावेत असे स्पष्ट केले आहे. कु. माधुरी पाटील प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.२८.०४.१९९७ अन्वये दिलेल्या दुसऱ्या निकालात तहसिलदार यांना अधिकार देण्याबाबतची राज्य शासनाची विनंती अमान्य केली आहे.
४	जात प्रमाणपत्र पडताळणी संदर्भातील अर्ज प्राप्त झाल्यानंतर (तीन महिन्याच्या) मुदतीच्या शेवटी अर्जदाराला त्रुटी कळविल्या जातात. त्यामुळे त्रुटींची पूर्तता करण्यास कालापव्यय होतो यास्तव जात प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होतो. त्यामुळे त्रूटी पूर्ण करण्याबाबत अर्जदारास वेळीच कळविण्यात आल्यास प्रमाणपत्र मिळण्याची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण होईल.त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे?	पुर्वीची सेतुची कार्यालये बंद करून समितीचाच एक भाग म्हणून नागरी सुविधा केंद्र प्रत्येक समितीमध्ये कार्यरत आहेत. ज्यावेळी अर्जदार प्रस्ताव नागरी सुविधा केंद्राकडे सादर करतात त्यावेळी नागरी सुविधा केंद्रामध्ये त्यांच्या प्रस्तावाची प्राथमिक छाननी होऊन जर प्रस्ताव अपुर्ण असतील तर त्याचवेळी त्याबाबत अर्जदारास सांगितले जाते व त्रुटीची पुर्तता करून घेतली जाते. त्रुटींबाबत अर्जदारांना तातडीने कळविले जाते. तसेच काही अर्जदार यांनी दावा केलेली जात व सादर केलेले कागदोपत्री पुरावे भिन्न असतील किंवा शंकास्पद असतील तर अशी प्रकरणे अधिक चौकशीसाठी दक्षता पथकाकडे वर्ग करावी लागतात. दक्षता पथक अर्जदार यांचे सध्या राहत असलेल्या व कायमस्वरूपी निवास असलेल्या ठिकाणी जाऊन शालेय व गृह चौकशी करतात व त्याचा अहवाल समितीस सादर करतात. या प्रक्रियेमध्ये अर्जदार यांनी दावा केलेली जात, सादर केलेले पुरावे व दक्षता पथकाचा अहवाल यामध्ये जर

		समितीस तफावत आढळली तर समिती याबाबत अर्जदाराकडून खुलासा मागविते. तद्नंतर अर्जदारांच्या खुलाशा अंती योग्य तो निर्णय दिला जातो. खुलासा समाधानकारक नसेल तर नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने अर्जदारास सुनावणीची संधी देऊन प्रकरण परत्वे निर्णय घेतले जातात. सदर प्रक्रिया ही वेळखाऊ असल्याकारणाने निर्णय देण्यास विलंब लागतो. मात्र अशा प्रकरणांची संख्या कमी असते. संशयास्पद प्रकरणीच अशी कार्यवाही होत असते. खऱ्या मागासवर्गीयांची प्रकरणे तातडीने निकाली काढली जातात. सध्या राज्यातील १५ समित्यांपैकी काही समित्यांमध्ये अध्यक्ष, सदस्य, सदस्य सचिव, पोलीस उपअधिक्षक व पोलीस निरिक्षक पदावर नियमित अधिकारी कार्यरत नाहीत. रिक्त पदावरील अधिकाऱ्यांची कामे समितीतील इतर अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार देऊन पार पाडली जात आहेत. सध्या ११ अध्यक्ष, ४ सदस्य, ३ सदस्य सचिव, १२ पोलीस उपअधिक्षक व १३ पोलीस निरिक्षक एवढी पदे रिक्त आहेत. अशा प्रतिकुल परिस्थितीमध्येही समित्यांकडे जात पडताळणीसाठी दाखल झालेल्या प्रकरणांसोबत जातीबाबत सक्षम पुरावे जोडले असतील तर प्रकरणे तात्काळ निकाली काढली जात आहेत. खऱ्या मागासवर्गीयांची प्रलंबित प्रकरणे खास मोहिमेव्दारे युध्दपातळीवर निकाली काढली आहेत. काही प्रकरणात असलेल्या त्रूटींच्या पूर्ततेबाबत तातडीने अर्जदारास कळविले जाते. तरी काही अर्जदार हे अर्जासोबत पुर्ण कागदपत्रे जोडत नाहीत व त्यांना वारंवार पत्रव्यवहार करूनही प्रतिसाद मिळत नसल्यानेही काही प्रकरणे प्रलंबित राहतात, यास संबंधीत अर्जदारच जबाबदार असतात.
५	विविध व्यावसायिक प्रशिक्षणासाठी जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र आणि अधिवास	जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र आणि अधिवास प्रमाणपत्र ही सर्व प्रमाणपत्रे महसूल विभागाकडून सेतू या एकाच कार्यालयामार्फत वितरित

	प्रमाणपत्र ही सर्व प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी, एकाच छताखाली मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे?	करण्यात येतात. सेतू कार्यालय हे माहिती तंत्रज्ञान संचालनालयामार्फत कार्यरत आहे. तसेच जात वैधता प्रमाणपत्र देण्याचे काम सामाजिक न्याय विभागाकडून १५ विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यामार्फत हाताळण्यात येते.
६	जातीचा दाखला किंवा जात वैधता प्रमाणपत्र हे विहित मुदतीतच अर्जदारास प्राप्त व्हावे अन्यथा संबंधीतांवर योग्य ती कारवाई करण्याबाबत निश्चित अशी उपाययोजना करण्यात आली आहे काय?	जात प्रमाणपत्र निर्गमित करण्याचे व जात प्रमाणपत्र पडताळणीचे कामकाज हे सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २३ व त्या अंतर्गत पारित केलेले नियम २०१२ अन्वये चालते. उक्त अधिनियम २००१ मधील कलम क्र. ६ अन्वये "पडताळणी समिती ,जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी विहित करण्यात येईल अशी कार्यपध्दती अनुसरील आणि पडताळणीसाठी आणि वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी विहित करण्यात आलेली कालमर्यादा कटाक्षाने पाळील" अशी तरतुद केली आहे. त्यानुषंगाने उक्त नियम २०१२ मधील नियम क्र. ५ (६) अन्वये "सक्षम प्राधिकारी आवश्यकता असल्यास दस्तऐवजांची मूळ दस्तऐवजांवरुन पडताळणी करील आणि अर्जदाराने दिलेली माहिती, दस्तऐवज व साक्षीपुरावा यांच्या अचूकतेबददल त्याची खात्री पटल्यावर तो, यथायोग्य पूर्ण भरलेला अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, अनुसूचित जातीच्या अर्जदारांना नमुना ६ मध्ये, बौध्द धर्मांतरित अनुसूचित जातीमधील अर्जदारांना नमुना ७ मध्ये, विमुक्त जाती /भटक्या जमाती/ इतर मागास वर्ग किंवा विशेष मागास प्रवर्ग यामधील अर्जदारांना नमुना ८ मध्ये आणि भारत सरकारने या राज्यासाठी इतर मागासवर्गाच्या यादीमध्ये समाविष्ट केलेले इतर मागासवर्ग/विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्ग यांमधील अर्जदारांना नमुना ९ मध्ये जातीचे प्रमाणपत्र देईल" अशी तरतूद आहे. तसेच उक्त नियम २०१२ मधील नियम क्र.१८ (५) अन्वये "पडताळणी समिती जात प्रमाणपत्राच्या

		वैधतेबाबतचा आपला निर्णय ३ महिन्यांच्या अवधीच्या आत घेईल आणि अपवादात्मक परिस्थितीत २ महिन्यांचा जास्तीचा कालावधी समितीस घेता येईल." अशी तरतूद आहे. या नियमांचे पालन करण्याचा प्रयत्न जात प्रमाणपत्र देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून व जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडून केला जातो. नियम २०१२ मधील नियम क्र. २५ (३) (४) अन्वये "पर्यवेक्षी, शिस्तभंगविषयक व नियामक अधिकार" बाबत तरतुद करण्यात आली आहे. त्यामध्ये (३) मध्ये "या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, शासनाला अध्यक्ष, सदस्य व सदस्य-सचिव, दक्षता पथकाचे अधिकारी, त्याचप्रमाणे पडताळणी समिती (समित्यांना) नेमून दिलेला इतर कर्मचारीवर्ग व सक्षम प्राधिकारी, यांच्या विरोधात केलेल्या तक्रारी व गाऱ्हाणी यांवर चौकशी करता येईल व त्यावर कार्यवाही करता येईल आणि स्वतंत्रपणे चौकशी करण्याची व न्यायाचे पावित्र्य राखण्यासाठी अधिनियमाच्या तरतुदीनुसार खटला भरण्यासह काम काढून घेणे, सेवानिवृत्तीविषयक व इतर वित्तीय लाभ रोखून ठेवणे यांचा समावेश असणारी कारवाई करण्याची तजवीज करता येईल." व (४) मध्ये "अशा प्रकरणामधील शासनाचा निर्णय अंतिम व निर्णायक असेल: परंतु, या नियमांन्वये योजलेली चौकशी व आवश्यक कार्यवाही ही संबंधित सेवानियमांच्या अन्वये योजलेल्या प्रशासकीय चौकशी व कार्यवाहीच्या व्यतिरिक्त असेल. परंतु असे की, ही चौकशी राज्य शासनाचे यथास्थिति उप सचिव यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी करील आणि त्याने वाजवी बाबींचे अनुपालन करणे व नैसर्गिक न्यायाच्या तत्वाचे अनुपालन करणे अनिवार्य असेल" अशी तरतुद आहे.
७	प्रारुप अधिसूचना प्रसिध्द केल्यानंतर जनतेकडून प्राप्त झालेल्या हरकती व सूचना अंतिम नियम तयार करताना विचारात घेण्यात आल्या आहेत काय?	नाही. तथापि याप्रकरणी तत्कालीन मा. मंत्री (सा. न्या.) यांच्या मान्यतेने निर्णय घेण्यात आलेला आहे.

	त्यानुसार नियमात काही बदल केला आहे काय?	
८	प्रारूप अधिसूचनेमधील नियम २ (१) (ख) अंतर्गत "सक्षम प्राधिकारी" याची व्याख्या देण्यात आली आहे. तथापि, अंतिम अधिसूचनेमध्ये सदर व्याख्या वगळण्यात आली आहे त्याचे कारण काय?	महाराष्ट्र अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) २००० सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २३ मध्ये व्याख्या (२) मध्ये "सक्षम प्राधिकारी" ची व्याख्या दिलेली असल्याने विधी व न्याय विभागाने नियम २०१२ मध्ये सदर व्याख्या वगळण्याबाबत अभिप्राय दिलेले आहेत. त्यानुसार अंतिम अधिसुचना दि. १ सप्टेंबर २०१२ मध्ये "सक्षम प्राधिकारी" ची व्याख्या वगळण्यात आलेली आहे.
९	निवडणूकीस उभ्या राहिलेल्या उमेदवारास त्याचे जात पडताळणी प्रमाणपत्र निवडणूकी अगोदर अर्ज करतेवेळी सादर करण्याची अट घालण्याबाबत विचार करण्यात यावा. जेणेकरून सदर उमेदवार निवडून आल्यानंतर त्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास पोट निवडणूक घेण्याची वेळ येणार नाही, त्यायोगे शासनाचा पोट निवडणूकीचा खर्च वाचेल व मनुष्यबळाचा अपव्यय होणार नाही, याबाबत शासनाची भूमिका काय आहे.	निवडणूकीस उभ्या राहिलेल्या उमेदवारास त्याचे जात पडताळणी प्रमाणपत्र निवडणूकीअगोदर अर्ज करतेवेळी सादर करण्याची अट पुर्वी होती परंतु निवडणूकीकरिता सादर होणाऱ्या प्रकरणांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने पडताळणी समितींना निवडणूकीअगोदर सर्वच प्रकरणांवर निर्णय घेणे शक्य होत नव्हते. राज्य निवडणूक आयोग पत्र क्र. रानिआ / गाप्रनि-२०१५ / प्र क्र ६ / कार - ८, दि.२६.०६.२०१५ मधील मुद्दा क्र. ९.३ अन्वये "दिनांक २६ मार्च २०१५ च्या महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४ मध्ये सन-२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ७ या शिर्षकाखाली प्रसिध्द करण्यात आलेल्या ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या १०-अ मधील दुरूस्तीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिति नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून नामनिर्देशन पत्राबरोबर जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेल्या जात वैधता प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत घेण्याची अट शिथिल करण्यात आलेली असून त्याऐवजी सदर अर्जदारांकडून विहित नमुन्यातील हमीपत्र घेवून असे नामनिर्देशनपत्र स्विकारण्याबाबत

		निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात यावेत." असे कळविण्यात आले होते. सदर तरतुद ही रास्त होती कारण निवडणूकी अगोदरच सर्व उमेदवारांचे प्रकरणावर निर्णय घेणे पडताळणी समितीच्या अधिकारी / कर्मचारी यांची संख्या पाहता शक्य नाही. त्यांच्या आवाक्याबाहेरचे हे काम आहे.
१०	जातीचा दाखला वा जात वैधता प्रमाणपत्रांचे अर्ज हे क्लिष्ट स्वरूपाचे न करता सुटसुटीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे.	सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २३ व त्या अंतर्गत पारित केलेले नियम २०१२ मध्ये जात प्रमाणपत्राचे व जात वैधता प्रमाणाचे अर्ज विहित करण्यात आले आहेत. त्यामध्ये क्लिष्टता नाही. याबाबत कोणाचे आक्षेप किंवा तक्रारी असल्याचे दिसुन आलेले नाही.

परिशिष्ट "ड"

महाराष्ट्र शासन

क्रमांक : सीबीसी-२०१६/प्र.क्र.४६/मावक
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ४ एप्रिल, २०१६.

प्रति,

प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

विषय :- महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २०१२ हे विलंबाने तयार केल्याबाबत

संदर्भ : आपले क्र.१४००३/म.वि.स./उपविधान/ड-११, दि.१/४/२०१६

महोदय,

महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० हा अधिनियम २००० मध्ये अमलात आला आहे परंतु या अधिनियमाच्या अनुषंगाने त्यासंदर्भातील नियम हे सन २०१२ मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहेत. त्यामुळे सदर नियम तयार करण्यास इतका विलंब का झाला याबाबत विभागाचा खुलासा देण्याबाबत आपण संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे.

उपरोक्त बाबत आपणास पुढीलप्रमाणे खुलासा कळविण्यात येत आहे :- यापूर्वी दि.२४/११/२००५ च्या अधिसूचनेद्वारे जात प्रमाणपत्र देणे व त्याची पडताळणी करणे याबाबतच्या नियमाचे प्रारुप या विभागामार्फत तयार करण्यात आले होते व त्यास राजपत्रान्वये प्रसिध्दी देऊन सूचना व हरकती राज्यातील जनतेकडून मागविण्यात आल्या होत्या. त्यानंतर नव्याने नियमांचे प्रारुप माहे ऑगस्ट, २०१० मध्ये तयार करुन विधी व न्याय विभागास सादर करण्यात आले असता त्यासंदर्भात त्यांनी काही मुद्दे उपस्थित केले होते. सदर मुद्दयांची पूर्तता करुन सुधारित नियमांचे प्रारुप दि.३०/१०/२०१० रोजी पुन्हा विधी व न्याय विभागाच्या मान्यतेकरिता सादर करण्यात आले होते. दरम्यानच्या कालावधीत दि.२१/५/२०११ रोजी मा.मुख्य सचिव यांच्याकडे झालेल्या बैठकीत जात पडताळणीच्या नियमावलीत सुसूत्रता आणणे व त्याचे सुलभीकरण होण्याकरिता तयार करण्यात आलेल्या नियमाच्या प्रारुपाचे पुनर्विलोकन करण्याबाबतच्या सूचना मा.मुख्य सचिव यांनी दिल्या. त्यास अनुसरुन दि.४/६/२०११ रोजी सदर कामाकरिता समिती गठित करण्यात आली होती. समितीने सखोलपणे तपासणी करुन आवश्यक तेथे सुधारणा केली. नियमावलीचे सुधारित प्रारुप समितीकडून विभागास प्राप्त झाल्यानंतर सन २०१२ मध्ये विधी व न्याय विभागाच्या मान्यतेने सदर नियम अंतीमरित्या प्रसिध्द करण्यात आले आहेत. तरी याप्रकरणी विहित मार्गाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली असून जाणूनबूजून कोणताही विलंब केलेला नाही. तथापि, काही चूक झाली असल्यास दिलगिरी व्यक्त करण्यात येत आहे.

आपला,

(दि.ता.डिंगळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

महसूल व वन (महसूल) विभाग

अंतिम अधिसूचना क्रमांक २.—भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एलक्यूएन.१२/२०१३/प्र.क्र.१९०/अ-२, दिनांकित २७ ऑगस्ट २०१४.

उद्देश :—

सदरहू नियम करण्यामागील उद्देश व कारणे यांची मिमांसा करतांना विभागाने समितीला स्पष्टीकरणात्मक टिप्पणीत असे कळविले होते की, ...

सार्वजनिक प्रयोजनासाठी शेतकऱ्यांच्या खाजगी जमिनी भूसंपादन अधिनियम, १८९४ या कायद्यान्वये संपादित करण्यात येत होत्या. परंतु आता केंद्र शासनाने "The Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013" हा नवीन कायदा, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना" यासाठी एकत्रितपणे तयार केलेला असून सदर कायदा दिनांक १ जानेवारी २०१४ पासून अंमलात आलेला आहे. सदर कायद्यामधील कलम १०९ अन्वये राज्य शासनास संबंधित कलमाच्या अनुषंगाने नियम तयार करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.त्यानुसार राज्यशासनाने प्रारूप नियमावली तयार करून मंत्रीमंडळाने त्यास मान्यता दिल्यानंतर ते दिनांक २७ ऑगस्ट २०१४ रोजी अधिसूचित करण्यात आले आहेत.

सदर अधिसूचनेमधील महत्त्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे विषद करण्यात येत आहे :—

(१) भूसंपादन व पुनर्वसन नियमावली मधील नियम २४ (१) ते २४ (५) मध्ये सदर कायद्यांतर्गत संपादित करण्यात आलेली कोणतीही जमीन संपादक संस्थेने ताबा घेतल्यापासून ५ वर्षाच्या कालावधीकरिता विनावापर राहीली असेल तर समुचित शासन संपादक संस्थेला त्या जमिनीचा ताबा समुचित शासनाकडे हस्तांतरित करण्याबाबत नोटीस बजावेल. तद्नंतर समुचित शासन या जमिनीची एखाद्या सार्वजनिक हेतूसाठी किंवा एखाद्या सार्वजनिक प्रकल्पासाठी आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत शासनाच्या सर्व विभागांना / सार्वजनिक संस्थांना विचारणा करण्याबाबतची एक महिन्याच्या कालावधीची नोटीस बजावेल. जमिनीची त्यांना आवश्यकता नसल्यास जमीन मूळ भूधारक / भूधारकांना / त्यांचे कायदेशीर वारस यांचेकडून निवाड्याच्या वेळी अदा केलेली रक्कम अधिक त्या रकमेवरील राष्ट्रीयकृत बँकेच्या वेळोवेळीच्या व्याजदराने ताबा दिनांकापासून सरळव्याज पद्धतीने व्याज आकारणी करून समुचित शासनाच्या लेखी आदेशान्वये सर्व बोजा विरहीत जमीन परत करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

(२) भूसंपादन व पुनर्वसन नियमावली मधील कलम १६ (४) मध्ये प्रकल्पबाधित व्यक्तींची नियुक्ती प्राथम्य कोट्यामधून करण्यात येईल. तेव्हा तिचे मूळ प्रकल्पबाधित व्यक्ती प्रमाणपत्र ते देणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे पुष्टी करण्यासाठी पाठवण्यात येईल. प्रमाणपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्याचे पुष्टिपत्र मिळाल्यानंतर अशा व्यक्तींचे नियुक्ती कायम करण्यात येईल अशी तरतूद केलेली आहे.

(३) भूसंपादन व पुनर्वसन नियमावली मधील कलम १६ (५) मध्ये नोकरीऐवजी रुपये ५ लाख किंवा वार्षिक मोबदला स्विकारणाऱ्या व्यक्तीला प्रकल्पग्रस्त दाखला देण्यात येऊ नये अशी तरतूद केली आहे.

(४) भूसंपादन व पुनर्वसन नियमावली मधील कलम १६ (६) व (७) मध्ये प्रकल्पग्रस्त कुटुंबातील व्यक्तींना त्याच प्रकल्पामध्ये अथवा इतरत्र नोकरी मिळण्यासाठी किंवा स्वयंरोजगाराला मदत होण्यासाठी आवश्यक ते तांत्रिक शिक्षण / प्रशिक्षण देण्यासाठी प्रकल्प यंत्रणेने प्रशिक्षण व्यवस्था करण्याची तरतूद केलेली आहे.

(५) भूसंपादन व पुनर्वसन नियमावली मधील कलम १६ (८) मध्ये सिंचन प्रकल्पाच्या बाबतीत, अधिनियमासोबत जोडलेल्या तिसऱ्या अनुसूची नुसार पायाभूत सुविधांची व किमान मूलभूत सोयी सुविधांची परिपूर्ती करून त्या, स्थानिक संस्थांकडे हस्तांतरित केलेल्या असल्याशिवाय आणि पात्र व इच्छूक असलेल्या प्रकल्पबाधित व्यक्तींना जमिनीच्या बदल्यात जमिनीचे वाटप करण्यात आल्याशिवाय प्रशासक संपादनकर्त्या संस्थेस घळभरणीसाठी (गॉर्जफिलिंग) परवानगी देणार नाही अशी तरतूद केलेली आहे.

(६) भूसंपादन व पुनर्वसन नियमावली मधील कलम १७ (२) मध्ये नागरीकरणाच्या उद्देशाने ज्यावेळी भूसंपादन केले जाते अशा प्रकरणी विकसित जमिनीच्या २० टक्के जमीन प्रकल्पग्रस्तांना देण्याची तरतूद केलेली आहे.

(७) सदर कायद्याच्या कलम (४) मध्ये "Social impact Assessment" करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे, कलम ४ (१) प्रमाणे "Social impact Assessment" च्या कार्यपद्धतीबाबत प्रारूप नियमामध्ये भाग-१ खाली त्याबाबतची कार्यपद्धती नियम क्र.३ ते ८ प्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहे. "Social impact Assessment" च्या अहवालाचे मुल्यमापन Expert Group कडून करण्यात येणार आहे.

दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजीच्या बैठकीत समितीने सदर अधिसूचना विचारार्थ ठेवली असता समितीने खालील मुद्यांबाबत माहिती मागवून विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचा निर्णय घेतला.

१. या नियमांच्या नियम ३ अंतर्गत 'सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास' या बाबी संदर्भात तपशीलवार माहिती देण्यात यावी.

२. नियम ४ (५) मध्ये सामाजिक परिणाम निर्धारणासाठी जे शुल्क आकारण्यात येणार आहे ते कशाप्रकारे आकारण्यात येणार आहे?

३. भूसंपादन व पुनर्वसन नियमावलीतील कलम १६ (५) मध्ये ५ लाख रूपये किंवा वार्षिक मोबदला स्विकारणाऱ्या व्यक्तीला प्रकल्पग्रस्त दाखला देण्यात येऊ नये अशी तरतूद करण्याची कारणे काय आहेत तसेच वर्षासनाची रक्कम कशाप्रकारे निश्चित करण्यात येते?

४. भूसंपादन व पुनर्वसन नियमावलीतील कलम १६ (८) मध्ये सिंचन प्रकल्पांच्या बाबतीत अधिनियमासोबत जोडलेल्या तिसऱ्या अनूसूचीनुसार पायाभूत सुविधांची व किमान मुलभूत सोयी सुविधांची प्रतिपूर्ती करून त्या स्थानिक संस्थांकडे म्हणजे नेमक्या कोणत्या संस्थांकडे हस्तांतरीत करण्यात येणार आहेत. तसेच प्रकल्पबाधीत व्यक्तींना जमिनीच्या बदल्यात जमिनीचे वाटप करण्यात आल्याशिवाय प्रशासक संपादनकर्त्या संस्थेस घळभरणीसाठी (गॉर्जाफिलिंग) परवानगी देणार नाही, याबाबत खुलासा करावा.

५. सदरहू नियमावलीतील नियम ९ मधील "संमतीची आवश्यकता" या नियमाबाबत सविस्तर स्पष्टीकरण देण्यात यावे.

महसूल व वन (महसूल) विभागाकडून प्राप्त झालेली माहिती परिशिष्ट **"अ" मध्ये सादर** करण्यात आली आहे व साक्षी दरम्यान प्राप्त झालेल्या पुनर्वसन विभागाकडून प्राप्त झालेली माहिती परिशिष्ट **'ब'** मध्ये सादर करण्यात आली आहे. त्यानुषंगाने बुधवार, दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या बैठकीत विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

सदर साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, शासनाचा जो भूसंपादनाविषयी नवीन कायदा आलेला आहे. त्याचा विचार केला तर केंद्र आणि राज्यसरकारचा जूना भूसंपादनाच्या कायद्यासंदर्भातील काही शंका आहेत. या नवीन कायद्यामध्ये सामाजिक परिणाम निर्धारण हा जो नवीन विषय आलेला आहे, यासंबंधी समितीला माहिती हवी आहे. तसेच पाझर तलाव, धरण या व अन्य कोणत्याही प्रकरणाकरिता भूसंपादन केले आणि ते जर चुकीच्या पद्धतीने झाले तर लोक अंडर प्रोटेस्ट हायकोर्टामध्ये जातात. यामुळे राज्याच्या तिजोरीवर नाहक व्याजाचा बोजा पडतो. शासन भूसंपादनापोटी किती पैसा देते व का देते याचे उत्तर शोधण्याची गरज आहे. सामाजिक परिणाम निर्धारण याचा मूळ उद्देश काय आहे ?

याप्रकरणी विभागीय प्रतिनिधींनी असे स्पष्ट केले की, भूसंपादन व पुनर्वसन, २०१३ हा कायदा आता नवीन आलेला आहे. भूसंपादन कायद्यांतर्गत भूसंपादन करीत असतांना त्याची वाजवी भरपाई शेतकरी किंवा मूळ जमीन मालकास मिळावी, याकरिता या कायद्याची निर्मिती केली गेलेली आहे. भूसंपादनाच्या कार्यवाहीमध्ये पारदर्शकता राहावी, याकरिता सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास केला जातो. यामध्ये लोकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आहे. जी जमीन खरोखर प्रकल्पाकरिता गरजेची आहे, खरोखर तीच जमीन संपादित केली जात आहे का ? याबाबतही या अंतर्गत पारदर्शकता राहते. एखाद्या प्रकल्पाकरिता भूसंपादनाची

प्रक्रिया झाल्यानंतर त्यामुळे होणारे सामाजिक परिणाम काय असणार आहेत, त्याचा देखील अभ्यास या सामाजिक परिणाम निर्धारणांतर्गत केला जाणार आहे. अशी व्यवस्था पूर्वीच्या कायद्यामध्ये नव्हती. नवीन भूसंपादन कायद्यामध्ये प्रकरण-२ मध्ये सेक्शन -४, ५, ६, ७, ८, ९ हे कलम सोशल इम्पॅक्ट असेसमेंटसंबंधीचे आहेत. यासंबंधी राज्य शासनाने काही नियम केलेले आहेत. दिनांक २७ ऑगस्ट, २०१४ प्रमाणे या कायद्यासंबंधीचे नियम राज्य शासनाने तयार केलेले आहेत. तसेच, यासंबंधी अधिसूचना काढलेली आहे. यामध्ये नेमकी प्रक्रिया कशी असेल, हे यामध्ये दिलेले आहे. सामाजिक निर्धारणासंबंधीचा हा जो कायदा आहे तो मूळ केंद्राचा कायदा आहे. यासंबंधीची जी पद्धती आहे, ती या नियमांमध्ये विषद केलेली आहे.

सदरहू कायदा अस्तित्वात आल्यानंतर एमआयडीसीने काही जमिनी अधिग्रहित केल्या आहेत. परंतु एमआयडीसीने या कायद्यातील सोशल इम्पॅक्ट असेसमेंटप्रमाणे भूसंपादन केलेले नाही. या भूसंपादन प्रक्रियेमध्ये पैशांचे वाटपही झालेले आहे. या जमिनींचे भूसंपादन या सन २०१३ च्या नवीन भूसंपादन कायद्याप्रमाणे का झाले नाही, अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, सदरहू कायदा हा नॅशनल हायवेकरिता भूसंपादन, रेल्वे प्रकल्पाकरिता भूसंपादन, कोळशाच्या खाणीकरिता भूसंपादनाकरिता लागू नाही. उक्त प्रकल्पांकरिता भूसंपादन करण्याकरिता वेगवेगळे कायदे आहेत. या प्रकल्पांना या कायद्यातील तरतूदी लागू होत नाहीत. एमआयडीसीकरिता भूसंपादन करण्यासाठी उद्योग या संज्ञेवर आधारित अन्य भूसंपादन कायदा असून त्यामध्ये वेगळ्या अटी आहेत.

नवीन भूसंपादनाचा कायदा एमआयडीसी, रेल्वे, उद्योग, वन, कोळसा, हायवे प्रकल्पांच्या पुनर्वसनाकरिता लागू नाही तर मग हा कायदा कोणकोणत्या प्रकल्पांस लागू आहे, अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, सन २०१३ च्या कायद्यामध्ये स्ट्रॅटेजिक पर्पज दिलेला आहे. जिल्हा मार्ग, राज्य मार्ग याकरिता तसेच राज्यांतर्गत रस्त्यांसाठी लागणारी जमीन सदर कायद्यांतर्गत संपादित करता येते. तसेच राज्यातील इरिगेशन प्रोजेक्टकरिता लागणारी जमीन देखील या कायद्यांतर्गत संपादित करता येते. राज्यातील प्रोजेक्ट झोनसाठी एमआयडीसी असून शहरातील रस्त्यांकरिता एमआरटीपी ॲक्ट लागू आहे. सदर कायद्याच्या कलम २ मधील उपखंड ३ मध्ये शेतकऱ्यांची संमती घेऊन भूसंपादन केले जाईल, असे नमूद केलेले आहे. या कायद्यामध्ये प्रामुख्याने दोन भाग आहेत. पीपीपीमध्ये राज्य शासनाचा हिस्सा असून त्याकरिता जमीन लागणार आहे, अशा प्रकल्पाकरिता सदर कायद्यान्वये भूसंपादन करता येणार आहे. तसेच ज्या खाजगी प्रकल्पाचा उपयोग सार्वजनिक फायद्यासाठी होणार आहे, अशा प्रकल्पाकरिता लागणाऱ्या जमिनीचे भूसंपादन देखील सदर कायद्यान्वये करता येणार आहे. अशा प्रकल्पांसाठी होणाऱ्या भूसंपादनाकरिता शेतकऱ्यांची संमती आवश्यक आहे. पीपीपी अंतर्गत प्रोजेक्टवरील जमिनीचे मालकी हक्क शासनाकडे असणार आहेत. या प्रकल्पाकरिता ७० टक्के लोकांची जमीन संपादित करता येणार असून खाजगी प्रकल्पाकरिता ८० टक्के लोकांची जमीन संपादित करता येणार आहे.

त्यावर समितीने विचारले की, एखाद्या जागेवर रुग्णालय उभारावयाचे असल्यास त्याकरिता लागणारी जमीन कशाप्रकारे संपादित केली जाईल, या संदर्भात खुलासा करण्यास सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, खाजगी प्रकल्पासाठी जमीन संपादित करण्यासाठी सदर कायद्यान्वये थेट निगोसिएशन करता येणार आहे. पूर्वी भूसंपादनामध्ये अनेक अडचणी येत होत्या. केंद्र शासनाच्या संरक्षण विभागाने उपकरणे तयार करण्यासाठी लागणाऱ्या प्रकल्पाचे खाजगीकरण केले. तसेच आता अनेक वीज निर्मिती प्रकल्प देखील खाजगी कंपन्यांकडून सुरू करण्याकरिता शासनाकडून परवानगी दिली जाते. अशा प्रकल्पांकरिता खाजगी जमिनीचे निगोसिएशन पार पडत नसेल तर ते शासनाकडे ॲप्रोच करू शकतात. या नंतर सदर प्रकल्पाकरिता आवश्यक असणारी भूसंपादन प्रकिया पूर्ण होण्यास मदत होऊ शकते. शहरांतर्गत रस्ते किंवा इतर प्रोजेक्ट करिता भूसंपादन करावयाचे असल्यास एमआरटीपी ॲक्ट लागू होतो. एखाद्या प्रकल्पासाठी भूसंपादन लवकर हवे असल्यास त्याकरिता शेतकऱ्यांशी निगोसिएशन करून त्यांची संमती असल्यास जमिनीची थेट खरेदी करता येते. हे काम संबंधित संपादन संस्था करू शकते. काही इरिगेशन प्रकल्पाकरिता खाजगी वाटाघाटी केल्या आहेत. या कायद्यांतर्गत जमिनीची किंमत किती द्यावयाची याची पद्धत नमूद केलेली आहे. ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्याला त्याच्या जमिनीची किंमत रेडीरेकनरच्या चार पटीने नुकसान भरपाईच्या रूपात प्राप्त होते. जर एखाद्या भूसंपादन संस्थेला वाटले की, खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करावे तर त्याचाही जी.आर.विभागाने काढलेला आहे. त्यामध्ये रेडीरेकनरच्या चार पट किमतीपेक्षाही २५ टक्के जादा किंमत मूळ जमीन मालकास द्यावी लागते. एखाद्या जमिनीची किंमत १००रुपये असेल आणि रेडीरेकनरच्या चार पट म्हणजे त्याची नुकसान भरपाई जर ४००रुपये होत असेल आणि खाजगी वाटाघाटीने नियमाप्रमाणे २५ टक्के जास्त म्हणजे १००रुपये आणखी जास्त किंमत द्यावी लागते. म्हणजे या जमिनीची किंमत ५००रुपये इतकी होते. ही किंमत म्हणजे मूळ किंमतीपेक्षा ५ पट जास्त होते. तसेच, सदरहू जमिनीवर असलेली झाडे व इतर बाबींचे व्हॅल्युएशन करून मिळेल. या संदर्भात जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमलेली आहे. त्यामध्ये सरकारी वकील, रेडीरेकनर तपासणारे टाऊन प्लानिंग ऑफिसर्स, भूसंपादन संस्थेचे अधिकारी काम करीत असतात.

शहरातील जमिनीची भरपाई ही रेडीरेकनरच्या एकपट भावाने केली जाते. दिलासा रक्कम व इतर बाबी मिळून त्याची किंमत दुप्पट होते.

एखाद्या भूसंपादन संस्थेने जर कायद्याप्रमाणे जमीन संपादित करून त्याचा पाच ते दहा वर्षे कोणत्याही कारणाकरिता कोणताही वापर केला नाही तर ती कोणत्या भावाने पुन्हा मूळ जमीन मालकाला त्याच्या संमतीनेच परत करावयाची, यासंबंधीच्याही काही अटी आहेत. एखाद्या जमिनीवर प्रकल्पाचे अर्धवट काम सुरू होऊन काही वर्षे झालेली असतील तर त्यांना विहित मुदतीत प्रकल्पाचे काम पूर्ण न केल्यास जमिनी परत करण्याच्या अटी बजाविल्या जातात. जर कोणत्या विभागाने जमिनीची मागणी केली तर त्यांना ती दिली जाईल. कोणत्याही शासकीय विभागाची मागणी नसल्यास सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार

त्या जमिनीचा लिलाव केला जाईल. नवीन कायद्यानुसार ज्या जमिनींचे संपादन केले जाईल त्या संदर्भात काही तरतुदी केल्या आहेत. या मधील पहिल्या दोन तरतुदी सारख्याच आहेत. पाच वर्षे जमिनीचा वापर केला नाही तर ती जमा केली जाईल. तसेच पहिल्यांदा जमीन परत करताना प्रथम शासकीय विभागाला विचारणा केली जाईल. त्यांना जमीन नको असल्यास मुळ मालकाला त्या बाबत विचारले जाईल, अशी तरतूद केलेली आहे. नवीन कायद्यामधील तरतुदी प्रॉस्पेक्टीव्ह असून त्यामध्ये रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्ट दिला जाणार नाही. खाजगी कंपन्यांनी शेतकऱ्यांची जमीन घेतली तरी देखील हा नियम लागू आहे काय अशी विचारणा समितीने केली असता विभागाने स्पष्ट केले की, शेतकऱ्यांना जमीन परत देण्याची वेळ आली तर ज्या दराने त्यांची जमीन खरेदी केली असेल त्या किंमतीवर ठराविक दराने व्याज द्यावे.

समितीने याप्रकरणी नमूद केले की, सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल समुचित शासनाला (संबंधित जिल्हाधिकारी) यांना सादर करण्यात येईल, असे नियमात नमूद केलेले आहे. त्या ऐवजी जिल्हा पातळीवर एक कायमस्वरूपी समिती असावी, व त्या समितीमध्ये जिल्हाधिकारी, नगरपंचायत व लोकप्रतिनिधी यांचा देखील या समितीमध्ये समावेश केला जावा. या संदर्भात शिफारस करण्यात यावी असा समितीने निर्णय घेतला.

अभिप्राय व शिफारशी :

भूमीसंपादन अधिनियमांतर्गत भूसंपादन करीत असतांना भूसंपादनाच्या कार्यवाहीमध्ये पारदर्शकता रहावी याकरिता सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास केला जातो. सदर सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासाचा अहवाल समुचित शासनाला (संबंधित जिल्हाधिकारी) सादर करण्यात येतो. त्याऐवजी सदर अहवाल जिल्हाधिकाऱ्यांसह, नगरपंचायत व लोकप्रतिनिधी यांचा समावेश करून जिल्हापातळीवर एक कायमस्वरुपी समिती गठीत करण्यात येवून त्या समितीसमोर सादर करण्यात यावा अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्यात कळविण्यात यावी.

परिशिष्ट "अ"

महसूल व वन विभाग/भूसंपादन

दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी आयोजित उपविधान समितीच्या साक्षीसाठी भूसंपादनाशी संबंधीत प्रश्नांबाबतचा खुलासा/ उत्तरे

प्रश्न क्र.१ :- या नियमांच्या नियम ३ अंतर्गत 'सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास' या बाबी संदर्भात तपशीलवार माहिती देण्यात यावी.

उत्तर :- भूमीसंपादन , पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील पोट कलम १०९ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा व इतर सर्व योग्य शक्तींचा वापर करुन भूमीसंपादन , पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ शासन राजपत्रामध्ये दिनांक २७ ऑगस्ट, २०१४ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहेत. सदर नियमामधील नियम क्र. ३ मध्ये 'सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास' याबाबतचे विवेचन करण्यात आले आहे. यानुसार समुचित शासन (संबंधीत जिल्हाधिकारी) सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासाला सुरुवात करण्यासंबंधात अधिसूचना प्रसिद्ध करेल. सदर अधिसूचना संबंधीत ठिकाणी स्थानिक भाषेत विविध कार्यालयांना उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच प्रकल्पाने बाधीत होणाऱ्या ठिकाणी दोन वर्तमानपत्रांमध्ये बाधीत क्षेत्रात जाहीर नोटीशीच्या स्वरुपात प्रसिद्ध करण्यात येईल.

समुचित शासन (संबंधीत जिल्हाधिकारी) सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकरणाचे नाव अधिसूचीत करील. परंतू मागणीकर्त्या संस्थेने सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास करण्यासाठी समुचित शासनाने (संबंधीत जिल्हाधिकारी) निर्धारीत केलेले प्रक्रिया शुल्क जमा केल्यानंतर ३० दिवसात अशी अधिसूचना काढण्यात येईल. तसेच मागणीकर्त्या संस्थेने भूसंपादनाचा प्रस्ताव सादर करताना सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासावरील खर्च , प्रशासनिक खर्च व पुनर्वसन व पुनर्स्थापना समितीच्या भत्त्यांवरील खर्च भूसंपादन अधिकाऱ्यांच्या / प्रशासकांच्या स्वीय प्रपंजी लेख्यामध्ये जमा केला नसेल तर सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास सुरु करण्याबाबतची अशी अधिसूचना काढण्यात येणार नाही.

प्रकल्पाने बाधीत कुटुंबाची मते जाणून घेण्यासाठी बाधीत क्षेत्रामध्ये जाहीर सुनावणी घेण्यात येईल व यानंतर कलम ४ च्या प्रयोजनार्थ स्थानिक स्वराज्य संस्थांशी विचार विनिमय करुन सामाजिक परिणाम निर्धारण करण्यात येईल.

सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास सुरु केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत बाधीत कुटुंबांच्या लेखी नमूद केलेल्या मतांसह सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल समुचित शासनाला (संबंधीत जिल्हाधिकारी) सादर करण्यात येईल.

सामाजिक परिणाम निर्धारण च्या अहवालाची खालील तीन भागात विभागणी करण्यात येईल.

१. प्रकल्प व्यवहार्यता अहवाल
२. प्रकल्प परिणाम अहवाल
३. प्रकल्पासाठी समाजिक परिणाम व्यवस्थापन योजना

प्रश्न क्र. २:- नियम ३ अंतर्गत सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास कोणी प्रस्तावीत करावयाचा आहे ?

उत्तर :- सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास समुचित शासनाने (संबंधीत जिल्हाधिकारी) प्रस्तावित करावयाचा आहे.

प्रश्न क्र. ३:- नियम ३ नुसार सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास या मुद्द्याअंतर्गत मागणीकर्त्या संस्थेने सामाजिक परिणाम निर्धारणाचा अभ्यास करण्यासाठी प्रक्रिया शुल्क जमा करील अशी तरतूद आहे. या प्रकरणी मागणीकर्त्या संस्था म्हणजे कोणत्या संस्था आहेत याबाबतची माहिती देण्यात यावी.

उत्तर :- मागणीकर्त्या संस्था म्हणजे ज्या संस्थेसाठी जमीन संपादीत करावयाची आहे अशी संस्था.

प्रश्न क्र. ४:- सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास शासनाने जमीन संपादन करतेवेळी करावयाचा आहे की फक्त खाजगी संस्थांनी जमीन संपादन करणेसंदर्भात मागणी केल्यावर करावयाची आहे ?

उत्तर :- सामाजिक परिणाम निर्धारण शासनासाठी तसेच खाजगी संस्थांसाठी जमीन संपादन करताना आवश्यक आहे.

प्रश्न क्र. ५:- नियम ४(५) मध्ये सामाजिक परिणाम निर्धारणासाठी जे शुल्क आकारण्यात येणार आहे ते कशा प्रकारे आकारण्यात येणार आहे ?

उत्तर :- सामाजिक परिणाम निर्धारण साठीचे शुल्क समुचित शासन (संबंधीत जिल्हाधिकारी) निश्चित करणार आहे. सदर शुल्क ठरविताना प्रतिबाधीत कुटुंबांची संख्या विचारात घेतली जाणार आहे, तसेच संपादनाचे क्षेत्रही विचारात घेतले जाणार आहे. संपादन क्षेत्रामध्ये वाढ झाल्यास प्रत्येक २५० हेक्टरच्या अतिरिक्त संपादनासाठी शुल्क ५ टक्क्यांनी वाढविता येईल.

प्रश्न क्र. ६ :- भूसंपादन व पुनर्वसन नियमावलीतील कलम १६(५) मध्ये ५ लाख रुपये किंवा वार्षिक मोबदला स्विकारणाऱ्या व्यक्तीला प्रकल्पग्रस्त दाखला देण्यात येऊ नये अशी तरतूद करण्याची कारणे काय आहेत तसेच वर्षासनाची रक्कम कशा प्रकारे निश्चित करण्यात येते ?

उत्तर :- सदर प्रश्न पुनर्वसन विभागाशी संबंधीत आहे.

प्रश्न क्र. ७:- भूसंपादन व पुनर्वसन नियमावलीतील कलम १६(८) मध्ये सिंचन प्रकल्पांच्या बाबतीत अधिनियमासोबत जोडलेल्या तिसऱ्या अनूसूचीनुसार पायाभूत सुविधांची व किमान मुलभूत सोयी सुविधांची प्रतिपूर्ती करुन त्या स्थानिक संस्थांकडे म्हणजे नेमक्या कोणत्या संस्थांकडे

हस्तांतरीत करण्यात येणार आहेत तसेच प्रकल्पबाधीत व्यक्तींना जमिनीच्या बदल्यात जमिनीचे वाटप करण्यात आल्याशिवाय प्रशासक संपादनकर्त्या संस्थेस घळभरणीसाठी (गॉर्जफिलिंग) परवानगी देणार नाही याबाबत खुलासा करावा.

उत्तर :- सदर प्रश्न पुनर्वसन विभागाशी संबंधीत आहे.

प्रश्न क्र. ८:- सदरहू नियमावलीतील नियम ९ मधील "संमतीची आवश्यकता" या नियमाबाबत सविस्तर स्पष्टीकरण देण्यात यावे.

उत्तर :- भूसंपादन अधिनियम, २०१३ अन्वये कोणत्याही प्रकल्पासाठी जमीन संपादन करीत असताना भूधारकांची लेखी संमती आवश्यक आहे.

१) खाजगी कंपनीकरीता संपादनाच्या बाबतीत बाधीत झालेल्या कुटुंबापैकी कमीत कमी ८०% कुटुंबांची संमती आवश्यक आहे.

२) सार्वजनिक / खाजगी भागीदारी प्रकल्पांबाबतीत बाधीत झालेल्या कुटुंबापैकी कमीत कमी ७०% कुटुंबांची संमती आवश्यक आहे.

उपरोक्त तरतूदीस अनुसरुन "संमतीची आवश्यकता" नियम क्र. ९ मध्ये स्पष्ट करण्यात आली आहे. यानुसार जिल्हाधिकारी संमती मिळविण्याची प्रक्रिया सुरु करील. ज्याच्या अधिकारीतेत बाधीत क्षेत्र येते अशा महसूल मंडळ अधिकाऱ्यासमोर जमीन मालक आपली व्यक्तिगत संमती देईल. जमीन मालक विहीत नमून्यात आपल्या शपथपत्राद्वारे लेखी संमती देईल व त्या शपथपत्रावर आपले छायाचित्र लावेल, तसेच आपल्या स्वाक्षरीस डिजीटल आंगठ्याचा ठसा उमटवेल व येत असल्यास स्वाक्षरी करेल. सर्व व्यक्तिगत संमती घेण्याच्या कार्यपद्धतीचे व्हिडीओ चित्रिकरण करणे आवश्यक आहे. संमतीची प्रक्रीया सुरु करण्यापूर्वी संमतीशी संबंधीत तरतूदींचा स्थानिक भाषेत अनुवाद करण्यात येईल व त्याची प्रत संमती प्रक्रीयेत उपस्थित असणाऱ्या प्रत्येक जमीन धारकाला देण्यात येईल. तसेच अशिक्षीत व्यक्तींच्या बाबतीत ती वाचून दाखविण्यात येईल.

आदिवासी क्षेत्रामध्ये जमीन मालकांची संमती घेण्यापूर्वी ग्रामसभेची संमती प्राप्त करणे आवश्यक राहील. कलम ११(१) ची प्रारंभिक अधिसूचना काढण्यापूर्वी संमती घेण्याची प्रक्रीया पूर्ण करणे आवश्यक आहे.

****

परिशिष्ट "ब"

महसूल व वन विभाग/२-५

प्रश्नावलीतील मुद्दा क्र.६ व ७ बाबतचे मुद्देनिहाय अभिप्राय/माहिती खालीलप्रमाणे आहे.

मुद्दा क्र. ६ :- भूसंपादन व पुनर्वसन नियमावलीतील कलम १६ (५) मध्ये ५ लाख रुपये किंवा वार्षिक मोबदला स्विकारणा-या व्यक्तीला प्रकल्पग्रस्त दाखल देण्यात येऊ नये अशी तरतूद करण्याची कारणे काय आहेत ? तसेच वर्षासनाची रक्कम कशा प्रकारे निश्चित करण्यात येते ?

अभिप्राय :- केंद्रीय कायदा २०१३ सोबतच्या दुस-या अनुसूचीतील अनु.क्र.४ मध्ये प्रकल्पग्रस्ताला नोकरी अथवा मोबदला यामध्ये ३ पर्याय सूचविण्यात आलेले आहेत.

१) जेथे प्रकल्पामार्फत नोक-या निर्माण झाल्या असतील तेथे योग्य प्रशिक्षण आणिआवश्यक क्षेत्रातील कौशल्य विकास पूरविल्यानंतर प्रकल्पातील प्रत्येक बाधित कुटुंबातील किमान १ एका सदस्याला त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायदयामध्ये तरतूद केलेल्या किमान वेतनाहून कमी नसेल इतक्या दराने रोजगाराची तरतूद करेल आणि आवश्यक असेल अशा अन्य प्रकल्पमध्ये नोकरीची व्यवस्था करेल

किंवा

२) प्रत्येक बाधित कुटुंबाला ५ लाख रुपये इतके एक रकमी प्रदान

किंवा

३) वर्षासन विमापत्रे जी कृषिविषयक कामगारांकरिता असलेल्या ग्राहक किंमत निर्देशांकाचे यथोचित सूचीपत्रण (Indexation) करुन २० वर्षांकरिता प्रत्येक कुटुंबाला दरमहा दोन हजार रुपयांपेक्षा कमी नाही इतकी रक्कम देतील.

उपरोक्त तरतूदी विचारात घेऊन नोकरी ऐवजी रुपये ५ लाख किंवा वार्षिक मोबदला स्विकारणा-या व्यक्तीला प्रकल्पग्रस्त दाखल देण्यात येऊ नये अशी तरतूद नियमामध्ये केली आहे. तसेच वर्षासनाची रक्कम केंद्रीय कायदा २०१३ सोबतच्या दुस-या अनुसूचीतील अनु.क्र.४ मधील पर्याय क्र.३ नुसार निश्चित करण्यात येते.

मुद्दा क्र.७ :- भूसंपादन व पुनर्वसन नियमावलीतील कलम १६ (८) मध्ये सिंचन प्रकल्पाच्या बाबतीत अधिनियमासोबत जोडलेल्या तिस-या अनुसूचीनुसार पायाभूत सुविधांची व किमान मुलभूत सोयी सुविधांची प्रतिपूर्ती करुन त्या स्थानिक संस्थांकडे म्हणजे नेमक्या कोणत्या संस्थांकडे हस्तांतरित करण्यात येणार आहेत ? तसेच प्रकल्पबाधित व्यक्तींना जमिनीच्या बदल्यात जमिनीचे वाटप करण्यात आल्याशिवाय प्रशासक संपादन कर्त्यासंस्थेस घळभरणीसाठी (गॉर्जफिलिंग) परवानगी देणार नाही याबाबत खुलासा करावा.

अभिप्राय :- "आधी पुनर्वसन मग धरण" हे तत्व लक्षात घेता पुनर्वसनाची व पुनर्वसित गावठाणातील नागरी सुविधांची सर्व कामे पूर्ण होऊन त्या सुविधा संबंधित ग्रामपंचायतीकडे /जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्याची जबाबदारी प्रकल्पयंत्रणेवर टाकून तोपर्यन्त घळभरणीस परवानगी देऊ नये अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

नियोजन (रोहयो) विभाग

प्रारुप अधिसूचना क्रमांक डी-२२- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र बेरोजगार भत्ता नियम, २०१२ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक बेभनि. २०१२ /प्र.क्र. ३०/रोहयो-१०, दिनांकित २ जानेवारी, २०१३

तसेच

अंतिम अधिसूचना क्रमांक अं-४६- महाराष्ट्र रोजगार हमी योजना -बेरोजगार भत्ता नियम, २०१३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक बेभनि-२०१२/प्र.क्र. ३०/ रोहयो-१०, दिनांकित १ एप्रिल, २०१३.

उद्देश :—

उपरोक्त प्रारुप नियम निर्गमीत करण्यामागील उद्देश व कारणे यांची मिमांसा करतांना विभागाने खालीलप्रमाणे विषद केले आहे.

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ च्या कलम १७ च्या पोट-कलम (१) अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र बेरोजगार भत्ता नियम २०१२ तयार करण्यात आले आहेत. सदर योजनेखाली रोजगार पुरविणे राज्य शासनाला शक्य नसेल तर अशी व्यक्ती बेरोजगार भत्ता मिळण्यास हकदार असेल, याबाबत महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ कलम (८) (४) अन्वये सदर तरतूद नमूद आहे. तथापि, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ या केंद्रीय कायद्याशी सुसंगत सुधारणा करण्याच्या दृष्टीने ऑगस्ट, २००६ मध्ये महाराष्ट्र राज्य रोजगार हमी कायदा १९७७ मध्ये सुधारणा करण्यात आल्या त्या अनुषंगाने राज्य कायद्यातील कलम (८) (४) (२) अन्वये राज्य शासनाकडून राज्य परिषदेशी विचार विनिमय करून अधिसूचनेव्दारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दराने बेरोजगार भत्ता मिळण्यास हकदार असेल अशी कायद्यात सुधारणा करण्यात आली. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ (सुधारणा २००६) च्या अनुषंगाने तसेच महाराष्ट्र रोजगार हमी नियम १९७९ मधील नियम ९ व १० अन्वये बेरोजगार भत्ता मिळण्याची पात्रता व बेरोजगार भत्ता देण्याची कार्यपद्धती यांमध्ये सुधारणा करून सुसंगतता आणण्याकरिता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र बेरोजगार भत्ता नियम, २०१२ तयार करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र रोजगार हमी परिषद नियम, २०१२ मधील ३ अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र बेरोजगार भत्ता नियम, २०१२ अन्वये बेरोजगार भत्ता मिळण्यास हकदार व्यक्ती, बेरोजगार भत्ता प्रदान करण्याची कार्यपद्धत, प्रदान करण्याचे राज्य शासनाचे दायित्व तसेच कोणत्या परिस्थितीत बेरोजगार भत्ता मागणी करण्यास अर्जदार अपात्र ठरेल याबाबत सविस्तर तरतूद केली आहे.

उपविधान समितीच्या दिनांक १२ फेब्रुवारी, २०१३ रोजीच्या बैठकीत सदर अधिसूचना विचारार्थ ठेवण्यात आली असता समितीने अधिसूचनेवर विचारविनिमय केला व खालील मुद्यांची माहिती मागविण्याचा निर्णय घेतला.

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ या केंद्रीय कायद्याशी सुसंगत सुधारणा करण्याच्या दृष्टीने ऑगस्ट, २००६ मध्ये महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मध्ये सुधारणा करण्यात आल्या, असे स्पष्टीकरणात्मक टिप्पणीत नमूद आहे. तथापि, त्याअंतर्गत करावयाचे नियम २०१३ मध्ये तयार करण्यात आले आहेत. सहा वर्षे इतक्या उशीराने नियम करण्यामागे काय कारणे आहेत, याबाबत माहिती द्यावी.

(२) जनतेकडून प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांच्या छापील प्रती समितीला पाठविण्यात याव्यात.

(३) सद्यस्थितीत बेरोजगार भत्ता प्रतिदिन किती दिला जातो याबाबतची माहिती तत्संबंधातील कागदपत्रांसह समितीला देण्यात यावी.

सदर अधिसूचना व उक्त मुद्दयांसंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेली माहिती **(माहिती परिशिष्ट 'अ' मध्ये सादर केली आहे.)** समितीसमोर दिनांक ३० एप्रिल २०१३ रोजीच्या बैठकीत विचारार्थ ठेवली असता त्यावर समितीने विचारविनिमय केला व यावर पुन्हा विभागाकडून खालील मुद्यांची माहिती मागविली.

(१) रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांना प्रोफेशनल टॅक्स लावण्यात येतो. शासकीय कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू झाल्यामुळे या रकमेत बरीच वाढ झालेली आहे. तरी मागील दहा वर्षांपासून प्रोफेशनल टॅक्सच्या माध्यमातून शासनाच्या तिजोरीत एकूण किती रक्कम जमा झाली आहे, याबाबतची सविस्तर माहिती समितीस देण्यात यावी.

(२) सध्याच्या दुष्काळी काळामध्ये (सन २०१२-१३ या वर्षात) केंद्रिय महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेवर तसेच राज्य रोजगार हमी योजनेवर एकूण किती मजूर कार्यरत आहेत? तसेच सदर योजनेवर सन २०१२-२०१३ मध्ये केंद्र शासनाने एकूण किती रुपये खर्च करणे अपेक्षित होते? आतापर्यंत किती रक्कम खर्च करण्यात आली? याबाबतची सविस्तर माहिती समितीस देण्यात यावी.

(३) रोजगार हमी योजनेअंतर्गत सध्या मजूरांची हजेरी बायोमेट्रिक पद्धतीने घेऊन त्यांची मजुरी त्यांच्या बँक खात्यावर परस्पर जमा करण्याची योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेची अंमलबजावणी राज्यात प्रत्यक्षात किती ठिकाणी झालेली आहे व त्याची सद्यस्थिती काय आहे? याबाबतची सविस्तर माहिती समितीस देण्यात यावी.

वरील मुद्यांबाबत विभागाकडून प्राप्त झालेली माहिती **परिशिष्ट 'ब'** मध्ये सादर करण्यात आली आहे.

त्यानंतर सन २०१५-२०१६ करिता नव्याने गठीत झालेल्या समितीने विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विचारात घेतली व पुन्हा काही मुद्यांबाबतची माहिती विभागाकडून मागविली. विभागाकडून प्राप्त झालेली माहिती **परिशिष्ट 'क'** मध्ये सादर केली आहे.

समितीने **या नियमांना अंतिम स्वरूप देण्यात आले आहे काय? अशी विचारणा केल्यानंतर नियोजन विभागाने सदर नियम अंतिमरित्या तयार करून ते दिनांक १ एप्रिल, २०१३ रोजी प्रसिद्ध केले होते. परंतु ते त्यांनी उपविधान समितीपुढे पर्यायाने विधानमंडळाच्या पटलावर ठेवले नव्हते. ते अंतिम नियम विभागाने दिनांक ७ जानेवारी २०१६ रोजी उपविधान समितीकडे विचारार्थ सादर केले. त्यावर समितीने विभागास विचारलेली माहिती व सदरहू नियमांची अंतिम अधिसूचना दिनांक २३ फेब्रुवारी २०१६ रोजी विचारात घेतली व त्यासंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्याचा निर्णय घेतला.**

सदर अधिसूचनेसंदर्भातील विभागीय सचिवांची साक्ष दिनांक २ मार्च, २०१६ रोजीच्या बैठकीत आयोजित करण्यात आली होती. सदर साक्षीच्या वेळी समितीने खालील मुद्यांची माहिती विचारली.

बेकारभत्ता मिळण्याकरिता जो फॉर्म क्रमांक ०४ आवश्यक असतो, तो ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध नसतो. सन २०१५-२०१६ मध्ये याकरिता १००० कोटीपेक्षाही अधिक तरतूद दर्शविलेली आहे. मग्रारोहयो व राज्य शासनाच्या रोजगार हमी योजनेतील तरतुदीनुसार प्रती कुटुंब कुशल कामाची हमी केंद्र शासनाने दिलेली आहे. परंतु प्रशासनाचा व दुष्काळामुळे रोजगार हमी योजनेचा अनुभव पाहता ९० दिवसांपेक्षा अधिक काम उपलब्ध होत नाही. अशा परिस्थितीत राज्यातील सर्व ग्रामपंचायतीत फॉर्म क्रमांक ०४ जो बेकार भत्त्याकरिता आवश्यक असतो, तो उपलब्ध होत नाही. याची कारणे समितीसमोर स्पष्ट करण्यास सांगितले असता याबाबत विभागीय प्रतिनिधींनी असे स्पष्ट केले की, मग्रारोहयो व रोहयो या दोन्ही योजनेंतर्गत शासनाकडून बेकार भत्ता दिला जातो. त्यामध्ये याबाबतच्या तरतुदी कशा पद्धतीने केलेल्या आहेत, व प्रशासन त्यानुसार याबाबत कशा पद्धतीने कार्यवाही करते, याबाबत त्यांनी अधिनियमातील तरतूद सांगितली. ग्रामपंचायत जर अर्जदाराचा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत अर्जदारास रोजगार देऊ शकत नसेल तर तो ही बाब अगोदर सह कार्यक्रम अधिकाऱ्याच्या किंवा कार्यक्रम अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देईल, जेणेकरून कार्यक्रम अधिकाऱ्याला किंवा सह कार्यक्रम अधिकाऱ्याला पर्यायी व्यवस्था करणे शक्य होईल. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मधील तरतुदीनुसार वित्तीय वर्षातील पहिल्या तीस दिवसांकरिता किमान वेतनदर रक्कम रुपये १८१ च्या एक चतुर्थांश दराने आणि वित्तीय वर्षाच्या उर्वरित कालावधीकरिता वेतन दराच्या १/२ दराने बेरोजगार भत्ता देय आहे. पुरुष व स्त्रियांना एकाच दराने बेरोजगार भत्ता दिला जातो.

रोजगाराची मागणी करणाऱ्या एखाद्या अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्यापासून किंवा आगाऊ केलेल्या अर्जाच्या बाबतीत ज्या दिनांकास रोजगाराची मागणी केली असेल त्या दिनांकापासून यापैकी जो नंतरचा

असेल तेव्हापासून पंधरा दिवसांच्या आत त्याला रोजगार पुरविण्यात आला नसेल तर, तो, या कलमानुसार दैनिक बेरोजगार भत्ता मिळण्यास हक्कदार असेल. वेतन भत्त्याचा दर वित्तीय वर्षात पहिल्या तीस दिवसांकरिता वेतन दराच्या एक/चतुर्थांशपेक्षा कमी असणार नाही आणि वित्तीय वर्षाच्या उर्वरित कालावधीकरिता तो वेतन दराच्या एक द्वितीयांशापेक्षा कमी असणार नाही.

अठरा वर्षांवरील प्रौढ व्यक्तींना केंद्र शासनाची १०० दिवस प्रती कुटुंब अकुशल रोजगाराची हमी तर १०० दिवसांवरील प्रत्येक मजूराला रोजगाराची राज्य शासनाची हमी देण्यात आलेली आहे.

राज्याचा व केंद्राचा यासंदर्भातील निधी आयुक्त, नरेगा, नागपूर यांच्या नावे जमा होतो. त्यातून याकरिता खर्च केला जातो. एमआयएसमध्ये यासंदर्भातील नोंद होत असते. जालना, परभणी, सिंधुदूर्ग, वाशिम, पालघर या जिल्ह्यांमध्ये सन २०१५-२०१६ मध्ये ६, ६७, १२२/- इतका निधी दिलेला आहे. ४४६ मजूरांना हा बेकार भत्ता दिलेला आहे. याकरिता ग्रामपंचायतींमध्ये टेक्निकल स्टाफ भरण्याकरिता देखील विभागाने मंजूरी दिलेली आहे. बीडीओ व तहसीलदार यांच्या हस्ते कामांचे कार्यारंभ आदेश दिले जातात. एजन्सीकडून कामे करून घ्यावयाची असतील तर तहसीलदार कार्यारंभ आदेश देत असतात. ग्रामपंचायतींकडून कामे करून घ्यावयाची असतील तर ग्रामपंचायतीच्या बॉडीकडून आदेश प्राप्त करून घेणे आवश्यक असते.

याबाबत समितीने ग्राम पातळीवर खाजगीरित्या म्हणजे एजन्सीकडून कामे करण्याकरिता व ग्रामपंचायतीच्या माध्यमातून जिल्हापरिषदेकडून काही कामे करून घेण्याकरिता कोणकोणत्या अटी आहेत? याची विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, ग्राम पातळीवरील एजन्सीकडील कामे मान्य करून घेण्याकरिता तहसीलदारांची मान्यता आवश्यक असते. काही कामांकरिता जिल्हापरिषद पातळीवरील शाखा अभियंता यांची मान्यता आवश्यक असते. यामध्ये ग्रामपंचायतीला नोडल एजन्सी म्हणून नेमलेले असते.

एखाद्या कामाचे सर्वेक्षण होऊन त्याच्या अंदाजपत्रकास व तांत्रिक मान्यता देणे या तीनही गोष्टी जिल्हापरिषदेचा शाखा अभियंता करीत असतो. त्यामुळे तहसीलदार व इतर घटकांची मान्यता घेण्याबाबत स्पष्टीकरण देण्याबाबत समितीने विचारणा केली असता याबाबत विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, या कामांमध्ये खाजगी व ग्रामपंचायत/जिल्हापरिषद असे वर्गीकरण जरी असले तरीही सेल व सेल्फपुरती असलेल्या कामांकरिता मान्यता देण्याकरिता कायद्यामध्ये तरतुदी केलेल्या आहेत. जिल्हापरिषदेमध्ये याकरिता यंत्रणा नियुक्त केलेली आहे. जास्तीत जास्त कामे जिल्हापरिषदेच्या नियमित यंत्रणेकडून होत असतात. उर्वरित खाजगीरित्या सेल्फ व सेलपुरती केलेल्या कामांच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्याकरिता असलेल्या तरतुदींमध्ये फरक आहे. ठेकेदाराचा टेक्निकल स्टाफ नेमण्याकरिता परवानगी दिलेली आहे. तसेच, याकरिता लागणारा सपोर्ट स्टाफही जिल्हापरिषदेने नेमण्याकरीता परवानगी दिलेली आहे. यामध्ये जे.ई.ने २५ टक्के काम पाहावे, असे आदेश दिलेले आहेत.

ग्रामपंचायतींकडे काम करण्याकरिता पुरेशा निधीची तरतूद नसते. मजुरांना १५ दिवसांत काम उपलब्ध करून दिले नाही तर, त्यांना बेरोजगार भत्ता लागू होतो. मग आतापर्यंत अशा किती मजुरांना आपण व बेरोजगार भत्ता दिलेला आहे. प्रत्येक मजुराच्या हाताला काम उपलब्ध करून देण्याची शासनाची जबाबदारी आहे. आपण बेरोजगार भत्ता दिल्याची आकडेवारी तर काही पॉईंटमध्ये होईल इतकी अत्यल्प आहे. बेरोजगारांची प्रचंड संख्या असताना भविष्यात त्यांना कोणत्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून दिला जाणार आहे याबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी असे स्पष्ट केले की, दिनांक २९ फेब्रुवारी २०१६ रोजीचा रिपोर्ट आहे. त्यानुसार राज्यात ३२३५७ कामे सुरू आहेत व मजुरांची संख्या ४७६५२० इतकी आहे. गेल्या वर्षी दिनांक २८ फेब्रुवारी २०१५ रोजीची आकडेवारी पाहिली तर, ३ लाख २३ हजार इतके मजूर होते. याचाच अर्थ गेल्या वर्षीच्या तुलनेत जवळपास दीड लाख अधिक मजूर या वर्षी काम करीत आहेत.

राज्यात किती जॉब कार्ड वितरित झाले आहेत व प्रत्यक्षात किती मजूर काम करीत आहेत अशी माहिती समितीने विचारली असता याबाबत विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, ७६ लाख जॉब काड्र्स दिलेले आहेत. या वर्षी किमान एक दिवस कामावर आलेल्या मजुरांची संख्या १६ लाख इतकी आहे. २-३ वर्षांत किमान एक दिवस कामावर आलेल्या मजुरांची संख्या ३४ ते ३५ लाख इतकी आहे. कोकण भागातील मजुरांची संख्या १९ हजार इतकी असून त्यातील पालघर येथील मजुरांची संख्या ११८०० इतकी आहे. तेथे ८०० कामे सुरू असून त्यातील यंत्रणेची ३१९ तर ग्रामपंचायतीची ४८१ कामे आहेत.

समितीने कुशल कामासंदर्भात अशी विचारणा केली की, केंद्र शासनाच्या १०० दिवसांच्या कुशल कामाच्या हमीमध्ये ५१:४९ चा रेशिओ आहे. कुशल काम १०० टक्के उपलब्ध करून दिले जात नाही. राज्यातील सर्व कामांना अकुशल व कुशल कामांच्या रेशिओचे बंधन लागू राहील काय? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, सर्वसाधारणतः ६०:४० असा रेशिओ आहे. ग्रामपंचायत पातळीवरील एकूण कामाचा रेशिओ ६०:४० असा आहे. कुशल व अकुशल कामांचा गावांमध्ये एकूण खर्च जितका होतो, त्यातील कुशल कामाच्या खर्चापैकी ६०:४० च्या रेशिओप्रमाणे कुशल कामांना मान्यता दिली जाते तसेच कुशल कामांच्या खर्चामध्ये अकुशल कामाच्या खर्चाचा रेशिओ नियमाप्रमाणे बसविल्यास उर्वरित खर्चात इतर कुशल कामांचे बजेट अकुशल कामांच्या खर्चाचा रेशिओ वजा करून बसविणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या नॉर्मसप्रमाणे अकुशल व कुशल कामांच्या खर्चाच्या रेशिओचे गुणोत्तर बसवून त्यास मान्यता घेऊनच कामाला सुरूवात करता येते. ५० टक्के खर्च कुशल व ५० टक्के खर्च अकुशल कामांवर करून देखील एखादा प्रकल्प योजनेतील तरतुदीनुसार साकारता येतो.

जिल्हानिहाय किती कामे आहेत ? जॉबकार्ड असलेले मजूर आपल्याकडे बेकार आहेत. तरीही कामे भरपूर आहेत, तरीही मजूर उपलब्ध झाले नाहीत अशी परिस्थिती उद्‌भवली का ? मजूरांचे जॉबकार्ड व बायोमॅट्रिकचे काम पूर्ण झालेले आहे का, याबाबतची कारणे समितीसमोर स्पष्ट करण्याबाबत सांगितले असता त्यांनी अशी माहिती दिली की, कोकणामध्ये १०१,००,००० मॅण्डेज आहेत. एकूण राज्यात १२८५ लाख मॅण्डेज सेलवर आहेत. ३,९६,००० कामे सेलवर चालू आहेत. ४,७६,००० इतर घटकांवर चालू आहेत. जानेवारी महिन्यानंतर मजूरांची कामावर येण्याची संख्या अनेक पटींमध्ये वाढते. आधार शेडींगचे काम चालू आहे. ८३ टक्के मजूरांचे आधार कार्डाशी लिंक-अप करण्याचे काम पूर्ण झालेले आहे. मजूरांची मजूरी ही थेट बँकेमध्ये ई-पेमेंटद्‌वारे केली जाते. या सर्व बाबींचे अकाऊंट आयुक्त, नरेगा, नागपूर यांच्याकडे आहे. त्यांना डिजिटल सिग्नेचरचे अधिकार दिलेले आहेत. मजूरांची यादी ई-पेमेंटकरिता मागविल्यानंतर त्यावर ओके करून संबंधित कोडवर्ड पाठविला जातो. यामुळे मजूरांना थेट बँक अकाऊंटमध्ये मजूरी ई-पेमेंटच्या आधारे मिळते. आधार शेडींग झाल्यानंतर बायोमॅट्रिक व आधार लिंक अप ई-पेमेंटच्या सुविधेमध्ये सुकरता येते. लवकरच हे आधार शेडींगचे काम पूर्ण होईल.

दिनांक २ मार्च २०१६ रोजी झालेल्या बैठकीत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीदरम्यान विभागाकडून प्राप्त झालेली **(माहिती परिशिष्ट 'ड' मध्ये सादर करण्यात आली आहे.)** माहिती समितीच्या बैठकीत विचारार्थ ठेवली असता **समितीने 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र बेरोजगार भत्ता' या प्रारूप व अंतिम नियमांवर विचारविनिमय केला व शिफारस सूचविली.**

अभिप्राय व शिफारस :

सदर अधिसूचनेसंदर्भातली अंतिम नियम उपविधान समितीकडे पाठविण्यास झालेल्या विलंबाबाबत समितीने नापसंती व्यक्त केली असून विभागाने भविष्यात प्रत्येक अधिनियमांतर्गत असलेल्या तरतुदींनुसार तयार केलेले नियम प्रसिद्ध केल्याबरोबर ते उपविधान समितीकडे पाठविण्याबाबत दक्षता घ्यावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.

परिशिष्ट "अ"

अ.शा.प.क्र.बेपनि २०१२/प्र.क्र.३०/ रोहयो १०

नियोजन विभाग,रोहयो प्रभाग
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २५ मार्च,२०१३

(व्ही.गिरीराज)
प्रधान सचिव (रोहयो)

विषय: महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र बेरोजगार भत्ता नियम २०१३ प्रारुप अधिसूचना बाबत.

संदर्भ-: क्र. ८२९५/मविस/उपविधान समिती, दि. २७ फेब्रुवारी,२०१३

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, केंद्र शासनाने सन २००५ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम पारित केला. त्यानुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या महत्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी देशातील २०० जिल्हयात सुरु झाली. महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात सन २००६ मध्ये १२ जिल्हयात मगांराग्रारोहयोची अंमलबजावणी सुरु झाली. सुरवातीला केंद्रशासनाच्या या योजनेची व्याप्ती किती जिल्हयात किती कालावधीत वाढविणार याबाबत स्पष्टता नव्हती. टप्प्याटप्याने एप्रिल २००७ मध्ये ६ जिल्हयात व एप्रिल २००८ मध्ये १५ जिल्हयात या योजनेच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली. **संपूर्ण राज्यात २००८-०९ या कालावधीत या योजनेच्या अंमलबजावणीस पूर्णत: सुरवात झाली.**

केंद्रीय कायदा २००५ मधील कलम २८ अन्वये राज्यात जर अशा प्रकारचा स्वत:चा कायदा अस्तित्वात असेल तर राज्य शासन अशा प्रकारच्या कायदयाचा अंमल चालू ठेवू शकेल.त्यानुसार केंद्राच्या योजनेच्या अंमलबजावणीकरिता व आर्थिक हिस्सा मिळविण्याकरिता महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ मध्ये सन २००६ मध्ये केंद्रीय कायदयाशी सुसंगत सुधारणा करण्यात आल्या. त्या अन्वये १६ ब हे कलम समाविष्ट केले व ज्या जिल्हयांचा या योजनेअंतर्गत समावेश झाला त्या जिल्हयांना १६ ब मधील तरतूदी लागू होईल अशी कायदयात सुधारणा केली.

सुरवातीच्या २००६-२००८ या कालावधीत केंद्राची मगांराग्रारोहयो व राज्य रोहयो या दोन्ही योजना समांतररित्या चालू होत्या. सदर योजना केंद्र शासनाची असल्यामुळे या मध्ये विशिष्ट

कार्यपध्दतीचा अवलंब करावयाचा होता. विशेषत: यामध्ये MIS व reporting वर भर होता. या योजनेच्या कार्यप्रणालीचे सुलभीकरण करुन अंमलबजावणीस गती देण्याकरिता सुरुवातीला २ वर्षाचा कालावधी लागला. त्यामुळे सुरुवातीच्या वर्षात या योजनेचा खर्च रु.३०० कोटीपर्यंतच झाला. या पार्श्वभूमीवर मागील वर्षभरात घेतलेले विविध निर्णय जसे की, योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता नागपूर येथे स्वतंत्र आयुक्तालयाची स्थापना व राज्य राग्रारोहयो निधीची निर्मिती. योजनेंतर्गत कृषी, पशूधन, मत्स्य व्यवसाय, पिण्याचे पाणी, स्वच्छता विषयक ३० नवीन कामांचा समावेश परिणाम स्वरुप सन २०११-१२ मध्ये या योजनेंतर्गत ७४० लक्ष मनुष्यदिन निर्मिती झाली असून रु.१६०० कोटीपर्यंत खर्च झाला आहे. केंद्र शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या महत्वाकांक्षी योजनेची यशस्वी अंमलबजावणी राज्यात होत आहे.

महाराष्ट्र रोजगार हमी कायदा सुधारणे नंतर केंद्रशासनाची महत्वाकांक्षी योजना राज्यात यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्याकडे जास्त भर देण्यात आला. याच कालावधीत बेरोजगार भत्ता नियम तयार करण्याचे कामकाज सुरु होते. तरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र बेरोजगार भत्ता नियम २०१३ प्रसिध्दीची कार्यवाही झाल्यास या केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी योजना अंमलबजावणी कामास गती मिळेल. तरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र बेरोजगार भत्ता प्रारुप नियम २०१३ तसेच प्रगती अभियान या स्वयंसेवी संस्थेकडून बेरोजगार भत्ता नियमांच्या अनुषंगाने प्राप्त झालेली सूचनेची छापील प्रत व सद्यस्थितीत बेरोजगार भत्ता प्रतिदिन किती दिला जातो याबाबतची माहिती उपविधान समिती सदस्यांना अवलोकनार्थ सादर करण्याबाबत कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला,

(व्ही. गिरीराज)

सोबत-वरीलप्रमाणे

Recd. 27/3/13

प्रति,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व राज्याची रोजगार हमी योजना यांची सांगड घालून सर्वंकष रोजगार हमी योजना (महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना) राबविणे.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक : रोहयो-२००५/प्र.क्र.१०४/रोहयो-१०
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २३ डिसेंबर २००५

प्रस्तावना :

दिनांक २३ ऑगस्ट २००५ रोजी लोकसभेने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंमलात आणण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी विधेयक, २००५ पारित केले आहे. त्यास दिनांक ५ सप्टेंबर २००५ रोजी राष्ट्रपतींनी मंजूरी दिली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्रात कशा प्रकारे करावी व सध्या महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या रोजगार हमी योजनेची हया राष्ट्रीय योजनेशी कशी सांगड घालावी हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यावर शासनाने विचार केला असून आता शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

शासन निर्णय :

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ व राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ या दोन्ही कायद्यातील विसंगती दूर करुन व दोन्हीतील अधिक चांगल्या व आवश्यक बाबी घेऊन राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या कलम ४ व २८ अन्वये एक सर्वंकष रोजगार हमी योजना (महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अंमलात आणण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे मजूरांना सध्याच्या रोहयोखालील अधिकच्या सोयी-सवलती मिळत राहतील व रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावी होईल.

२. पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. ते जिल्हे म्हणजे धुळे, नंदूरबार, अहमदनगर, औरंगाबाद, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, अमरावती, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, व गडचिरोली.

३. भविष्यकाळात केंद्रशासन आणखी ज्या जिल्ह्यात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा राबविण्याचे आदेश काढील त्या जिल्ह्यात सुध्दा सदर महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंमलात येईल.

४. उपरोक्त १२ जिल्हे, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळता इतर जिल्ह्यात व संपूर्ण राज्यातील 'क' वर्ग नगर परिषद हद्दीत सुध्दा हीच योजना काही बाबतीत महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ प्रमाणे राबविण्यात येईल. मात्र तेथे सुध्दा केंद्रशासनाच्या कायद्याप्रमाणे सर्व इच्छुक कुटूंबांना जॉब कार्ड व ओळखपत्र हे देण्यात येतील. याविषयी सविस्तर सूचना स्वतंत्रपणे देण्यात येत आहेत.

५. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची वैशिष्ट्ये थोडक्यात पुढीलप्रमाणे असतील :-

(१) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ च्या कलम २ (जी) प्रमाणे कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून शासकीय यंत्रणांशिवाय जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, अशासकीय संस्था, स्थानिक संस्था किंवा शासनाचे उपक्रम यांना नियुक्त करण्यात येईल.

(२) कलम ६ (१) प्रमाणे केंद्रशासन ठरवील त्यानुसार किमान मजुरी दर लागू होईल.

(३) कलम ७ (२) प्रमाणे बेरोजगार भत्ता देण्यात येईल. म्हणजेच, पाहिल्या ३० दिवसांपर्यंत किमान वेतनाच्या २५ टक्के व नंतर ५० टक्के दराने बेरोजगार भत्ता देण्यात येईल.

(४) कलम १२ प्रमाणे महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद स्थापन करण्यात येईल.

(५) कलम १३ प्रमाणे ग्रामपंचायतीचा नियोजनात सहभाग राहील.

(६) कलम १६ प्रमाणे ग्रामपंचायतीवर योजनेच्या विविध जबाबदाऱ्या सोपविण्यात येतील.

(७) कलम १० प्रमाणे कामाच्या निवडीत ग्रामसभेचा सहभाग घेण्यात येईल.

(८) कलम १८ प्रमाणे जिल्हाधिकारी हे जिल्हा कार्यक्रम समन्वयन अधिकारी राहतील

(९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे सह जिल्हा कार्यक्रम समन्वय अधिकारी राहतील.

(१०) कलम १५ प्रमाणे पंचायत स्तरावर गट कार्यक्रम अधिकारी नियुक्त करण्यात येतील. ते उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली काम करतील.

(११) गट कार्यक्रम अधिकारी यांना तांत्रिक व अतांत्रिक आस्थापना उपलब्ध करुन देण्यात येईल.

(१२) कलम २३ प्रमाणे योजनेत पारदर्शकता आणण्यात येईल.

(१३) इतर सर्व बाबी राज्याच्या रोहयोप्रमाणे राहतील

६. १०० दिवसांपर्यंतच्या रोजगाराच्या हमीच्या खर्चासाठी स्वतंत्र हिशोब ठेवावा, जेणेकरुन केंद्रशासनाकडून आर्थिक सहाय्य प्राप्त करुन घेणे सोयीचे जाईल. हा हिशोब नीट ठेवता यावा म्हणून प्रत्येक कामावरील पाथरवडयाचे मस्टर बंद झाल्यावर व मजूरांना त्यांचे वेतन दिल्यानंतर त्या मस्टरची एक अतिरिक्त प्रत गट कार्यक्रम अधिकाऱ्याकडे तात्काळ पाठविण्यात येईल. त्यावरुन प्रत्येक कुटूंबातील व्यक्तींची नावे, त्यांच्या जॉब कार्डवरील क्रमांक, त्यांनी काम केलेल्या दिवसांची संख्या व त्यांना मिळालेले वेतन यांचा डाटा संकलित करुन त्यानुसार केंद्रशासनाकडून वेतनावर्गात (कुशल, अर्धकुशल व अकुशल) देय असलेली रक्कम निश्चित करण्यात यावी. यासाठी तातडीने संगणकीकरण करण्यात यावे

७. १०० दिवसांपेक्षा अतिरिक्त रोजगार देण्याची जबाबदारी राज्याच्या रोहयो निधीमधून पूर्ण करावी.

८. सदर योजनेकरिता जिल्हाधिकारी हे कार्यक्रम समन्वय अधिकारी असतील व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे सह जिल्हा कार्यक्रम समन्वय अधिकारी राहतील.

९. गट कार्यक्रम अधिकाऱ्यांचे आवश्यक ती पदे केंद्रशासनाने निवडलेल्या जिल्ह्यातील गटांसाठी पदे निर्माण करुन ती कंत्राटी पध्दतीने भरावीत. ते उप विभागीय अधिकारी (महसूल) यांच्या मार्गदर्शनाखाली काम करतील. पदे भरेपर्यंत तहसिलदार यांच्याकडे हे काम सोपविण्यात यावे.

१०. जिल्हाधिकारी कार्यालय व तहसिलदार कार्यालयासाठी सध्याच्या महाराष्ट्राच्या रोहयोसाठी जी यंत्रणा आहे ती या योजनेसाठी वापरण्यात यावी.

११. आवश्यक तेथे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यानुसार व केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी, जेणेकरुन केंद्राचे आर्थिक सहाय्य मिळण्यात अडचण येणार नाही.

१२. महाराष्ट्र ग्रामीण रोहयोखाली पुढीलप्रमाणे कामे घेता येतील:-

(१) जलसंधारण व जलसंवर्धन कामे :- मातीचे बांध, दगडी बांध, ढाळीचे बांध, कंपार्टमेंट बांध, वनराई बंधारा, जैविक बांध, सलग समतल चर, तुटक समतल चर, ट्रेंच कम मार्कंड, सामुहिक शेत तळे, मातीचे धरण, साठवण तलाव, पाझर तलाव, पाझर कालवे, गाव तलाव, भूमिगत बंधारे, वन तलाव, बोडी नूतनीकरण.

(२) दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणासहित) :- पडीक जमिनीवर वृक्ष लागवड, रस्त्याच्या बाजूला वृक्ष लागवड, रोप वाटिका, वृक्ष लागवड,जाळ रेषांची कामे, बांबू रांझ्या भोवती वर्तुळाकार चर काढणे, वृक्ष लागवड.

(३) जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सूक्ष्म जलसिंचनाची कामे) :- मातीचे कालवे, कालव्याचे नूतनीकरण.

(४) अनुसूचित जाती /जमाती, नवीन भूधारक किंवा इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे.

(५) पारंपरिक पाणीसाठ्यांचे योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे :- तलावातील गाळ काढणे, जुन्या तलावाचे नूतनीकरण करणे व जुन्या वन तलावाचे नूतनीकरण करणे.

(६) भूविकासाची कामे.

(७) पूरनियंत्रण व पूरसंरक्षकाची कामे. पाणथळ क्षेत्रात चा-याची कामे :- खार जमीन विकास बंधारे.

(८) ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची काम :- इतर जिल्हा रस्ते, गांव रस्ते, गावातील अंतर्गत रस्ते, शेत रस्ते, स्मशान भूमी व पाणी पुरवठा इत्यादींना जोडणारे रस्ते, रस्त्यांचे नूतनीकरण, रस्त्यांचे रुंदीकरण.

परिशिष्ट "ब"

क्रमांक: बेभनि २०१२/प्र.क्र.३०/रोहयो-१०

नियोजन विभाग (रोहयो),मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
नवीन प्रशासकीय इमारत, १६ वा मजला,
मंत्रालय, मुंबई- ३२
दिनांक : १२ ऑगस्ट, २०१३

प्रति,

उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधानभवन
मुंबई

विषय: महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र बेरोजगार भत्ता नियम,२०१२ प्रसिध्द करणारी प्रारुप अधिसूचना क्र.बेभनि २०१२/प्र.क्र.३०/रोहयो-१०, दि. २/९/२०१३

संदर्भ- आपले क्र. २८६३५/म.वि.स. उप विधान/ड-११, दि. २ जुलै,२०१३ रोजीचे पत्र

महोदय,

संदर्भाधीन पत्रास अनुसरुन, उक्त नमूद विषयांकित अधिसूचनेसंदर्भातील आवश्यक मुद्दयांबाबतची माहिती पुढीलप्रमाणे:-

अ.क्र.	मुद्दा	माहिती
१	रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता शासकीय, निमशासकीय कर्मचा-यांना प्रोफेशनल टॅक्स लावण्यात येतो. शासकीय कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू झाल्यामुळे या रकमेत बरीच वाढ झालेली आहे. तरी मागील दहा वर्षापासून प्रोफेशनल टॅक्सच्या माध्यमातून शासनाच्या तिजोरीत एकूण किती रक्कम जमा झाली आहे. याबाबतची सविस्तर माहिती समितीस देण्यात यावी.	सदर विषय वित्त विभागाकडून हाताळला जातो. त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या' माहितीनुसार, महाराष्ट्र व्यापार, आजिविका आणि नोक-यांवरील कर अधिनियम,१९७५ नुसार व्यवसायकर हा नोकरदार, व्यावसायिक, वकील, डॉक्टर, तांत्रिक व व्यावसायिक सल्लागार, कंत्राटदार, एजंट, कंपन्यांचे संचालक व्यापारी, वाहतूकदार इत्यादींना भरावा लागतो. व्यवसायकर कायद्याच्या कलम 30 (1) अन्वये शासनास करापोटी जमा होणारी रक्कम शासनाच्या एकत्रित निधीत जमा होईल. व तदनंतर शासनाला प्राप्त होणा-या महसुलामधून कर वसूलीचा खर्च तसेच स्थानिक प्राधिकरणाला द्यावयाच्या अनुदानाची रक्कम त्यातून वजा होऊन उर्वरित रक्कम रोजगार हमी निधीकडे हस्तांतरीत करण्याची तरतूद होती, तसेच याच अधिनियमातील कलम 30(2) नुसार कलम 30(1) अन्वये हस्तांतरित केलेल्या रकमेइतके अनुदान राज्य शासनाने रोजगार हमी निधीत जमा करण्याची तरतूद होती. तथापि ही तरतूद मार्च 2008 मध्ये करण्यात आलेल्या सुधारणेनुसार बदलून

		पुढीलप्रमाणे करण्यात आली. या अधिनियमान्वये वसूल करण्यात आलेल्या कराचे उत्पन्न एकत्रित निधीत जमा करण्यात येईल आणि राज्य शासनाकडून कर गोळा करण्याचा व वसूलीचा खर्च आणि स्थानिक प्राधिकरणांना द्यावयाची अनुदानाची रक्कम त्यातून वजा करुन उर्वरित रकमेतून प्रत्येक वित्तीय वर्षाच्या सुरुवातीस महाराष्ट्र रोजगार हमी निधीमध्ये जमा असलेली रक्कम रु. 2000 कोटीपेक्षा कमी असणार नाही याची सुनिश्चिती होईल इतकी रक्कम त्या निधीखाती हस्तांतरीत करण्यात येईल. त्यामुळे रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता शासकीय व निमशासकीय कर्मचा-यांना व्यवसायकर लावण्यात येतो असे गृहित धरता येणार नाही. सदर योजनेसाठी आवश्यक निधी राज्याच्या एकत्रित निधीतून हस्तांतरित करण्यात येतो. मागील 10 वर्षात व्यवसायकरातून जमा झालेली एकूण रक्कम पुढीलप्रमाणे आहे. क्र. / आर्थिक वर्ष / व्यवसायकर प्राप्ती १) २००२-०३ १०२०३०८९३४३ २) २००३-०४ १००९४७८४००० ३) २००४-०५ १०७४१३१३००० ४) २००५-०६ ११५४५६९००० ५) २००६-०७ १२४४५९९२००० ६) २००७-०८ १४५७९०७४००० ७) २००८-०९ १४२४५१२२००० ८) २००९-१० १३७३२९०४००० ९) २०१०-११ १६१०४११९००० १०) २०११-१२ १८२४६१७३०००
२	सध्याच्या दुष्काळी काळामध्ये (सन २०१२-१३ या वर्षात) केंद्रीय महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेवर तसेच राज्य रोजगार हमी योजनेवर एकूण किती मजूर कार्यरत आहेत? तसेच सदर योजनेवर सन २०१२-१३ मध्ये केंद्र शासनाने एकूण किती रुपये खर्च करणे अपेक्षित होते? आतापर्यंत किती रक्कम खर्च करण्यात आली? याबाबतची सविस्तर माहिती समितीस देण्यात यावी.	सन २०१२-१३ या वर्षात केंद्रीय महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवर एकूण १,५१,४७,००१ इतकी मजूर उपस्थिती होती. तथापि, राज्य रोहयोंतर्गत केवळ वैयक्तिक लाभाची कामे घेतली जातात. यास्तव राज्य रोहयोवर मजूर कार्यरत असण्याचा प्रश्न उद्भवत नाही. सदर योजना ही मागणीप्रवण (Demand Driven Scheme)आहे. राज्यात सन २०१२-१३ या वर्षात एकूण रु.२१७७.१२ कोटी इतका खर्च झाला असून, त्यापैकी रु. १८०१.२४ कोटी केंद्र शासनाकडून प्राप्त झाले.

३	रोजगार हमी योजनेंतर्गत सध्या मजुरांची हजेरी बायोमेट्रिक पध्दतीने घेऊन त्यांची मजुरीत्यांच्या बँक खात्यावर परस्पर जमा करण्याची योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेची अंमलबजावणी राज्यात प्रत्यक्षात किती ठिकाणी झालेली आहे व त्याची सद्यस्थिती काय आहे? याबाबतची सविस्तर माहिती समितीस देण्यात यावी.	राज्यात सद्यस्थितीत सदर सुविधा कुठल्याही ठिकाणी कार्यरत नसल्याने तद्संबधिची माहिती निरंक आहे.

आपला,

(अशोक गायकवाड)
कार्यासन अधिकारी

प्रत-निवडनस्ती

परिशिष्ट "क"

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र बेरोजगार भत्ता नियम, २०१२, प्रसिध्द करणारी प्रारुप अधिसूचना क्रमांक-बेभनि-२०१२/प्र.क्र.३०/रोहयो-१०, दिनांकित २ जानेवारी, २०१३."

प्रश्न	खुलासा
१. उपरोक्त प्रारुप अधिसूचनेसंदर्भातील अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे काय, असल्यास ती केव्हा प्रसिध्द करण्यात आली आहे? असल्यास सदर अधिसूचना उपविधान समितीस का पाठविण्यात आली नाही याबाबत सविस्तर खुलासा करावा.	१. महाराष्ट्र बेरोजगार भत्ता नियम २०१२, संदर्भातील अंतिम अधिसूचना दि.१ एप्रिल, २०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर अधिसूचना दि. ७ जानेवारी,२०१६ रोजी विधानमंडळास उपलब्ध करुन देण्यात आली आहे. महाराष्ट्र बेरोजगार भत्ता नियम २०१३, विधी व न्याय विभागाच्या मान्यतेसह महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्र भाग ४- ब मध्ये इंग्रजी व मराठीमध्ये दि. ३ जानेवारी, २०१३ रोजी पूर्व प्रसिध्दीकरिता अधिसूचित करुन सूचना व हरकती मागविण्यात आल्या. या अनुषंगाने प्राप्त झालेली सूचना तसेच प्रधान सचिव (रोहयो) यांच्या दि. २५ मार्च, २०१३ च्या अ.शा.पत्रान्वये सदर अधिसूचना स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह ७५ प्रतीमध्ये उप विधान समितीच्या अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आली. तदनंतर सदर नियमांच्या अनुषंगाने महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने वेळोवेळी मागविलेली माहिती रोहयो प्रभागाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. प्राप्त झालेली सूचना विचारात घेऊन त्याप्रमाणे प्रारुप अधिसूचनेमध्ये किरकोळ बदल करुन दि. १ एप्रिल, २०१३ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आले. तथापि, अंतिम अधिसूचनेची प्रत उप विधान समितीस पाठवावयाचे अनवधानाने राहून गेले.
२. सद्यस्थितीत बेरोजगार भत्ता प्रतिदिन किती देण्यात येतो? याबाबतची सविस्तर माहिती कागदपत्रांसह देण्यात यावी.	२. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ (६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित) नधील तरतुदीनुसार, वित्तीय वर्षातील पहिल्या तीस दिवसांकरिता किमान वेतनदर रक्कम रु.१८१/- च्या एक चतुर्थांश (१/४%) दराने आणि वित्तीय वर्षाच्या उर्वरित कालावधीकरिता वेतन दराच्या एक द्वितीयांश (१/२%) दराने बेरोजगार भत्ता देय आहे. पुरुष व स्त्रियांना एकाच दराने बेरोजगार भत्ता दिला जातो.
३. रोजगार हमी योजनेतर्गत मजुरांची हजेरी बायोमेट्रिक पध्दतीने घेऊन त्यांची मजुरी त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याची योजना राज्यातील कोणकोणत्या जिल्ह्यात सुरु करण्यात आली आहे ?	३ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतर्गत मजुरांची हजेरी बायोमेट्रिक पध्दतीने घेऊन मजुरी प्रदान करण्याची योजना राज्यात अद्याप कुठल्याही जिल्ह्यात सुरु करण्यात आलेली नाही. परंतु मजुरांची मजुरी थेट त्यांच्या बँक/ पोस्टाच्या खात्यात जमा करण्यात येते.

बेरोजगार भत्ता प्रदान

६-ब. (१) [illegible] किंवा आगाऊ केलेल्या अर्जाच्या बाबतीत ज्या दिनांकास रोजगाराची मागणी केली असेल त्या दिनांकापासून यापैकी जो नंतरचा असेल तेव्हापासून पंधरा दिवसांच्या आत त्यास रोजगार पुरविण्यात आला नसेल तर, तो, या कलमानुसार दैनिक बेरोजगार भत्ता मिळण्यास हक्कदार असेल.

(२) विहित करण्यात येतील अशा पात्रतेविषयक अटी व शर्तीना अधीन राहून, आणि या अधिनियमाच्या तरतुदी आणि योजना व राज्य शासनाची आर्थिक क्षमता यांना अधीन राहून, राज्य शासन राज्य परिषदेशी विचारविनिमय करून राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा वर्षाने, कुटुंबाच्या कायदेशीर हक्कांच्या अधीन, एखाद्या कुटुंबातील अर्जदाराला पोट-कलम (१) अन्वये देय असलेला बेरोजगार भत्ता देण्यात येईल :

परंतु, असा दर, वित्तीय वर्षात पहिल्या तीस दिवसांकरिता वेतन दराच्या एक चतुर्थांशपेक्षा कमी असणार नाही आणि वित्तीय वर्षाच्या उर्वरित कालावधीकरिता तो वेतन दराच्या एक द्वितीयांशापेक्षा कमी असणार नाही.

[illegible]

परिशिष्ट " ड "

महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र बेरोजगार भत्ता नियम २०१२, प्रसिध्द करणारी प्रारुप अधिसूचना क्रमांक बेभनि-२०१२/ प्र.क्र.३०/ रोहयो-१०, दिनांकित २ जानेवारी, २०१३, तसेच महाराष्ट्र रोजगार हमी योजना-बेरोजगार भत्ता नियम २०१३, प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक बेभनि-२०१२/ प्र.क्र.३०/ रोहयो-१०, दिनांकित १ एप्रिल, २०१३

अ. क्र.	समितीने उपस्थित केलेले मुद्दे	माहिती
१	केंद्र शासनाची मनरेगा किंवा राज्य शासनाची रोजगार हमी योजना या दोन्ही योजनेमध्ये ज्या मजूरांना कामे देऊ शकत नाही अशा व्यक्तीला बेरोजगार म्हणून ग्राह्य धरले जाते काय ? तसे असल्यास त्यांना शासनामार्फत बेरोजगार भत्ता दिला जातो काय ?	महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत १८ वर्षावरील प्रौढ व्यक्तिंना १०० दिवस प्रतिकुटूंब अकुशल रोजगाराची हमी केन्द्र शासनाने घेतली आहे. तर १०० दिवस मजूरी पूर्ण झालेल्या कुटूंबातील प्रत्येक प्रौढ व्यक्तीला १०० दिवसावरील अकुशल रोजगाराची हमी राज्य शासनाकडून देण्यात आलेली आहे. नोंदणीकृत मजुराने (ज्या कुटूंबात जॉब कार्ड निर्गमित झाले आहेत त्यांचे सदस्यासे) कामाची मागणी नमुना क्र. ४ मध्ये ग्रामपंचायतीकडे केल्यावर, अशा मजुरांना १५ दिवसाच्या आत ग्रामपंचायतीने काम उपलब्ध करुन दिले नाही तर कामाच्या मागणीनुसार वित्तीय वर्षातील पहिले ३० दिवसाकरिता मजूरी दराच्या 25% दराने आणि वित्तीय वर्षाच्या उर्वरित कालावधीकरिता किमान मजूरी दराच्या 50% दराने बेरोजगार भत्ता संबंधितांस देय आहे.
२	या योजनेशी संबंधित केंद्र शासनाच्या कायद्यानुसार एका आर्थिक वर्षात १०० दिवस मागेल त्याला काम पुरविण्याची तरतूद करण्यात आली आहे काय, असल्यास त्यास अनुसरून ज्या व्यक्तीला १०० दिवसांपेक्षा कमी काम दिले असेल तर त्यास उरलेल्या दिवसांचा बेरोजगार भत्ता दिला जातो काय, असल्यास महाराष्ट्रातील त्यासंबंधी एखादे उदाहरण सांगता येईल काय?	१८ वर्षावरील प्रौढ व्यक्तिंना केन्द्र शासनाची १०० दिवस प्रतिकुटूंब अकुशल रोजगाराची हमी. तर १०० दिवसांवरील प्रत्येक मजुराला रोजगाराची राज्यशासनाची हमी देण्यात आलेली आहे. तदनुसार नोंदणीकृत मजुराने (ज्या कुटूंबात जॉब कार्ड निर्गमित झाले आहेत त्यांचे सदस्यास) कामाची मागणी नमुना क्र. ४ मध्ये ग्रामपंचायतीकडे केल्यावर, अशा मजुरांना १५ दिवसाच्या आत ग्रामपंचायतीने काम उपलब्ध करुन दिले नाही तर वर नमूद केल्याप्रमाणे बेरोजगार भत्ता संबंधितांस देय आहे.
३	या योजनेतर्गत बेरोजगारी भत्ता देण्यासाठी राज्यातील रोजगार हमी योजनात नवीन लेखाशीर्ष निर्माण करण्यात आला आहे काय, असल्यास त्यामध्ये किती निधीची तरतूद करण्यात आली आहे.	बेरोजगार भत्ता देण्यासाठी लेखाशीर्ष असून, ते पुढीलप्रमाणे आहे :- **"मागणी क्रमांक : ओ-३, मुख्य लेखाशीर्ष : २५०५-ग्रामीण रोजगार, (०२) रोजगार हमी योजनेंतर्गत बेरोजगार भत्त्यांचे प्रदान (०२) (०१) बेकार भत्ते, संकेतांक २५०५ ००३१, ५० इतर खर्च"** उपरोक्त लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत रु.१०००/- इतकी तरतूद करण्यात आली आहे. आयुक्त, नरेगा यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीतून सदर खर्च केला जातो.

(पाच)

परिशिष्ट—एक

परिशिष्ट - एक

अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यास तसेच उपविधान समितीस माहिती पाठविण्यास विभागास झालेला विलंब दर्शविणारे विवरणपत्र.

अ.क्र.	अधिसूचना क्रमांक	विभागाचे नाव	अधिसूचनेचा विषय	अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द केल्याचा दिनांक	विभागाकडून अधिसूचनेच्या ७५ प्रति व स्पष्टीकरणात्मक टिप्पणी प्राप्त झाल्याचा दिनांक	विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर अधिसूचना ठेवण्यासाठी पाठविण्यास झालेला विलंब वर्षे,महिने,दिवस			समितीसमोर विचारार्थ ठेवण्यासाठी अधिसूचना पाठविण्यास विभागाकडून झालेला विलंब
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)			(८)
(१)	(४६)	नियोजन (रोहयो) विभाग	महाराष्ट्र रोजगार हमी योजना -बेरोजगार भत्ता नियम,२०१३ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक बेभनि-२०१२/ प्र.क्र.३०/ रोहयो-१०, दिनांकित १ एप्रिल,२०१३.	१ एप्रिल, २०१३	७ जानेवारी, २०१६	वर्षे	महिने	दिवस	९९६ दिवस
						२	८	२२	
(२)	(४७)	वित्त विभाग	महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर सुधारणा नियम, २०१५ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक व्यकर. २०१५/ प्र.क्र. १८/कराधान-०३, दिनांकित १९ मे, २०१५.	१९ मे, २०१५	१५ जानेवारी, २०१६	वर्षे	महिने	दिवस	२२६ दिवस
						-	७	१२	
(३)	(४८)	ग्रामविकास व जलसंधारण विभाग	महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (सुधारणा) नियम, २०१५ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक व्हीपीएम. २०१५/ प्र.क्र.१४०/पंरा-४ (२२), दिनांकित ३१ डिसेंबर, २०१५.	३१ डिसेंबर, २०१५	२१ जानेवारी, २०१६	वर्षे	महिने	दिवस	६ दिवस
						-	-	६	
(४)	(४९)	गृह विभाग	मुंबई विदेशी मद्य (सुधारणा) नियम, २०१५ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एफएलआर.१७११/प्र.क्र.८२/राउशु-२, दिनांकित २८ ऑगस्ट, २०१५.	२८ ऑगस्ट, २०१५	३० जानेवारी, २०१६	वर्षे	महिने	दिवस	१४१ दिवस
						-	४	१८	
(५)	(५०)	उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग	महाराष्ट्र वीज लायसनधारकांचे काम, नियम, २०१२ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक नियम-२००८/प्र.क्र.२१७/एनआरजी. ३, दिनांकित ११ मे, २०१२.	११ मे, २०१२	२९ फेब्रुवारी, २०१६	वर्षे	महिने	दिवस	१३७४ दिवस
						३	९	५	
(६)	(५१)	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग	महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊस दराचे विनियमन नियम, २०१६ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक ससाका.२०१४/प्र.क्र.७१/२५स.,दिनांकित १६ फेब्रुवारी,२०१६.	१६ फेब्रुवारी, २०१६	४ मार्च, २०१६	वर्षे	महिने	दिवस	२ दिवस
						-	-	२	
(७)	(५२)	उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग	महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१५ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ लिगल/२०१५/०९३३,दिनांकित १० नोव्हेंबर, २०१५.	१० नोव्हेंबर, २०१५	८ मार्च,२०१६	वर्षे	महिने	दिवस	१०४ दिवस
						-	३	१३	
(८)	(५३)	उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग	महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१५ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ लिगल/२०१५/१०८४, दिनांकित ८ डिसेंबर, २०१५.	८ डिसेंबर, २०१५	८ मार्च,२०१६	वर्षे	महिने	दिवस	७६ दिवस
						-	२	१६	

(९)	(५४)	उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग	महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे.गिगाप्लेक्स इस्टेट प्रा.लि.(जीइपीएल), ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१५ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ तांत्रिक/ परवाना अटी/ जीइपीएल/ २०१५, दिनांकित २३ डिसेंबर,२०१५.	२३ डिसेंबर, २०१५	८ मार्च,२०१६	वर्षे	महिने	दिवस	६१ दिवस
						-	२	१		
(१०)	(५५)	ग्रामविकास व जलसंधारण विभाग	महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा (सुधारणा) संहिता, २०१६ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक व्हीपीएम.२०१५/प्र.क्र.३०९/पंरा-४ (२२), दिनांकित ३ मार्च,२०१६.	३ मार्च,२०१६	१९ मार्च,२०१६	वर्षे	महिने	दिवस	१ दिवस
						-	-	१		
(११)	(५६)	उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभाग	मुंबई उद्वाहन (चौदावी सुधारणा) नियम, २०१५ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक उअनि,२०१५/प्र.क्र.६/ऊर्जा-५,दिनांकित २४ नोव्हेंबर,२०१५.	२४ नोव्हेंबर, २०१५	१ एप्रिल,२०१६	वर्षे	महिने	दिवस	८५ दिवस
						-	२	२३		

परिशिष्ट—दोन

(सहा)

परिशिष्ट-दोन

उपविधान समितीने विचारात घेतलेले प्रारूप नियम दर्शविणारे विवरणपत्र

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

(१) **प्रारूप अधिसूचना क्रमांक डी-३.—**महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (सुधारणा) नियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक व्हीपीएम २०१५/प्र.क्र.१४०/पंरा-४(२२), दिनांकित २१ नोव्हेंबर २०१५.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १२ जानेवारी २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

(२) **प्रारूप अधिसूचना क्रमांक डी-४.—**महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा संहिता (सुधारणा), २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक व्हीपीएम. २०१५/प्र.क्र. ३०९/पंरा-४, दिनांकित २ डिसेंबर २०१५.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १२ जानेवारी २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(३) **प्रारूप अधिसूचना क्रमांक डी- १५.—**महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक सीबीसी.१०/२०१२/प्र.क्र.१६५/ मावक, दिनांकित २१ जुलै २०१२.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १० फेब्रुवारी २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व खालील शिफारशी सुचविल्या आहेत.

१. राज्यात जात पडताळणी प्रमाणपत्र संदर्भातील अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. सदर प्रलंबित प्रकरणावरील व नव्याने दाखल करण्यात येणाऱ्या प्रकरणांवरील निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्यामध्ये जात पडताळणी समिती नेमण्याबाबत व जात प्रमाणपत्र पडताळणी विहित मुदतीत मिळण्याकरिता जिल्हावार जात पडताळणी समित्या तात्काळ नेमण्यात याव्यात तसेच सदर समित्यांवर आवश्यक त्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यासंदर्भात शासनाने तात्काळ कार्यवाही करावी. अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात सादर करावी.

२. जातीचे प्रमाणपत्र ४५ दिवसांच्या आत देण्यात यावे व जातीचे वैधता प्रमाणपत्र तीन महिन्यांमध्ये देण्यात यावे अशी तरतूद नियमात करण्यात आलेली आहे. तथापि, विहित कालावधीत जातीचे प्रमाणपत्र वा जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र अर्जदारास मिळत नाहीत त्यामुळे अर्जदाराचे नुकसान होते. विहित मुदतीत जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र मिळणेकरिता या बाबींचा समावेश सेवा हमी कायद्यात करणे आवश्यक आहे. तसेच विहित कालावधीत सदर प्रमाणपत्रे अर्जदारास उपलब्ध न झाल्यास तसेच प्रकरणे प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच त्यांना शास्ती लावण्याबाबतची तरतूद सेवा हमी कायद्यात करण्यात यावी. अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात देण्यात यावी.

३. नियम क्रमांक २(च) अन्वये "मानीव दिनांक" याचा अर्थ अनुसूचित जातींकरता राष्ट्रपतींच्या आदेशाचा दिनांक १० ऑगस्ट १९५० आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्याकरिता दिनांक २१ नोव्हेंबर, १९६१ आणि इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग यांच्याकरिता दिनांक १३ ऑक्टोबर, १९६७ असा आहे. उपरोक्त व्याख्या विचारात घेता विविध समाजातील लोकांना जातीचे प्रमाणपत्र पाहिजे असल्यास त्यांच्याकडे वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्याशी संबंधित असलेल्या दिनांकापासूनचे पुरावे मागितले जातात. सदर पुरावा अर्जदाराच्या जन्मगावी किंवा अन्य ठिकाणी असतो. अर्जदारास मानीव दिनांकापासूनचे पुरावे देणे बंधनकारक आहे. तथापि, अर्जदाराच्या जन्माचा पुरावा असूनही तो जात पडताळणीसाठी ग्राह्य धरला जात नाही. यासाठी अर्जदाराकडे वडीलांचा, आजोबांचा, पणजोबांचा दाखला मागितला जातो. तसेच, महिला लग्न झाल्यानंतर पतीच्या घरी जाते. तेव्हा तिला जेव्हा जात प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा लागतो तेव्हा तिला आपल्या मूळ गावी, तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. तिला देखील वडिलांचा, आजोबांचा, पणजोबांचा दाखला जोडावा लागतो. परंतु काही वेळेला इतके जुने पुरावे उपलब्ध करून देणे शक्य होत नाही. त्यामुळे अर्जदारास जात प्रमाणपत्र मिळण्यापासून वंचित रहावे लागते व त्यास त्याचा कोणताही लाभ मिळत नाही. हे विचारात घेऊन याबाबत नियमात आवश्यक ती परिणामकारक तरतूद करण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी तसेच कुटुंबातील जेष्ठ व्यक्तीला जातीचा दाखला मिळाल्यानंतर त्यांच्या वारसांना दाखला मिळावा आणि कार्यपद्धतीतील क्लिष्टता व विलंब दूर व्हावा याबाबत निश्चित धोरण ठरविण्यासाठी विधानमंडळ सदस्यांची समिती नियुक्ती करण्यात यावी. अशी समितीची शिफारस आहे व शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्याच्या आत देण्यात यावी.

४. राज्यातील विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शिक्षणाकरिता व निवडणुकीला उभ्या राहणाऱ्या उमेदवाराला जातीचे प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय निवडणुकीस उभे राहता येत नाही. परिणामी त्यांना आरक्षणाचा लाभ घेता येत नाही त्यामुळे अशा उमेदवारांना तसेच विद्यार्थ्यांना देखील जातीचे प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कार्यवाही करावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व केलेल्या कार्यवाहीची महिती समितीस एक महिन्यात देण्यात यावी.

५. सदर अधिसूचने संदर्भातील अंतिम नियम उपविधान समितीकडे पाठविण्यास झालेल्या विलंबाबाबत समितीने नापसंती व्यक्त केली असून विभागाने नियम प्रसिद्ध केल्याबरोबर ते उपविधान समितीकडे पाठविम्याबाबत दक्षता घ्यावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.

नियोजन (रोहयो) विभाग

(४) **प्रारूप अधिसूचना क्रमांक डी- २२.—**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र बेरोजगार भत्ता नियम, २०१२ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक बेभनि.२०१२/प्र.क्र.३०/ रोहयो-१०, दिनांकित २ जानेवारी २०१३.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक २ मार्च २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व शिफारस सूचविली.

सदर अधिसूचनेसंदर्भात अंतिम नियम उपविधान समितीकडे पाठविण्यास झालेल्या विलंबाबात समितीने नापसंती व्यक्ती केली असून विभागाने भविष्यात प्रत्येक अधिनियमांतर्गत असलेल्या तरतुदीनुसार तयार केलेले नियम प्रसिद्ध केल्याबरोबर ते उपविधान समितीकडे पाठविण्याबाबत दक्षता घ्यावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.

(सात)

परिशिष्ट—तीन

(शा.म.मु.) एचबी ००२४–८ (६००–४-२०१६)

परिशिष्ट-तीन

उपविधान समितीने विचारात घेतलेले अंतिम नियम दर्शविणारे विवरणपत्र

वित्त विभाग

(१) **अधिसूचना क्रमांक १.—**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (चौथी सुधारणा) नियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मुवक. १५१४/प्र.क्र.६२/कराधान-१, दिनांकित १३ ऑगस्ट २०१४.

(२) **अधिसूचना क्रमांक ४.—**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर सुधारणा नियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक व्यकर. २०१४/ प्र.क्र.३६/कराधान-३, दिनांकित १३ ऑगस्ट २०१४.

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

(३) **अधिसूचना क्रमांक ४४.—**महाराष्ट्र राज्य पशुवैद्यकीय परिषद (सुधारणा) नियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक संकीर्ण. २०१४/ प्र.क्र. १३२/ पदुम-४, दिनांकित ५ ऑक्टोबर २०१५.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(४) **अधिसूचना क्रमांक ९९.—**आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१० प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक ओएएच-२००९/प्र.क्र.४६/सुधार-१, दिनांकित २३ जून २०१०.

(५) **अधिसूचना क्रमांक २३.—**महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक सीबीसी.१०/२०१२/प्र.क्र.१६५/ मावक, दिनांकित १ सप्टेंबर २०१२.

महसूल व वन विभाग

(६) **अधिसूचना क्रमांक २.—**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एलक्यूएन. १२/ २०१३/ प्र. क्र.१९०/अ-२, दिनांकित २७ ऑगस्ट २०१४.

गृह विभाग

(७) **अधिसूचना क्रमांक ८.—**महाराष्ट्र पंचायतीसंबंधीचे उपबंध अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारीत करण्याबाबत (दारुबंदी व लायसनचे विनियमन) नियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एमआयएस.९१२/ प्र.क्र.३३६/राऊशु-३, दिनांकित ४ मार्च २०१५.

गृह विभाग

(८) **अधिसूचना क्रमांक ९.—**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १०५ च्या पोट-कलम (१) अन्वये महाराष्ट्र शासन, शासन अधिसूचना, गृह विभाग, क्रमांक एआरएम.१०९६/२१/२/ इएक्ससी-३, दिनांक १३ सप्टेंबर, १९९६ मधील अनुसूची स्तंभ ३ मध्ये केलेली सुधारणा प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एमआयएस.०३१५/प्र.क्र. ५७/ राऊशु-३, दिनांकित १९ मार्च २०१५.

वित्त विभाग

(९) **अधिसूचना क्रमांक १२.—**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ च्या कलम ९ च्या उप कलम (१) अन्वये उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची 'क' आणि 'ग' मध्ये केलेल्या सुधारणा प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मूवक. १५१५/प्र.क्र.३९(१)/कराधान-१, दिनांकित २७ मार्च २०१५.

नियोजन (रोहयो) विभाग

(१०) **अधिसूचना क्रमांक ४६.—**महाराष्ट्र रोजगार हमी योजना -बेरोजगार भत्ता नियम, २०१३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक बेभनि-२०१२/प्र.क्र.३०/ रोहयो-१०, दिनांकित १ एप्रिल २०१३.

(आठ)

परिशिष्ट—चार

परिशिष्ट-चार

कार्यावलीचे परिशिष्ट

वित्त विभाग

(१) **अधिसूचना क्रमांक १.—**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (चौथी सुधारणा) नियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मुवक. १५१४/प्र.क्र.६२/कराधान-१, दिनांकित १३ ऑगस्ट २०१४.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

(२) **अधिसूचना क्रमांक ४.—**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर सुधारणा नियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक व्यकर. २०१४/ प्र.क्र.३६/कराधान-३, दिनांकित १३ ऑगस्ट २०१४.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १२ जानेवारी २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

(३) **अधिसूचना क्रमांक ४४.—**महाराष्ट्र राज्य पशुवैद्यकीय परिषद (सुधारणा) नियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक संकीर्ण. २०१४/ प्र.क्र. १३२/ पदुम-४, दिनांकित ५ ऑक्टोबर २०१५.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १२ जानेवारी २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(४) **अधिसूचना क्रमांक ९९.—**आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१० प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक ओएएच-२००९/प्र.क्र. ४६/ सुधार- १, दिनांकित २३ जून २०१०.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १० फेब्रुवारी २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व खालील शिफारशी सुचविल्या आहेत.

समितीने उपरोक्त अधिसूचनेसंदर्भात खालीलप्रमाणे शिफारशी सुचविल्या आहेत.

१. **पाल्य, जर आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांचा वृद्धापकाळात सांभाळ करीत नसेल तर सदर नियमातील तरतुदीनुसार आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांना स्वतःच्या चरितार्थासाठी पाल्यांकडून निर्वाह भत्ता मागणी करण्याचा हक्क प्रदान करण्यात आला आहे.**

तथापि, समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, या नियमांतर्गत असलेल्या तरतुदींची माहिती अद्यापी सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहचलेली नाही तरी याकरिता शासनाने या नियमांची सर्वदूर प्रसिद्धी करण्याकरिता नगरपरिषदा, पंचायत समिती, जिल्हाधिकारी कार्यालये, तहसीलदार कार्यालये इत्यादींच्या सहकार्याने तसेच प्रसिद्धी माध्यमांतर्फेही सदरहू नियमांचा प्रचार व प्रसार करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्यात देण्यात यावी.

२. तसेच राज्यातील सर्व विभागांमध्ये समेटकर्ता अधिकारी यांची नियुक्ती तातडीने करण्यात यावी तसेच सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणेकरिता योग्य ती संनियंत्रण व्यवस्था (Monitoring system) अंमलात आणावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्यात देण्यात यावी.

३. आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१० अंतर्गत सदर योजनेचा लाभ हा अर्जदाराने दिलेल्या अर्जाची छाननी होऊन लाभार्थी पात्र होईल त्या दिनांकापासून देण्यात येतो. तथापि, अर्जदाराने अर्ज केल्याच्या दिनांकापासून सदर योजनेचा लाभ अर्जदारास मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे ज्या दिवशी अर्जदार अर्ज करेल त्या दिवसापासून या योजनेचा लाभ अर्जदारास देण्यात यावा, याबाबत नियमात योग्य ती सुधारणा करण्यात यावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्यात देण्यात यावी.

४. आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणार्थ नियम, २०१० मधील नियम २१(२) (एक) मध्ये ज्येष्ठ नागरिकांचे कल्याण विषयाशी संबंधित प्रभारी मंत्री पदसिद्ध अध्यक्ष राहतील अशी तरतूद करण्यात आली आहे. तथापि, आई-वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणाच्या संदर्भात ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्याकरिता व त्यांना सोयी-सवलती व इतर योजनांची माहिती मिळण्यासंदर्भात ज्येष्ठ नागरिकांचे कल्याण असा कोणताही विभाग मंत्रालयीन स्तरावर अस्तित्वात नाही किंवा त्यासाठी स्वतंत्र मंत्री महोदय नाहीत, त्यामुळे मंत्रालय पातळीवर ज्येष्ठ नागरिकांसाठी एक स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात यावा अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व यासंदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात देण्यात यावी.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(५) **अधिसूचना क्रमांक २३.**—महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक सीबीसी. १०/२०१२/प्र.क्र. १६५/मावक, दिनांकित १ सप्टेंबर २०१२.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १० फेब्रुवारी २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व खालील शिफारशी सुचविल्या आहेत.

१. राज्यात जात पडताळणी प्रमाणपत्र संदर्भातील अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. सदर प्रलंबित प्रकरणावरील व नव्याने दाखल करण्यात येणाऱ्या प्रकरणांवरील निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्यामध्ये जात पडताळणी समिती नेमण्याबाबत व जात प्रमाणपत्र पडताळणी विहित मुदतीत मिळण्याकरिता जिल्हावार जात पडताळणी समित्या तात्काळ नेमण्यात याव्यात तसेच सदर समित्यांवर आवश्यक त्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यासंदर्भात शासनाने तात्काळ कार्यवाही करावी अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात सादर करावी.

२. जातीचे प्रमाणपत्र ४५ दिवसांच्या आत देण्यात यावे व जातीचे वैधता प्रमाणपत्र तीन महिन्यांमध्ये देण्यात यावे अशी तरतूद नियमात करण्यात आलेली आहे. तथापि, विहित कालावधीत जातीचे प्रमाणपत्र वा जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र अर्जदारास मिळत नाहीत त्यामुळे अर्जदाराचे नुकसान होते. विहित मुदतीत जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र मिळणेकरिता या बाबींचा समावेश सेवा हमी कायद्यात करणे आवश्यक आहे. तसेच विहित कालावधीत सदर प्रमाणपत्रे अर्जदारास उपलब्ध न झाल्यास तसेच प्रकरणे प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच त्यांना शास्ती लावण्याबाबतची तरतूद सेवा हमी कायद्यात करण्यात यावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात देण्यात यावी.

३. नियम क्रमांक २(च) अन्वये "मानीव दिनांक" याचा अर्थ अनुसूचित जातींकरता राष्ट्रपतींच्या आदेशाचा दिनांक १० ऑगस्ट १९५० आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्याकरिता दिनांक २१ नोव्हेंबर १९६१ आणि इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग यांच्याकरिता दिनांक १३ ऑक्टोबर १९६७ असा आहे. उपरोक्त व्याख्या विचारात घेता विविध समाजातील लोकांना जातीचे प्रमाणपत्र पाहिजे असल्यास त्यांच्याकडे वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्याशी संबंधित असलेल्या दिनांकापासूनचे पुरावे मागितले जातात. सदर पुरावा अर्जदाराच्या जन्मगावी किंवा अन्य ठिकाणी असतो. अर्जदारास मानीव दिनांकापासूनचे पुरावे देणे बंधनकारक आहे. तथापि, अर्जदाराच्या जन्माचा पुरावा असूनही तो जात पडताळणीसाठी ग्राह्य धरला जात नाही. यासाठी अर्जदाराकडे वडीलांचा, आजोबांचा, पणजोबांचा दाखला मागितला जातो. तसेच, महिला लग्न झाल्यानंतर पतीच्या घरी जाते. तेव्हा तिला जेव्हा जात प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा लागतो तेव्हा तिला आपल्या मूळ गावी, तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. तीला देखील वडिलांचा, आजोबांचा, पणजोबांचा दाखला जोडावा लागतो. परंतु काही वेळेला इतके जुने पुरावे उपलब्ध

करून देणे शक्य होत नाही. त्यामुळे अर्जदारास जात प्रमाणपत्र मिळण्यापासून वंचित रहावे लागते व त्यास त्याचा कोणताही लाभ मिळत नाही. हे विचारात घेऊन याबाबत नियमात आवश्यक ती परिणामकारक तरतूद करण्याबाबत शासनाने योग्य ती कार्यवाही करावी तसेच कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तीला जातीचा दाखला मिळाल्यानंतर त्यांच्या वारसांना दाखला मिळावा आणि कार्यपद्धतीतील क्लिष्टता व विलंब दूर व्हावा याबाबत निश्चित धोरण ठरविण्यासाठी विधानमंडळ सदस्यांची समिती नियुक्त करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे व शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्याच्या आत देण्यात यावी.

४. राज्यातील विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शिक्षणाकरिता व निवडणुकीला उभ्या राहणाऱ्या उमेदवाराला जातीचे प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय निवडणुकीस उभे राहता येत नाही परिणामी त्यांना आरक्षणाचा लाभ घेता येत नाही त्यामुळे अशा उमेदवारांना तसेच विद्यार्थ्यांना देखील जातीचे प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कार्यवाही करावी अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व शासनाने केलेल्या कार्यवाहीची महिती समितीस एक महिन्यात देण्यात यावी.

५. सदर अधिसूचनेसंदर्भातील अंतिम नियम उपविधान समितीकडे पाठविण्यास झालेल्या विलंबाबाबत समितीने नापसंती व्यक्त केली असून विभागाने नियम प्रसिद्ध केल्याबरोबर ते उपविधान समितीकडे पाठविण्याबाबत दक्षता घ्यावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.

महसूल व वन विभाग

(६) **अधिसूचना क्रमांक २.—**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एलक्यूएन. १२/२०१३/प्र. क्र.१९०/अ-२, दिनांकित २७ ऑगस्ट २०१४.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक १० फेब्रुवारी २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व खालील शिफारस सुचविली आहे.

भूमीसंपादन अधिनियमांतर्गत भूसंपादन करीत असतांना भूसंपादनाच्या कार्यवाहीमध्ये पारदर्शकता रहावी याकरिता सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास केला जातो. सदर सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासाचा अहवाल समुचित शासनाला (संबंधित जिल्हाधिकारी) सादर करण्यात येतो. त्याऐवजी सदर अहवाल जिल्हाधिकाऱ्यांसह, नगरपंचायत व लोकप्रतिनिधी यांचा समावेश करून जिल्हापातळीवर एक कायमस्वरुपी समिती गठित करण्यात येऊन त्या समितीसमोर सादर करण्यात यावा अशी शिफारस समिती शासनास करीत आहे व याप्रकरणी शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्यात कळविण्यात यावी.

गृह विभाग

(७) **अधिसूचना क्रमांक ८.—**महाराष्ट्र पंचायतीसंबंधीचे उपबंध अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारीत करण्याबाबत (दारुबंदी व लायसनचे विनियमन) नियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एमआयएस. ९१२/प्र.क्र. ३३६/राऊशु-३, दिनांकित ४ मार्च २०१५.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक २३ फेब्रुवारी २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

गृह विभाग

(८) **अधिसूचना क्रमांक ९.—**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १०५ च्या पोट-कलम (१) अन्वये महाराष्ट्र शासन, शासन अधिसूचना, गृह विभाग, क्रमांक एआरएम.१०९६/२१/२/ इएक्ससी-३, दिनांक १३ सप्टेंबर १९९६ मधील अनुसूची स्तंभ ३ मध्ये केलेली सुधारणा प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एमआयएस.०३१५/प्र.क्र. ५७/ राऊशु-३, दिनांकित १९ मार्च २०१५.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक २३ फेब्रुवारी २०१६ रोजीच्या बैठकीत विचार विनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

वित्त विभाग

(९) अधिसूचना क्रमांक १२.—महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ च्या कलम ९ च्या उप कलम (१) अन्वये उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची 'क' आणि 'ग' मध्ये केलेल्या सुधारणा प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक मूवक. १५१५/प्र.क्र.३९(१)/कराधान-१, दिनांकित २७ मार्च २०१५.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक २३ फेब्रुवारी २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

नियोजन (रोहयो) विभाग

(१०) **अधिसूचना क्रमांक ४६.—**महाराष्ट्र रोजगार हमी योजना–बेरोजगार भत्ता नियम, २०१३ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक बेभनि-२०१२/प्र.क्र.३०/ रोहयो-१०, दिनांकित १ एप्रिल २०१३.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक २ मार्च २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

(नऊ)

समितीच्या बैठकींचे कार्यवृत्त

बैठकींचे कार्यवृत्त

उप विधान समितीची बैठक मंगळवार, दिनांक १२ जानेवारी २०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता विधान भवन, मुंबई (कक्ष क्र.२००२) येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :–

उपस्थिती :

(१) श्री. विजयराव औटी, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

(२) ॲड. रामचंद्र अवसरे, वि.स.स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.

(५) श्री. अमल महाडीक, वि.स.स.

(६) श्री. सुरेश भोळे, वि.स.स.

(७) श्री. राहूल जगताप, वि.स.स.

(८) श्री. सुभाष ऊर्फ पंडीतशेठ पाटील, वि.स.स.

(९) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(१०) श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. सुभाषचंद्र मयेकर, उप सचिव

(२) श्रीमती पुनम ढगे, अवर सचिव

(३) श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी

उप विधान समितीची बैठक बुधवार, दिनांक १० फेब्रुवारी २०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता कक्ष क्रमांक २००२, विसावा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :–

उपस्थिती :

(१) श्री. विजयराव औटी, वि.स.स.तथा समिती प्रमुख.

(२) ॲड. रामचंद्र अवसरे, वि.स.स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) ॲड. संजय धोटे, वि.स.स.

(५) श्री. अमल महाडिक, वि.स.स.

(६) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(७) श्री. सुभाष पाटील, वि.स.स.

(८) श्री. विनायक मेटे, वि.प.स.

(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१०) श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(१) श्री. सुभाषचंद्र मयेकर, उप सचिव

(२) श्रीमती पुनम ढगे, अवर सचिव

(३) श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. उज्ज्वल उके, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(२) श्री. विकास खारगे, सचिव, महसूल व वन (वने) विभाग

उप विधान समितीची बैठक मंगळवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी दुपारी १.०० वाजता, विधान भवन, कक्ष क्रमांक २००३, विसावा मजला, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

उपस्थिती :

(१) श्री. विजयराव औटी, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

(२) ॲड. रामचंद्र अवसरे, वि.स.स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) ॲड. संजय धोटे, वि.स.स.

(५) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.

(६) श्री. अमल महाडीक, वि.स.स.

(७) श्री. सुरेश भोळे, वि.स.स.

(८) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(९) श्री. अशोक पाटील, वि.स.स.

(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(११) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(१२) श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

(१३) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. सुभाषचंद्र मयेकर, उप सचिव

(२) श्रीमती पुनम ढगे, अवर सचिव

(३) श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी

उप विधान समितीची बैठक बुधवार, दिनांक २ मार्च २०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता कक्ष क्रमांक २००२, विसावा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :

उपस्थिती :

(१) श्री. विजयराव औटी, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

(२) ॲड. रामचंद्र अवसरे, वि.स.स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) ॲड. संजय धोटे, वि.स.स.

(५) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.

(६) श्री. अशोक पाटील, वि.स.स.

(७) श्री. विनायक मेटे, वि.प.स.

(८) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(९) श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(१) श्रीमती पुनम ढगे, अवर सचिव

(२) श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी

विभागीय प्रतिनिधी

(१) श्री. प्रभाकर देशमुख, सचिव, नियोजन (रोहयो) विभाग

(२) डॉ. प्रमोद शिंदे, उप सचिव, नियोजन (रोहयो) विभाग

उप विधान समितीची बैठक मंगळवार, दिनांक ५ एप्रिल २०१६ रोजी सायंकाळी ४-०० वाजता, कक्ष क्रमांक २००२, विसावा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :

उपस्थिती :

(१) श्री. विजयराव औटी, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

(२) ॲड. रामचंद्र अवसरे, वि.स.स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) श्री. अमल महाडीक, वि.स.स.

(५) श्री. सुरेश भोळे, वि.स.स.

(६) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(७) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(८) श्री. राहूल जगताप, वि.स.स.

(९) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(१) श्री. सुभाषचंद्र मयेकर, उप सचिव

(२) श्रीमती पुनम ढगे, अवर सचिव

(३) श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी

सदरहू बैठकीत समितीने प्रारूप अहवालावर विचारविनिमय केला व काही सुधारणा सूचवून तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई